म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्र[illegible]लय क्रमांक

लेखक [illegible] अनंत

सन

पुस्तकाचें नांव विचार[illegible]

६४

ग्रं क्र.

विचार शिक्षा.

निबंध

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसैटीच्या

आश्रयाखालीं

# विचारशिक्षा

हें पुस्तक

**जनार्दन अनंत जोशी**

यांनीं

तयार करून

मुंबईमध्यें

जगदीश्वर छापखान्यांत छापिलें.

सन १८९१

किंमत दहा आणे.

( सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत. )

# प्रस्तावना.

ईश्वरानें विचारशक्ति ही अत्युत्तम देणगी मनुष्यास दिली आहे. आज साऱ्या जगावर मनुष्याचा जो एवढा पगडा बसला आहे तो ह्याच शक्तीच्या योगानें. परंतु विचारशक्ति—

"सुज्ञासि पचे पचे न येरा हे."

ह्मणजे तिचा सदुपयोग करणाऱ्यास मात्र ती सुखदायक होते.

विचारवान् मनुष्य आपलेंच कल्याण करितो असें नाहीं, तर आपल्या देशाचें आणि किंबहुना परदेशांचेंही कल्याण करितो.

विचाराच्या योगानें रावांचे रंक, आणि रंकांचे राव कसे बनून जातात, ह्याचीं उदाहरणें पहावयाचीं असल्यास इतिहास चाळावा ह्मणजे शेंकडों सांपडतील. संभाजी प्रत्यक्ष राजा असतांना त्याला हालअपेष्टा भोगून मरणें कां प्राप्त झालें? दुसऱ्या बाजीरावाच्या हातांत सर्वस्वी राजसत्ता असतां त्यास ब्रह्मावर्तास कैदीप्रमाणें कां जाऊन रहावें लागलें? वेरूळ गांवच्या पाटलाचा मुलगा सर्व हिंदूंचा छत्रपति महाराज कां झाला? यःकश्चित् श्रीवर्धनचा कुळकर्णी, पण त्याच्या ह्मणण्याप्रमाणें दिल्लीचा बादशहासुद्धां कां वागूं लागला? या चार प्रश्नांचीं उत्तरें आमच्या वाचकांनीं दिलीं ह्मणजे त्यांस विचारमाहात्म्य कळून येईल.

ह्या विषयावरच कांहीं दिवसांपूर्वीं एक इंग्रजी पुस्तक माझ्या वाचण्यांत आलें. तें पुस्तक मला चांगलें वाटलें; आणि त्याच्या आधारानें एखादें पुस्तक तयार करून मुलांच्या हातीं दिलें असतां त्याचा त्यांस पुष्कळ उपयोग होईल, असें मला वाटल्यावरून मीं हें पुस्तक लिहिलें आहे.

ह्या पुस्तकापासून विद्यार्थीजनांचा थोडाबहुत तरी उपयोग होऊन माझ्या श्रमाचें सार्थक्य व्हावें अशी माझी इच्छा आहे; ती तो जगदात्मा पूर्ण करो.

मराठी ग्रंथ

# विद्येशिक्षा.

कांहीं वर्षांपूर्वी मुंबई शहरांत लोहारचाळीमध्यें रामचंद्रपंत ह्मणून एक गृहस्थ रहात होता. त्यास दरमहा चाळीस रुपयांची नोकरी होती. तो हात राखून खर्च करणारा होता, आणि त्याच्या कुटुंबाचीं माणसेंही थोडीं होतीं, ह्मणून त्याचा सुखानें चरितार्थ चालून दर महिन्यास दोन पैसे पाठीमागें रहात असत. त्यास विष्णु नांवाचा एक बारा वर्षांचा मुलगा होता. तो एकुलता एक असल्यामुळें आईबाप त्याचे फार लाड करीत असत; तेणेंकरून तो बुद्धिमान् होता तरी उनाड झाला होता. रामचंद्रपंतानें त्याला शाळेंत घातलें होतें, परंतु त्याचें चित्त सर्वकाळ खेळावर असल्याकारणानें त्याला शाळेंत जाण्याचा मोठा कंटाळा असे. तो बहुतकरून खेळून दिवस घालवी, तथापि तीं आईबापें त्याचे लाड कमी करीत नसत; त्यामुळें थोडेंसें लिहिण्या वाचण्यावांचून त्याला कांहीं येत नव्हतें. अशी त्याची स्थिति असतां रामचंद्रपंतास एकाएकीं देवाज्ञा झाली; त्यायोगानें त्याच्या गरीब बायकोवर दुःखाचा डोंगर कोसळला. जवळ फारसा पैसा नसल्यामुळें तिला अब्रूनें दिवस काढण्याची मोठी पंचाईत पडली.

एथें पहिल्याप्रमाणें राहून आपला निर्वाह लागणार नाहीं, असा विचार करून त्या बाईनें लोहारचाळींतील बिऱ्हाड सोडिलें, आणि भायखळ्यावर एक लहानशी खोली भाड्यानें घेऊन तींत तीं मायलेंकरें जाऊन राहिलीं. तेथें ती बाई लोकांचें दळणकांडण करून कांहीं पैसे मिळवून आणि जवळचाही थोडा पैसा त्यांत घालून गरीबीनें पण अब्रूनें दिवस काढूं लागली.

अशी स्थिति प्राप्त झाली, तथापि त्या मुलाची खेळावरील प्रीति कांहीं कमी झाली नाहीं. कारण, आपली पूर्वींची स्थिति कशी होती, हल्लीं आपण कोणत्या स्थितींत आहों, व पुढें आपली काय वाट होईल हें कधींही त्याच्या मनांत येत नसे. आजपर्यंत त्याचा बहुतेक काळ खेळामध्येंच आनंदानें गेला असल्यामुळें विचार कसा करावा हें त्याच्या गांवींही नव्हतें. नवीन अनोळखीच्या ठिकाणीं रहावयास आल्यावर आठचार दिवस त्याला खेळावयास मुलें मिळालीं नाहींत, त्या कारणानें आईनें बिऱ्हाड बदललें ह्मणून त्याला फार वाईट वाटलें, परंतु पुढें खेळगडी मिळूं लागतांच त्याचा खेळाचा कारखाना सुरू झाला.

एके दिवशीं तो डाव्या हातांत लोखंडी * पट्टा,

* हें एक लोखंडी अथवा लांकडी पट्टीचें कडें असतें. हें उभें करून ह्यास दुसऱ्या लांकडी पट्टीनें मारून पळवितात. ह्यास

आणि उजव्या हातांत लांकडाची एक पट्टी घेऊन गडबडीनें खेळावयास निघाला असतां, वाटेंत त्याला वामन नांवाचा मुलगा भेटला. वामन घरचा गरीबच होता, परंतु शहाणा आणि अभ्यासी मुलगा होता. त्याची आणि विष्णूची शाळेंतील ओळख होती. तो विष्णूजवळ जाऊन ह्मणाला, विष्णु, थांब जरा, थांबशील काय? मला तुजजवळ कांहीं बोलावयाचें आहे.

विष्णु— तर जलदी कर. मला हा पट्टा धांवडावयाचा आहे. तुला काय बोलावयाचें आहे?

वामन— उभा रहा, मी सांगतों. आतां तुला ही आळी कशी काय वाटते? पहिल्यानें तूं एथें रहावयास आलास तेव्हां तूं ह्या आळीला नांवें ठेवीत होतास नव्हे काय?

विष्णु—होय, पण मला आतां एथें येऊन पंधरा दिवसांवर दिवस झाले आहेत, आणि कांहीं खेळगडीही मिळाले आहेत.

वामन— ह्मणूनच मला वाटतें, तुला हा शेजार आतां आवडूं लागला. अरे, तुझा हा पट्टा खडबडीत जमिनीवरून सुद्धां भराभर धांवत असेल? पण असा हा चांगला कशानें धांवतो हें तूं मला सांगशील?

---

वरचेवर मारण्यासाठीं मुलासही त्याबरोबर पळावें लागतें. हा खेळ युरोपिअन मुलांचा आहे; तथापि मुंबईतील आपलीं बहुतेक मुलें हा खेळ खेळतात. ह्या खेळापासून मुलांस व्यायाम चांगला होतो.

विष्णु–कशानें धांवतो? हो, हें मी खचित सांगेन. ह्या माझ्या लांकडी पट्टीनें, हें तुला ठाऊक असेलच. जसजशी ही पट्टी मी त्यावर जोरानें मारितों, तसतसा तो जलदीनें पळूं लागतो.

वामन–परंतु तुझ्या अंगांत जोर असेल तितक्या जोरानें जरी तूं आपल्या पट्टीनें ह्या झाडाला मारिलेंस, तरी हें तिळभरही आपली जागा सोडणार नाहीं.

विष्णु–नाहींच सोडणार, कारण, तें फार खोल जमिनींत गेलेलें आहे.

वामन–बरें, हा पलीकडे रस्त्याच्या बाजूस खांब पडला आहे, तो कांहीं जमिनींत गेलेला नाहीं. त्याला पट्टीनें मार, आणि पहा बरें, तो तुझ्या पट्ट्याप्रमाणें धांवतो काय तें.

विष्णु–नाहीं धांवणार हें मला माहीत आहे. कारण, तो फार जड आहे; ह्मणून त्याला पट्टीनें मारून कांहीं उपयोग होणार नाहीं.

वामन–बरें तर, हा माझा हातरुमाल आहे; ह्याला तूं पट्टीनें मार. मग पाहूं या बरें तो धांवतो का काय तो. हा कांहीं तुला फार जड लागणार नाहीं, हें खचित.

विष्णु–जड नाहीं खरा, पण हा फार हलका आहे. हा मुळींच धांवत जाणार नाहीं.

वामन–खांब फार जड आहे, आणि हातरुमाल

फार हलका आहे! तुझी समजूत करण्याचें मोठें कठीण आहे बावा. बरें, हा हातरुमाल तुला जितका जड हवा असेल तितक्या वजनाचा एक धोंडा मी ह्यांत बांधितों; मग तर तूं हा आपल्या पट्टीनें चालविशीलना?

विष्णु—नाहीं, तसें मला करितां यावयाचें नाहीं.

वामन—कां बरें करितां यावयाचें नाहीं?

विष्णु—कां बरें? कारण—कारण, तो मुळींच धांवत जाणार नाहीं ह्मणून.

वामन—पण हा कां धांवत जाणार नाहीं, ह्याचें कारण तर मला सांगशील कीं नाहीं?

विष्णु—नाहीं, तें मला सांगतां येणार नाहीं. त्याविषयीं मीं कधींही विचार केलेला नाहीं.

वामन—तूं केला नाहींस हें मी समजतों. कारण, आह्मां मुलांचा स्वभाव असा असतो कीं, कोणी तरी आह्मांवर जुलूम केल्याशिवाय खेळावांचून इतर कोणत्याही गोष्टीचा आह्मी विचार करीत नाहीं. असो, परंतु तुला जें सांगावयाचें आहे तें आतां मला सांगूं दे.

विष्णु—सांग सांग, ह्मणजे मी आपला निघून जाईन. तिकडे पहा, तो त्रिंबक आपला पट्टा फिरवीत चालला आहे; त्याला जाऊन मला गांठिलें पाहिजे. त्याचा पट्टा माझ्यापेक्षां मोठा आहे, तरी मी त्याच्यापुढें जाईन. तूं मला काय सांगणार आहेस?

वामन—मला विचारशिक्षेविषयीं तुझ्याशीं बोलावयाचें आहे.

विष्णु—विचारशिक्षेविषयीं ? असली गोष्ट मीं कधीं ऐकलीही नाहीं.

वामन—तूं खचित ऐकली नाहींस हें मला माहीत आहे, परंतु तसें असलें तरी मी एवढेंच ह्मणतों कीं, तूं शिकण्यास लवकर आरंभ केला असतास तर बरें झालें असतें.

विष्णु—परंतु तूं ह्मणतोस ती विचारशिक्षा शिकून काय फायदा ?

वामन—काय फायदा ? काय प्रश्न हा ! परंतु मी सांगतों कीं, कांहीं वर्षांपूर्वीं मींही असाच प्रश्न विचारिला असता; आणि ह्मणूनच तूं असा प्रश्न केल्याबद्दल मला आश्चर्य वाटूं नये. जर लोकांनीं वस्तूंविषयीं विचार केला नसता, तर आज आह्मांस जो सुखाचा लाभ होत आहे, तो कधींही झाला नसता. आह्मी जें अन्न खातों, जीं वस्त्रें पांघरितों, व ज्या घरामध्यें राहतों, तीं सर्व पुष्कळ विचाराच्या योगानें झालेलीं आहेत; आणि आमचे खेळही त्याचींच फळें आहेत. भोंवरा कां फिरतो, चेंडू कां उडतो, जंगी भोंवरा कां वाजतो, आणि हवेंत पतंग कां उडतो, ह्या प्रश्नांपैकीं एका प्रश्नाचें देखील तुला उत्तर देतां येईल असें मला

वाटत नाहीं. आतां जर तूं विचार करावयास शिकला असतास तर तूं इतक्यांचींही उत्तरें देतास.

विष्णु— मीं दिलीं असतीं ?

वामन— होय, दिलीं असतींस; परंतु ह्यांचीं उत्तरें देतां येण्याच्या पूर्वीं ही तुझ्या हातांतील लांकडाची पट्टी पतंगाप्रमाणें हवेंत कां उडावयाची नाहीं, हें तुझ्यानें सांगवणार नाहीं.

विष्णु— ही फार जड आहे ह्मणून.

वामन— फार जड आहे ? मोठा पतंग ह्या पट्टीच्या दुप्पट जड असतो, ह्मणून तो उडाल्याशिवाय राहतो काय ? हें तुझें कारण बरोबर नाहीं.

विष्णु— तर मला कांहीं सुचत नाहीं बाबा.

वामन—आणि ह्मणूनच तूं विचार करण्यास शिकावेंस. तो पलीकडे एक मुलगा पतंग उडवितो आहे. त्यानें दोरी पुष्कळ ढिली सोडिली आहे, तरी तो पतंग अधिक उंच जात नाहीं. हें सांगण्याविषयीं यत्न कर पाहूं बरें.

विष्णु—कारण, दोरीनें त्या पतंगाला बळकट धरिलें आहे, आणि ती त्याला अधिक उंच जाऊं देत नाहीं.

वामन— बरें, जर दोरी तुटली तर पतंग अधिक उंच न जातां लागलाच जमिनीवर पडूं लागतो, हें कसें तर ?

विष्णु— हें माझ्यानें सांगवणार नाहीं हें खचित, पण तुला तरी सांगतां येईल ?

वामन– होय, सांगेन. आणि ज्या कितीएक गोष्टीं-विषयीं मला पूर्वीं कांहीं समजत नव्हतें, त्यांविषयींही मी सांगेन. मी तुजपेक्षां वयानें मोठा आहें, ह्मणून मला अधिक समजलें पाहिजे; परंतु जर तूं विचार करावयास शिकशील, तर जें तुला आतां समजण्याला कठीण वाटतें, तें तुला सोपें वाटूं लागेल. विचार करणाऱ्या लोकांचा दुसऱ्या लोकांवर पगडा असतो, ह्याचें कारण ते त्यांच्यापेक्षां अधिक शहाणे असतात. त्यांना दुसऱ्याला दोन चांगल्या गोष्टी सांगतां येतात, आणि साह्य करितां येतें. कारण, कोणत्या वेळेस काय करावें आणि तें कसें करावें, हें त्यांस चांगलें समजतें. जर एखाद्या गव्हांनीं भरलेल्या पोत्यांतले गव्हांचे दाणे किती आहेत हें आपणास समजावें असें तुला वाटलें, तर तूं ते कसे मोजिशील बरें ?

विष्णु–कां बरें ? ते मी मोजीन ह्मणजे झालें.

वामन–होय, ते किती आहेत हें ह्या रीतीनें समजेल, पण विचार करणारा मनुष्य ज्या रीतीनें मोजील ती ही रीति नव्हे. पहा, एका मिनिटांत तूं दोनशें दाणे मोजिलेस, आणि ह्याप्रमाणें सगळा आठवडाभर रात्रंदिवस मोजीत बसलास, तरी सर्व गहूं मोजून होणार नाहींत.

विष्णु–तर तूं हे कसे मोजिशील ? हें कोडें आहेसें

मला वाटतें. मोजल्याशिवाय किती आहेत ते कसे समजतील?

वामन—मी पहिल्यानें त्या पोत्यांतले एक तोळा गहूं वजन करून घेईन, आणि एका तोळ्यांत किती आले तें पाहीन. नंतर त्या पोत्यांत किती तोळे गहूं आहेत, हें समजण्यासाठीं सारें पोतें वजन करीन, आणि मग जर मीं त्या पोत्यांतील गव्हांच्या तोळ्यांच्या संख्येला एका तोळ्यांतल्या गव्हांच्या संख्येनें गुणिलें तर एकंदर किती गहूं आहेत हें समजेल. तराजू जवळ असली ह्मणजे ही गोष्ट दहा अथवा पंधरा मिनिटांत करितां येईल.

विष्णु—असा विचार माझ्या मनांत कधींही आला नसता. पण पोत्यांतले गहूं मोजावयास शिकून काय करावयाचें आहे?

वामन—बेरीज शिकून जें करावयाचें तेंच हें शिकून करावयाचें. येणें करून आपणांला अतिशय जलद आणि चांगल्या रीतीनें मोजतां येतें. मूळाक्षरें शिकून मुलाचें कांहीं चांगलें होत नाहीं, तेणेंकरून त्याला वाचतां मात्र येऊं लागतें; आणि जर आपणांला खतेंपत्रें आणि दुसरे कागद लिहितां येणार नाहींत, तर खरडे घांसघांसून अक्षर वळविल्यापासून आपला कांहींएक फायदा होणार नाहीं.

विष्णु—ती गहूं मोजण्याची कल्पना सर्वोत्कृष्ट आहे बुवा.

वामन—ती विचाराशिवाय बसलेली नाहीं हें पक्कें समज. कांहीं दिवसांपूर्वीं मीं एका अविचारी कुणब्याची गोष्ट ऐकली होती. त्याच्या माळवदाच्या घरावर पुष्कळ गवत वाढलेलें होतें, तें आपल्या गायीनें खावें ह्मणून त्यानें तिला त्या घरावर चढविण्यास हरप्रयत्न केले!

विष्णु—आणि शेवटीं तें त्यानें कसें तडीस नेलें?

वामन—त्याचा एक शेजारी होता. तो विचार करावयास शिकलेला होता. तो त्यास ह्मणाला, "जरी तुला गायीस वर चढवितां येत नाहीं, तरी तें गवत कापून खालीं आणून तिला घालितां येईल." असें त्यानें सांगितल्यावर त्याप्रमाणें त्यास सहज करितां आलें.

विष्णु—अहाहा! तो कुणबी कितीतरी मूर्ख असावा!

वामन—तो विचार करण्यास कधींही शिकला नव्हता. मीं काल एका खोडकर माकडाची गोष्ट वाचली. ती अशी कीं, तें मांकड एका मनुष्याची पुष्कळ खराबी करून एका बारीक पण उंच झाडावर अगदीं शेंड्याला जाऊन बसलें. तेव्हां दोन मनुष्यांनीं त्याला धरण्याचें मनांत आणिलें. त्यांतील एक जण विचार करावयास शिकलेला होता, आणि दुसरा नव्हता. प्रथम

दुसरा मनुष्य चढवेल तितक्या उंचीपर्यंत झाडावर चढला, परंतु बारीक फांद्यांना त्याचा भार सोसेना ह्मणून त्यास खालीं यावें लागलें. नंतर विचारी मनुष्य पुढें आला. त्यानें झाडावर न चढतां तें तोडण्याचें काम सुरू केलें. आणि तें झाड व खोडकर माकड हीं दोन्हीं जमिनीवर पाडिलीं.

विष्णु—खासें, आणि शेवटीं राजेश्रीला पकडलेंच! विचार करावयास शिकणें हें फार चांगलें आहे, असें आतां मला वाटूं लागलें आहे. दुसऱ्या एखाद्या वेळेस मी तिजविषयीं तुझ्याशीं बोलेन.

वामन—बरें तर, जा आतां तुझा पट्टा घेऊन. तो पहा त्रिंबक तुझी वाट पाहतो आहे. उद्यां मी तुला भेटेन, आणि मग आपण विचारशिक्षेविषयीं बोलूं.

---

## भाग दुसरा.

वामन—विष्णु, मला वाटलें होतें तूं बाहेर गेला असशील ह्मणून, पण तूं हें चिमुकलें जहाज पाण्यांत सोडून बसला आहेस. वाऱ्याची झुळुक लागल्याबरोबर हें कसें समोर नीट जातें! पण हें पाण्यावर कां तरंगतें, बुडून तळाला कसें जात नाहीं? हें तुझ्यानें सांगवेल?

विष्णु—वामन, हें लांकडाचें केलें आहे ह्मणून. लांकूड हलकें असतें, हें त्याचें कारण आहे.

वामन—परंतु हा पहा माझ्या हातांत खडा आहे. हा तुझ्या जहाजाच्या दहाव्या हिशा इतका तर नाहींच, पण शंभराव्या हिशा इतकाही जड नाहीं; तथापि हा पाण्यांत टाकल्याबरोबर नीट तळास जाईल. ह्याचें कारण काय?

विष्णु—माझ्यानें नाहीं सांगवत. मीं त्याविषयीं कधीं विचार केला नाहीं; तुला माहीत असेल तर मला सांग. घोंटाळ्याचे प्रश्न विचारावयाचे, आणि त्यांविषयीं कांहींएक सांगावयाचें नाहीं; ह्याचा काय उपयोग बरें? भोंवरा कां फिरतो, जंगी भोंवरा कां वाजतो, चेंडू कां उशी देतो, आणि हवेंत पतंग कां उडतो, ह्यांविषयीं तूं मला कधीं सांगितलें नाहींस.

वामन—नाहीं, मीं सांगितलें नाहीं. आणि त्याचें कारण हेंच कीं, तूं थोडासा विचार केलास ह्मणजे त्या गोष्टी तुला सहज शोधून काढितां येतील. मीच जर तुला सारें सांगूं लागलों तर तूं विचार करूं लागणार नाहींस.

विष्णु—मला जर कोणी विचार करण्यास शिकवील तर मी हौसेनें शिकेन.

वामन—बरें तर, जर तूं शिकशील तर मला रे आहे तितकें मी तुला शिकवीन; आणि आमचे गुरुजी

कृपा करून जें मला शिकवितात तेंहि सर्व तुला सांगेन. ते मला फार लक्ष लावून शिकवीत आहेत, आणि मीही होईल तितकें त्यांच्यापासून शिकून घेतों आहें. ते मला सांगतात कीं, विचार करणाऱ्या मनुष्याच्या पाहण्यांत जो जो पदार्थ येतो, तो तो त्याला चित्तवेधकच होतो. धान्याचे कण पाहिले ह्मणजे ज्या अन्नावर लाखों मनुष्यांचा निर्वाह चालतो, त्या अन्नाची कल्पना त्याच्या मनांत येते. शेतांत होणारा कापूस आणि मेंढरांच्या आंगावरील लोंकर हीं मनुष्यजातीच्या वस्त्रांचीं मूलद्रव्यें आहेत असें तो समजतो; आणि गवतावर जे दंवाचे बिंदु चमकतात, आणि आकाशांत तारे झकाकतात, त्यांमध्यें त्याला परमेश्वराची कारागिरी दिसून येते. ज्या पदार्थापासून त्याच्या मनांत उपयोगाचे विचार येत नाहींत असा एकही पदार्थ नाहीं.

विष्णु— जर मी विचार करण्यास शिकलों, तर भोंवरा कां फिरतो, चेंडू कां उशी देतो, जंगी भोंवरा कां वाजतो, आणि हवेंत पतंग कां उडतो, हें मला समजेल काय ?

वामन— हो अलबत, शिवाय आणखी उपयोगी अशा पुष्कळ गोष्टी समजतील. पण तिकडे पहा, तुझें जतरा डुलूं लागलें; नांगर टाक. मी काल गुरुजींबरोबर ब्याकबेवर फिरावयास गेलों होतों, तेव्हां तेथें एक

नांगर पडलेला होता. तो आह्मीं पाहिल्यावर त्यांनीं मला नांगराविषयीं इतकें सांगितलें, कीं तितक्या गोष्टी मीं कधीं ऐकल्या नव्हत्या. पहिल्यानें मीं विचार करावा ह्मणून त्यांनीं मला प्रश्न केले. नंतर मी त्यावर विचार करूं लागलों, तेव्हां त्यांनीं मला वरचेवर सूचना केल्या, आणि त्यानंतर ज्या गोष्टी मला समजल्या नाहींत त्या त्यांनीं उघड करून सांगितल्या.

विष्णु–तेव्हां मी तुजबरोबर असतों तर बरें झालें असतें.

वामन–होय तें खरें; मी जें काय तुला सांगेन, त्यापेक्षां अधिक योग्यतेच्या गोष्टी तुझ्या कानीं आल्या असत्या. त्यांनीं एक फार चमत्कारिक गोष्ट सांगितली. त्यावरून असें सिद्ध झालें कीं, पुष्कळ विचार करण्यापेक्षां योग्य रीतीनें केलेला विचार फार महत्वाचा असतो.

विष्णु–ती काय गोष्ट बरें? ती मला सांग.

वामन–त्यांनीं सांगितलें कीं, एका मनुष्यास निरुपयोगी गोष्टींविषयीं पुष्कळ विचार करण्याची संवय झाली होती. त्याच्या विचारांत उपयोगाचें असें फार थोडें असे. तो एके दिवशीं जहाजांत बसून जात असतां वाटेंत तें जहाज खडकावर आपटून फुटलें. तेव्हां जी वस्तु आपल्यास पाण्यांत बुडूं देणार नाहीं, अशी वस्तु मिळविण्याविषयीं त्यावरील सर्व लोकांची धांदल

उडून गेली. त्या धांदलींत हा मनुष्य मूर्खपणानें आपला नांगरच घेऊन बसला !

विष्णु—नांगर? त्याच्या योगानें तर तो लागलाच तळाशीं जाईल !

वामन—निःसंशयच. त्यांनीं मला दुसरीही गोष्ट सांगितली. कांहीं तरुण अविचारी खलाशी जहाज हांकारून जात असतां तें एका बेटाच्या किनाऱ्यावर फुटलें. तेथें पाणी मिळण्याजोगें नव्हतें, आणि त्या खलाशांस तर पराकाष्ठेची तहान लागली होती. त्यांपैकीं एकाला थोडासा विचार करितां येत होता. त्याच्या मनांत आलें कीं, जरी जमिनीच्या पृष्ठभागावर पाणी नाहीं, तरी निदान दहा बारा फुटांच्या खालीं तरी पाणी लागेल. मग त्या जहाजांतून खोरीं व कुदळी आणवून ते सर्व जण मिळून खणूं लागले, तेव्हां त्यांस हवें तितकें पाणी लागलें.

विष्णु—ही फार चांगली गोष्ट आहे. त्यांनीं आणखी कांहीं सांगितलें काय?

वामन—हो, पुष्कळ; परंतु तें सर्व आतां माझ्या ध्यानांत नाहीं. त्यांनीं नांगराचे पुष्कळ प्रकार सांगितले, आणि ते ह्मणाले कीं, हे सर्व प्रकार विचारी मनुष्यांनीं हल्लींच्या पूर्ण स्थितीस आणिले आहेत. जहाज खुंटविण्याकरितां त्याला जाड लंगरदोर बांधून तो नांगराला

बांधितात, ह्मणून नांगर मोठा असणें अवश्य आहे. आणि त्या दोराचा मोठा ताण सोसण्याजोगा तो जड आणि बळकट असला पाहिजे. नांगराला पुष्कळ आंकडे असतात, त्यांतील एक तरी नेहमीं जमिनीवरून फरफटावा, ह्मणून त्या नांगराला एका बाजूवर पडण्यासाठीं दांडा असतो. आणि नांगर टाकल्याबरोबर जहाज स्थिर राहण्यासाठीं नांगरानें समुद्रांतील खडबडीत जमिनीस अथवा एखाद्या खडकास अडकून राहिलें पाहिजे, ह्मणून त्याला ते आंकडे असतात. ह्याप्रमाणें सर्वांची फोड करून सांगितल्यावर ते ह्मणाले कीं, ह्या लोकींच्या गोष्टींपासून स्वर्गलोकींच्या गोष्टी मनांत याव्या, आणि तेणेंकरून त्या आपणांस अधिक उपयोगाच्या व्हाव्या. विचारी मनुष्याला प्रत्येक वस्तूमध्यें ईश्वर दिसत असतो.

विष्णु– हें त्याला कसें कळावें? ईश्वर प्रत्येक वस्तूमध्यें आहे, हें त्याला कसें ओळखतां यावें?

वामन– लक्षांत ठेव, मीं 'विचारी मनुष्यास' असें ह्मटलें आहे. आतां माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे. गुरुजींनीं जे प्रश्न मला विचारिले होते, तेच मी तुला विचारितों. नांगराचा उपयोग काय?

विष्णु– मला वाटतें जेव्हां जहाज खुंटवावयाचें असतें, तेव्हां तें इकडे तिकडे वाहून जाऊं न देणें हा होय.

वामन—आणि जहाज कशाचें केलेलें असतें?

विष्णु—लांकडाचें. ह्यांत काय?

वामन—आणि लांकूड कोणीं उत्पन्न केलें?

विष्णु—ईश्वरानें.

वामन—नांगर कशाचा करितात?

विष्णु—मला वाटतें लोखंडाचा.

वामन—लोखंड कोठून निघतें?

विष्णु—जमिनींतून.

वामन—आणि जमिनींत लोखंड कोणीं ठेविलें?

विष्णु—कां बरें? ईश्वरानें.

वामन—ज्या झाडांचीं जहाजें करितात, तींच ईश्वरानें उत्पन्न केलीं आहेत असें नाहीं; परंतु त्यानें समुद्रही उत्पन्न केला आहे. तो त्यानें उत्पन्न केला आहे, म्हणून तो त्याचा मालक आहे. आणि ईश्वरानेंच ही जमीन उत्पन्न केली आहे. ह्यावरून पहा, ईश्वर समुद्रांत आहे, जहाजांत आहे, आणि नांगरांतही आहे. गुरुजी म्हणतात कीं, आपण ईश्वर प्रत्येक वस्तूंत पहावा, आणि प्रत्येक वस्तु ईश्वरामध्यें पहावी. पण तूं विचार करावयास शिकण्याला केव्हां आरंभ करणार? जर तूं उद्यां सहा वाजतां माझ्या घरीं येशील तर मी घरींच आहें. बरोबर सहा वाजतां ये. मी तुझी वाट पहात बसतों.

विष्णु—बरें, सहा वाजतां का होईना. परंतु जर तूं

अवघड गोष्टी सांगशील तर मला कठीण जाईल.

वामन—नाहीं नाहीं, माझ्यानें होतील तितक्या सोप्या सांगेन, आणि तूं किती जलद शिकतोस ह्याचें तुझें तुलाच आश्चर्य वाटेल. मला माहीत आहे, मी असाच जलद शिकत गेलों.

विष्णु—मी भोंवऱ्यापासून, चेंडूपासून, जंगी भोंवऱ्यापासून, आणि पतंगापासून आरंभ करूं ना? मला ते फार आवडतात.

वामन—त्या गोष्टी आपण योग्य वेळीं घेऊं, कांहीं चिंता करूं नको. पहिल्यानें कांहीं इतर गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. गुरुजी सांगतात कीं, मुलाला विचार करावयास शिकविल्यावांचून त्यास विद्या शिकविणें, ह्मणजे त्याला कांट्याकुट्यांतून ओढणें आहे. त्याला विचार करण्यास शिकविणें, ह्मणजे त्याच्या विद्येच्या मार्गांतील कांटेकुटे काढून टाकणें आहे.

विष्णु—हें सर्व मला चमत्कारिक वाटतें. कदाचित् मला ह्याविषयीं हळूहळू अधिक समजूं लागेल.

वामन—विचार करण्याची शक्ति प्रत्येक कामामध्यें आपणांस उपयोगीं पडते. जर वर्गामध्यें आपल्याला उदाहरण कसें करावें तें समजत नसलें, तर ज्याप्रमाणें आपल्या वर्गांतील सोबती आपल्या पाटीकडे पाहून कसें करावें तें सांगतो, त्याप्रमाणें ही शक्ति आहे.

विष्णु– अशीच जर ती आहे, तर ती मला अवश्य पाहिजे.

वामन– बरोबर विचार करितां आल्यानें श्रम हलके होतात, बुद्धीला तीव्रता येते, अक्कल वाढते, आणि मानसिक शक्ति दृढ होतात. मी नेहमींपेक्षां अधिक शहाणपणानें बोलतोंसें जर तुला कधीं वाटलें, तर तें मी गुरुजींपासून अथवा बापापासून शिकलों आहें असें तूं समज.

विष्णु– तुझ्याप्रमाणें मला बोलतां येण्याला पुष्कळ दिवस पाहिजेत. तुला इतक्या गोष्टी समजतात हें पाहून मला आश्चर्य वाटतें.

वामन– मी गुरुजींपाशीं आज चार वर्षें शिकत आहें, हें मनांत आण. विष्णु, तूं लहान असतांच तुझे वडील वारले, परंतु माझी गोष्ट तशी नाहीं. माझे वडील चांगले शहाणे आहेत. ते घरीं असले म्हणजे मला फार काळजीनें शिकवितात. असें असतां होईल तेवढेंही जर मी शिकलों नाहीं, तर मजसारखा निर्लज्ज मनुष्य कोणीही नाहीं.

विष्णु– तुला शिकविल्याप्रमाणें जर मला शिकविलें असतें, तर मलाही आज मितीला पुष्कळ समजूं लागलें असतें. पण विचार करावयास शिकण्यामध्यें तीन चार वर्षें घालविणें म्हणजे केवढा काळ हा !

वामन—होय, परंतु त्यापासून तुझें लागलेंच हित होऊं लागेल. प्रत्येक दिवशीं कांहींतरी तुला नव्या गोष्टी समजतील, आणि तुला आनंद होईल. अरे, पण आपण बोलत बसलों असतां तुझें जहाज एका बाजूवर लवंडलें! कोणी ह्मणेल ह्याला झोंपच आली! असो, उद्यां संध्याकाळीं सहा वाजतां मी तुझी वाट पहात बसतों.

विष्णु—बरें आहे, मी त्या वेळेस येईन; चुकणार नाहीं.

---

## भाग तिसरा.

विष्णु—वामन, मी अगदीं नेमल्या वेळेस आलों आहें, नाहीं? आतां नुक्तेच सहा वाजले.

वामन—होय विष्णु, बरोबर वेळेवर आलास, बैस. ही सगळी खोली आपली आहे. आपलें कांहीं भांडणबिंडण झालें तर तें आपल्यांतच राहील. बैस त्या खुर्चीवर.

विष्णु—तूं ह्या इतक्या वस्तु टेबलावर कशासाठीं मांडून ठेविल्या आहेस? मला विचार करण्याला शिकविण्यास काय?

वामन—आपण पाहूं; तुला माहीत आहे कीं, जेव्हां लहान मूल पहिल्यानें कांहीं शिकूं लागतें, त्या वेळेस

त्याला त्याच्या आसपासच्या मनुष्यांचीं, जनावरांचीं आणि वस्तूंचीं नांवें शिकवितात; आई, बाबा, कुत्रा, मांजर, दूध इत्यादि. मग त्याला मनुष्यांचे, जनावरांचे आणि वस्तूंचे गुण शिकवितात. नंतर त्याला बाबा आणि आई हीं मायाळू व चांगलीं असतात, कुत्रा भोंकतो, मांजर म्यांव म्यांव करितें, दूध गोड असतें वगैरे गोष्टी समजूं लागतात. हा विद्येचा आरंभ होय. पण तूं हें सर्व आणि ह्यापेक्षां कांहीं जास्तीही शिकला आहेस, ह्मणून तुला लहान मुलाप्रमाणें वागवून उपयोग नाहीं. तुला बहुतेक वस्तूंचीं नांवें माहीत आहेत. कोणतीही वस्तु पाहिल्याबरोबर तूं तिचें नांव सांगशील.

विष्णु—होय, पण वस्तूंचीं नांवें माहीत झाल्यानें मी विचार करण्यास कसा शिकेन ?

वामन—नाहीं, परंतु त्यांचें ज्ञान अवश्य आहे. त्यावांचून आपणांला पुढें जातां येणार नाहीं. दुसरी गोष्ट साध्य करून घेण्याला पहिल्या गोष्टीची अनुकूलता पाहिजे. घडवंची हें पुस्तक नव्हे, असें आहे तथापि उंच फळीवरील पुस्तक काढून घेण्यास तिची अवश्यकता आहे. त्याप्रमाणेंच वस्तूंचीं नांवें त्या वस्तूंविषयीं विचार करण्यास अवश्य आहेत. सध्यां वस्तूंविषयीं जी माहिती तुला आहे, ती वाढविणें हें तुझें पहिलें काम आहे. आमच्या आईबापांचा ममताळूपणा

आणि चांगूलपणा, कुत्र्याचें भोंकणें, मांजराचें म्यांव म्यांव करणें, आणि दुधाची गोडी ह्या शक्ति अथवा गुण होत. हें तूं समजतोस ?

विष्णु–होय, हें मला चांगलें समजतें.

वामन–मजजवळ जर बळकट आणि तिखट असा चाकू असला, तर बळकटी आणि तिखटपणा हे त्या चाकूचे गुण होत. आतां तुझे तूंच वस्तूंचे गुणधर्म शोधून काढावेस असें माझ्या मनांतून आहे, परंतु हें तुला विचार केल्यावांचून येणार नाहीं. आतां ये पुढें, आणि हें काय आहे तें मला सांग.

विष्णु–हें दुसरें काय असावयाचें आहे ? ही गारगोटी आहे.

वामन–आणि तिच्याविषयीं तुला काय वाटतें ? ती हातांत घे, आणि मला सांग.

विष्णु–हिच्याविषयीं काय विचार करावा हें मला समजत नाहीं. ही गारगोटी आहे; ह्याशिवाय दुसरें कांहीं माझ्या मनांत येत नाहीं.

वामन–बोटानें चांचपून पहा, कशी लागते ?

विष्णु–ही कठीण लागते.

वामन–कठीण लागते ह्मणजे काय ?

विष्णु–ह्मणजे—ह्मणजे—ती दाबली तर तिला खळगा पडणार नाहीं, किंवा फुटणार नाहीं.

वामन—फार चांगलें. आतां कठीण अशी दुसरी एखादी वस्तु तुला माहीत आहे काय?

विष्णु—हो, ही दऊत कठीण आहे, भिंत कठीण आहे, आणि ही जमीन कठीण आहे.

वामन—हें थोडेंसें मेण आहे; ह्याविषयीं तुझ्या मनांत काय येतें? हें हाताला कसें लागतें?

विष्णु—ओहो, हें मऊ आहे. हें दाबलें ह्मणजे ह्यावर आंगठा आणि बोटें उठतात.

वामन—मऊ पदार्थापासून कठीण पदार्थ जलद ओळखतां येणें फार अवश्य आहे. एकदां मीं नदीतीरच्या उंचवट्यावरून कठीण जमिनीवर ह्मणून उडी मारिली, पण गुडघ्या इतका गाळांत रुतलों!

विष्णु—हः हः हः, खरोखर चूक झाली! पण गारगोटीविषयीं सारें झालें का? कीं अजून आहे?

वामन—आहे; आणखी एकदां ती हातांत घेऊन पहा, आणि तुला काय वाटतें तें सांग.

विष्णु—ही कांहींशी गार लागते.

वामन—गार लागते ह्मणजे काय?

विष्णु—ह्मणजे ती—मला नाहीं समजत ती कशी लागते ती.

वामन—विचार कर, आणि गार ह्मणजे काय हें तुझ्यानें सांगवेल तितकें सांग. हं, कशी लागते?

विष्णु—ही थोडी पण अगदीं थोडी हो, बर्फासारखी लागते, आणि हिला स्पर्श केला ह्मणजे आंगावर किंचित् कांटा येतो.

वामन—उत्तम, तूं फार चांगलें सांगितलेंस. हळू हळू तूं चांगला विचारी होशील. जर तुला कोळपलेल्या निखाऱ्याला हात लावावयास सांगितलें, तर तूं ह्मणशील कीं, तो फार उष्ण आहे ह्मणून माझ्यानें त्याला बोट लाववणार नाहीं. आतां पदार्थांच्या गुणांचें ज्ञान हें विचार करण्यांत आणि बोलण्यांत किती उपयोगीं पडतें हें तुला समजलें असेल? एखादा पदार्थ फार थंड आहे, अथवा फार उष्ण आहे असें जर आपणांस दुसऱ्याला सांगावयाचें असलें, तर तो पदार्थ बर्फासारखा थंड, अथवा विस्तवासारखा उष्ण आहे असें ह्मणूं, ह्मणजे त्याला आपलें ह्मणणें लागलेंच समजेल.

विष्णु—होय, मी समजलों.

वामन—बरें तर, आतां आपण दुसऱ्या पदार्थाविषयीं बोलूं. ही पहा शिशाची गोळी. ही हातांत घे, आणि हिच्याविषयीं तुझ्या मनांत काय येतें तें सांग.

विष्णु—हिचा माझ्या हातावर दाब पडतो, आणि जड लागते.

वामन—आतां हा लांकडी बूच घेऊन पहा; हा शिशाच्या गोळीहून फार निराळा आहे.

विष्णु—होय, ह्याचा माझ्या हातावर दाब पडत नाहीं.

वामन—ठीक, तर मग हा फार हलका असला पाहिजे. पदार्थ एकमेकांपासून फार निराळे असतात हें आतां अगदीं उघड झालें. एक कठीण, दुसरा मऊ; एक ऊन, दुसरा थंड; एक जड, दुसरा हलका इत्यादि. ह्यावरून मीं तुला सांगितल्याप्रमाणें प्रत्येक पदार्थाच्या आंगीं त्याचे विशेष प्रकारचे गुण असतात. ह्या गुणांच्या ज्ञानाच्या योगानें ह्या पदार्थांचा कसा उपयोग करून घ्यावा, हें मानवी प्राण्याला शोधून काढितां येतें. मी मोठ्या विद्वानासारखा बोलतों आहें असें कदाचित् तुला वाटत असेल; पण तुला सांगतों, हें सर्व मला गुरुजींनीं शिकविलें आहे.

विष्णु—एखादा पदार्थ कठीण अथवा मऊ आहे, किंवा जड अथवा हलका आहे, ह्याचें ज्ञान झाल्यानें मनुष्यास त्याचा उपयोग कसा करून घेतां येतो ?

वामन—पदार्थांच्या गुणांचें आणि धर्मांचें ज्ञान हा बहुतेक सर्व सोयींचा, सुखाचा आणि ऐषआरामांचा पाया आहे. तो कसा तें मी तुला सांगतों. संसारामध्यें अति उपयोगी पदार्थ ह्मटले ह्मणजे अन्न, वस्त्र, विस्तव, आणि आश्रय हे होत. आपणांस अन्नाच्या गुणावगुणांचें ज्ञान नसलें, तर ज्यापासून आपणांस विकार होईल असले पदार्थ वारंवार खाऊन आपणच आपल्याला इजा करून

घेऊं. कारण, मनुष्याला गवत खाऊन राहतां येत नाहीं, घोड्याला मांसावर राहवत नाहीं, आणि गायीला मासे खाऊन राहतां येत नाहीं.

विष्णु—असें; मी समजलों.

वामन—जर आपणांस कापसाच्या आणि लोंकरीच्या गुणावगुणांचें ज्ञान नसलें, तर आपण उन्हाळ्यांत लोंकरीचींच वस्त्रें वापरून उकाड्यानें आपलें आंग शिजवून घेऊं; आणि हिंवाळ्यांत मलमलीचीं वस्त्रें वापरून थंडीनें कुडकुडून मरूं.

विष्णु—तुझ्या ह्मणण्याचा अर्थ आतां मी समजलों.

वामन—आपण गवताचा विस्तव केला, आणि लांकडाबदल त्यावर धोंडे रचले, तर तो अगदीं नाहींसा होईल. परंतु लांकडाचे जर गुणधर्म माहीत असले, तर आपणांला पाहिजे त्या वेळेस हवातसा विस्तव करितां येईल.

विष्णु—बरोबर आहे. पण हें अगोदर माझ्या लक्षांत कसें आलें नाहीं, ह्याचें मला आश्चर्य वाटतें.

वामन—त्याचें कारण एवढेंच कीं, अशा गोष्टींचा विचार करण्याचें आजपर्यंत तुझ्या ध्यानीं मनींही नव्हतें. जर आपण रानांतील काळ्या मातीचीं ढेंकळें जमा करून घर उभें केलें, तर तीं पावसाळ्यांत विरून जातील अथवा उन्हाळ्यांत ढांसळतील; आणि जर घरावर

कवलें घालण्याबदल कागद घातले, तर पावसाच्या पहिल्या सरीबरोबरच त्यांच्या चिंध्या होऊन जातील.

विष्णु–पदार्थांचे गुणावगुण जाणणें हें फार अगत्याचें आहे असें मला आतां समजलें; परंतु जर मीं पदार्थच पूर्वीं कधीं पाहिलेले नसले, तर त्यांचे गुणावगुण मीं कसे शोधून काढावे ?

वामन–तुझ्या इंद्रियज्ञानानें, अवलोकनानें, विचारानें आणि अनुभवानें. असो, तूतें तुझ्या सभोंवतीं असणाऱ्या पदार्थांचे गुणावगुण तुला समजले, ह्मणजे मग त्यांचा विचार करूं. ज्याप्रमाणें गारगोटीचा कठीणपणा, शिशाच्या गोळीचा जडपणा, आणि बुचाचा हलकेपणा तूं स्पर्शानें समजलास, त्याच रीतीनें तूं दुसऱ्या पदार्थांचे गुणावगुण शोधून काढशील. विचार करण्यास शिकतांना तुला एक गोष्ट आश्चर्यांत पाडील; ती ही कीं, पदार्थांमध्यें जितके गुणावगुण आहेत असें तुला माहीत आहे, त्यांपेक्षां तुला त्यांत पुष्कळ आढळतील. हा पैसा आहे, ह्याचे तूं दोन चार गुण सांगशील, त्याच्या पलीकडे तुला कांहीं सांगवणार नाहीं. पण मी तुजपेक्षां जास्ती विचार करावयास शिकलों असल्यामुळें ह्याचे तुला पंधरा सोळा गुण सांगेन.

विष्णु–एका पैशांत पंधरा सोळा गुण !

वामन–होय, त्यांपेक्षांही जास्त पाहिजे तर; आणि

शिवाय ह्याचे उपयोग वेगळेच. पैशाचा उपयोग तुला माहित आहे?

विष्णु—हो, त्याचे पेरू, केळीं, अथवा आंबेवगैरे घेतां येतात.

वामन—होय, आणि त्याचे दुसरेही उपयोग आहेत. एका पैशाचें दूध अथवा भाकर घेऊन भुकेनें तळतळत असलेल्या मनुष्यास दिली असतां त्याचे प्राण वांचतील; आणि एका पैशाचें देवाचें एखादें स्तोत्र घेऊन वाचिलें असतां अंतःकरण शुद्ध होऊन पुण्यप्राप्ति होईल. असो, आपली वेळ झाली; उद्यां आजच्याच वेळेस ये.

---

## भाग चवथा.

विष्णु— कसें काय वामन? टेबलावर पुष्कळ वस्तु तयार ठेविलेल्या आहेतसें दिसतें. तूं मला विचार करण्यास शिकवितोस, ही मजवर तुझी मोठी कृपा आहे; पण तुला मला मठ्ठ चेला मिळाला आहे.

वामन— असें नाहीं विष्णु, तुला विचार करण्याची थोडीशी संवय झाली ह्मणजे तूं भराभर शिकशील. मुंबई शहर एका दिवसांत एवढें मोठें झालेलें नाहीं; आणि तूं शिकत आहेस त्यापेक्षां मी पहिल्यानें लवकर शिकलों

असेन असें मला वाटत नाहीं. लेखनाविषयीं मीं एका पुस्तकांत असें वाचिलें आहे कीं:—

श्लोक.

ज्या नराची बहु प्रीती ॥ जडे प्रथम लेखनीं ॥
चांगल्या अक्षरां हर्षें ॥ तोचि साधील या जनीं ॥

ह्यावरून जर तुला विचार करण्याची आवड उत्पन्न झाली, तर मग तुला तें शिकण्याला फार सोपें जाईल; इतकेंच नाहीं, तर जगामध्यें ज्या आनंद देणाऱ्या गोष्टी आहेत त्यांतलीच ही एक आहे असें तुला वाटूं लागेल.

विष्णु—घोंटाळ्याच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन शिकण्यापेक्षां मी अधिक लवकर कशानें शिकेनसें मला वाटतें तें तुला सांगतों. तू ज्या रीतीनें एखाद्या वस्तूविषयीं विचार करितोस, ती रीति सांगशील तर तिचा मला फार उपयोग होईल.

वामन—तुझें ह्मणणें काय आहे तें स्पष्ट करून मला सांग, ह्मणजे माझ्यानें होईल तितकी मी तुला मदत करीन.

विष्णु—पहा, ह्या टेबलावर पुष्कळ वस्तु आहेत. आतां मला प्रश्न विचारीत बसण्यापेक्षां त्यांतील एक तूं घे, आणि तूंच तिजविषयीं विचार कर. एथें ही सुई आहे आणि ही पणती आहे. आतां ही पणती तुझ्यापुढें ठेव, आणि तिजविषयीं तूं विचार कसा करितोस तें

मला पाहूं दे, ह्मणजे दुसऱ्या वस्तूंविषयीं कसा विचार करावा हें कदाचित् मला समजेल.

वामन– फार चांगलें. बरें, ही पणती. हिजविषयीं मनांत विचार न करितां तुला समजावें ह्मणून मी मोठ्यानें बोलतों. पहिल्यानें हिचे गुणधर्म आणि भाग ह्यांविषयीं मला विचार करूं दे. ह्या कामांत माझीं पंचेंद्रियें, कान, डोळे, नाक, जीभ आणि कातडी, हीं मला मदत करितील. आपणांला पांच इंद्रियें आहेत हें तुला माहीत आहे.

विष्णु– होय, आणि तीं कोणचीं हें तूंही मला आतां नुक्तेंच सांगितलें आहेस.

वामन– होय, आतां इकडे लक्ष दे. माझे कान मला सांगतात कीं, ही कांहीं शब्द करीत नाहीं, ही स्तब्ध आहे. माझ्या डोळ्यांनीं मला दिसतें कीं, ही स्वच्छ, तांबूस, खरखरीत, खोलगट, कोरडी आणि वाटोळी आहे. ही नाकाला लाविली तर वास येत नाहीं ह्मटलें तरी चालेल. ही जिभेला लाविली असतां हिला कांहीं रुचि आहेसें वाटत नाहीं. माझ्या बोटाला ही खरखरीत आणि कठीण लागतें; आणि हिला ओलसर ओंठ लाविला असतां हिच्या आंगीं किंचित् चिकटपणा आहे असें लागलेंच समजतें. ह्यांशिवाय ही विस्तवांत घातली असतां वितळावयाची नाहीं; आणि ही मीं

मोडिली तर ही ठिसूळ आहे असें मला समजून येईल.

विष्णु–शाबास, कितीतरी गोष्टी तुझ्या मनांत एकदम आल्या ह्या !

वामन–हे पणतीचे गुण झाले; आतां हिचे उपयोग पाहूं. हिचा उपयोग दिवा लावण्याच्या कामीं होतो, आणि ही त्या कामाला अगदीं योग्य आहे. जर ही लांकडाची केलेली असती तर जळून गेली असती; शिशाची असती तर फार जड झाली असती आणि वितळली असती; आणि तांबें, पितळ, अथवा लोखंड ह्यांची केलेली असती तर हिला जास्ती किंमत पडली असती. ही आहे ह्यापेक्षां खोलगट असती तर हींत फार तेल घालावें लागतें, आणि उथळ असती तर हींत फार थोडें तेल मावलें असतें, हिचें बूड ह्यापेक्षां अरुंद असतें तर ही तेव्हांच लवंडती, आणि फार रुंद असतें तर बेढब दिसली असती. ही जशी असावयास पाहिजे तशी केलेली आहे.

विष्णु–मला आतां समजलें कीं, पणती ही जरी साधी वस्तु आहे तरी ती करण्यांत देखील पुष्कळ विचार करावा लागतो.

वामन–खरेंच. ही कुंभार लोक बहुतकरून तांबडमातीची चाकावर करितात, आणि मग भट्टींत घालून भाजतात. ह्याप्रमाणें हिच्या गुणांचा, भागांचा आणि

उपयोगांचा विचार झाल्यावर आणखी ज्या गोष्टी माझ्या मनांत येतात त्या मी आतां बोलतों. अशा गोष्टींस गुरुजी अनुषंगिक गोष्टी असें ह्मणतात.

विष्णु—आणखी ही पणती तुझ्या मनांत कोणच्या गोष्टी आणिते ?

वामन—त्या ह्या कीं, पहिल्यानें ही तयार करण्याच्या कामांत किती लोक लागले असतील हें मनांत येतें. तावानें तांबड्या लाल झालेल्या पणत्यांनीं भरलेल्या भट्टीकडे पाहिलें ह्मणजे नजर चक्क होऊन जाते. भट्टी निवाली ह्मणजे त्या वेंचून बाहेर काढितात, आणि मग त्या लहान मोठ्या असतील त्याप्रमाणें त्यांच्या प्रती लावितात. नंतर गाड्यांवरून अथवा दुसऱ्या वाहनांवरून त्या विकावयास नेतात. ह्या पणतीच्या गोष्टीवरून असें मनांत येतें कीं, ईश्वरानें दिलेल्या अशा हलक्या वस्तु देखील, आपण त्यांचा उपयोग करूं त्याप्रमाणें त्या सुख अथवा दुःख देतील.

विष्णु—एका पणतीवर किती विचार हे ! असें मला सुचलें नसतें. मला वाटलें होतें पणती हा हलका विषय आहे, ह्मणून तुला फारसे विचार सुचणार नाहींत; परंतु हें कांहीं निराळेंच झालें. हिच्यावरून जितके विचार तुझ्या मनांत आले तितके दुसऱ्या एखाद्या वस्तूवरून येतील काय ?

वामन—तुला हवें असलें तर पहा. आपल्यापुढें पुष्कळ वस्तु आहेत. तुला वाटेल ती वस्तु काढ; ह्मणजे ज्याप्रमाणें पणतीविषयीं मी बोलत गेलों, त्याप्रमाणें तिजविषयींही बोलत जाईन.

विष्णु—ही सुई घे. पण अशा लहान आणि अगदीं साधारण वस्तूविषयीं तुझ्या मनांत पुष्कळ कल्पना येतील असें मला वाटत नाहीं.

वामन—साधारण वस्तु बहुतकरून फारच उपयोगाच्या असतात. आतां आपण पाहूं. इकडे दे ती सुई. ही माझ्यापुढें पडलेली आहे. आतां नीट लक्ष दे. जसा मी पणतीवर विचार करीत गेलों तसा हिच्याविषयींही करूं लागतों. पहिल्यानें हिचे भाग आणि गुणधर्म, मग हिचे उपयोग, आणि शेवटीं हिच्या अनुषंगिक गोष्टी.

विष्णु—होय, ह्या नांवांची मला चांगली आठवण आहे.

वामन—बरें तर, आतां मी मोठ्यानें विचार करितों. ही सुई सरळ आणि निमुळत्या आकाराची आहे. हिला तिखट टोंक आहे, आणि हिचें डोकें थोडेसें चपटें आहे. ही चकचकीत आहे. ही बोटानें चांचपून पाहिली ह्मणजे कठीण आणि अगदीं गुळगुळीत लागते. परंतु हिला टोंक कां बरें? तें ही दुसऱ्या प-

दार्थांत घुसवितां यावी ह्मणून असलें पाहिजे. हिला हें नेडें कां आहे? शिवते वेळीं हिच्यांत दोरा अडकवितां यावा ह्मणून; ही गुळगुळीत कां? ही ज्यांत खुपसावी त्यांतून सहज पार जावी ह्मणून. सुईचा उपयोग काय? नाना तऱ्हेच्या कापडांचे कपडे शिवण्यास, आणि दुसऱ्याही पुष्कळ कामास.

विष्णु–वाहवा, सुईवर जें जें बोलावयाचें तें सर्व तूं बोललास. तूं तिच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सांगत गेलास.

वामन–अझून मी हिच्याविषयीं बोलतों ऐक. सुया कशाच्या करितात? त्या बहुतकरून लोखंडाच्या किंवा पोलादाच्या करितात, तथापि ही पोलादाची केलेली आहे. लोखंड हें एका विशेष प्रकारानें शुद्ध केलें ह्मणजे त्यास पोलाद ह्मणतात. लोखंड जमिनींतून खणून काढितात. तें जमिनींतून वर काढण्याला पुष्कळ मनुष्यें, आणि त्याप्रमाणेंच खोरीं, कुदळी, टोपल्या, दोरखंडें, आणि अनेक यंत्रें हीं लागतात. मग तें मोठ्या भट्टींत घालून वितळवितात, आणि निरनिराळ्या रीतींनीं शुद्ध करितात.

विष्णु–काय! हे इतके श्रम एका सुईसाठीं?

वामन–होय, पण इतकेच काय, आणखी पुष्कळ; मी विचार करीत जातों पहा. सुया करण्यासाठीं पोलाद

तयार झालें, ह्मणजे मग एक मनुष्य त्याची तार काढितो; दुसरा ती सरळ करितो; तिसरा तिचे हव्या तितक्या लांबीचे तुकडे पाडितो; चवथा टोंकें करितो; पांचवा तिला घांसून तयार करितो; सहावा नेडें करितो; सातवा तीस जिल्हई देतो; आठवा त्या कागदांत घालून पुड्या करितों; आणि नववा त्या पुड्यांची पुडकीं बांधितो.

विष्णु–हें पणतीपेक्षांही चमत्कारिक आहे !

वामन–सुईपासून आणखी ज्या गोष्टी मनांत येतात त्या, आणि तिच्या अनुषंगिक गोष्टी ह्या सर्व मी सांगूं लागलों तर तुला ह्यापेक्षांही चमत्कार वाटेल. खाणी खणण्यास, तेथें काम करण्यास, धातु गाळण्यास, शुद्ध करण्यास, ओढण्यास, सरळ करण्यास, तोडण्यास, टोंकें करण्यास, घांसण्यास, नेडीं करण्यास, जिल्हई देण्यास, पुड्या करण्यास आणि त्यांचीं पुडकीं बांधण्यास इत्यादि कृत्यांस जीं मनुष्यें कामावर लाविलेलीं असतात, त्यांस उदरपोषण करावयाचें असतें; तरी त्यापैकीं कांहीं जण आळशी आणि चुकारतट्टू असतील; आणि कांहीं उद्योगी आणि मनापासून काम करणारीं असतील असें मला वाटतें. हा सुया करण्याचा धातु ईश्वरानें उत्पन्न केला आहे, आणि त्या करण्यास मनुष्यास सामर्थ्य दिलें आहे; ह्मणून ह्या

लहानशा परंतु उपयुक्त वस्तूपासून ज्याप्रमाणें मनुष्याचें चातुर्य आपल्या नजरेस स्पष्टपणें येतें, त्याप्रमाणेंच ईश्वराचा चांगुलपणा नजरेस यावा.

विष्णु—फार चांगलें बोललास. तुजप्रमाणेंच मीं शहाणें व्हावें, ह्मणून विचार करण्यास शिकण्याला मी अगदीं आळस करणार नाहीं.

वामन—आणि करशील असें कोण ह्मणतो ? मला वाटतें तूं मजपेक्षांही शहाणा होशील; परंतु गर्विष्ठ आणि अभिमानी न होण्याविषयीं तुला जपलें पाहिजे. थोडा अभिमान पुष्कळ ज्ञानाची खराबी करून टाकितो; ह्मणून आपण त्याविषयीं सावध रहावें. असो, उद्यांबरोबर सहा वाजतांये.

---

## भाग पांचवा.

विष्णु—वामन, आज जरा मला उशीर झाला. आईनें मला दिनकररावाकडे पाठविलें होतें. मी तेथें गेलों तेव्हां ते आपलीं मुलें घेऊन सोप्यावर बसले होते. ते गरीब आहेत तरी त्यांचें घर नेहमीं असें स्वच्छ असतें कीं ज्याचें नांव तें. तेथें मी त्यांच्याशीं कांहीं वेळ बोलत बसलों होतों.

वामन—चिंता नाहीं विष्णु, आपण आतांच उद्यो-

गास लागूं या ह्मणजे झालें. ह्या पहा, पुष्कळ वस्तु ठेविलेल्या आहेत. आज तूं ह्यांचे गुणधर्म मला सांग. ही खडीसाखर आहे; हिजविषयीं तुझ्या मनांत काय विचार येतात? हिच्यामध्यें कोण कोणचे गुण आहे- तसें तुला वाटतें?

विष्णु–ही पांढरी आहे आणि खडबडीत आहे.

वामन–हें पहा, तुला एखादा गुण आढळला, कीं लागलेंच तो गुण ह्मणजे काय हें मला सांगत जा. खडबडीत ह्मणजे काय?

विष्णु–ह्मणजे हिचे खडे वाकड्या तिकड्या आ- काराचे असतात.

वामन–बरें, हिच्या आंगीं दुसरे कोणचे गुण आहेत? थोडी खाऊन पहा.

विष्णु–ही गोड आहे. ही आनंदानें मिटक्या मा- रीत खावीशी वाटते.

वामन–हा तुरटीचा खडा चाखून पहा, आणि हाही तुला मिटक्या मारीत खावासा वाटतो कीं नाहीं सांग.

विष्णु–नाहीं, कारण हा आंबट आहे, त्यामुळें माझें कसेंसेंच तोंड झालें.

वामन–गोड आणि आंबट ह्यांमध्यें काय भेद आहे हें तुला चांगलें समजतें. जसजसा तूं विचार करीत जाशील, तसतसें तुला अधिक समजूं लागेल. आतां

ऐक. दृष्टीनें पाहून, बोटानें चांचपून, अथवा जिभेनें चाखून समजण्यांत येणारे असे गुण पदार्थांमध्यें पुष्कळ असतात. तसेंच लवकर न समजण्यासारखेही दुसरे कितीएक गुण त्यांत असतात. जी ही खडीसाखर तूं तोंडांत घालून पाहिलीस ही विद्राव्य आहे.

विष्णु—पण विद्राव्य ह्मणजे काय हें मला समजलें नाहीं.

**वामन**—विद्राव्य ह्मणजे ती पाण्यांत अथवा दुसऱ्या पातळ पदार्थांत घातली असतां विरघळते, आज सकाळीं मी संध्या करीत बसलों असतां आमच्या धाकटचा सद्यानें खडीसाखरेच्या रंगाच्या गारगोटीचा लहानसा तुकडा आणून माझ्या पंचपात्रींत टाकिला. तेव्हां मला प्रथम ती खडीसाखर आहेशी वाटली, परंतु कांहीं वेळानें खडीसाखर विरघळते तसा हा विरघळत नाहीं असें पाहून मीं तो हातांत घेऊन नीट पाहिला, तों ती गारगोटी आहे असें माझ्या लक्षांत आलें. गारगोटी विद्राव्य नाहीं.

विष्णु—ही त्यानें गंमतच केली ह्मणावयाची.

वामन—होय, परंतु मीं ती खडीसाखर समजून गिळिली असती ह्मणजे मग गंमत बाहेर पडली असती. अगोदर कोणाचीही थट्टा करूं नये, पण करावयाचीच झाल्यास फार विचारानें केली पाहिजे. कारण, थट्टेमध्यें

पुष्कळ वाईट प्रसंग घडून येतात; आणि थट्टा करणारा अपराधी होतो. असो, एखादी वस्तु हातांत घेऊन पाहिली असतां कठीण आहे किंवा मऊ आहे, जड आहे किंवा हलकी आहे, खडबडीत आहे किंवा गुळगुळीत आहे, सरळ आहे अथवा वांकडी आहे, गोड आहे किंवा आंबट आहे, आणि ठिसूळ आहे अथवा चिवट आहे, हें तूं ओळखून काढशील असें मला वाटतें. आणि जरी तुला ह्यांपैकीं कांहीं स्पष्ट करून सांगतां येणार नाहींत, तरी हे गुण काय आहेत हें तुला समजेल; परंतु आणखी तुला माहीत नाहींत असे दुसरे कांहीं गुण आहेत.

विष्णु—कोणचे बरें ते? मला सांग.

वामन—ते सर्व सांगण्यास आतां वेळ नाहीं, परंतु तुला हवा असल्यास एखाददुसरा सांगतों, ही खडीसाखर कठीण, गोड, स्वच्छ, कळकळीत, आणि विद्राव्य आहे, विद्राव्य ह्या शब्दाचा अर्थ तुला सांगितला आहेच; परंतु हा अपारदर्शक आणि द्राव्य आहे, असें मीं ह्मटलें तर अपारदर्शक आणि द्राव्य ह्मणजे काय हें तुला समजणार नाहीं असें मला वाटतें.

विष्णु—अंहं, नाहीं समजणार.

वामन—ज्या पदार्थामधून पाहिलें असतां पलीकडचें कांहीं दिसत नाहीं, तो अपारदर्शक होय. भिंगांतून पाहिलें तर पलीकडचें सर्व कांहीं दिसतें ह्मणून भिंग पारदर्शक

आहे. खडीसाखर दिव्यावर धरिली ह्मणजे वितळूं लागते. पाण्यांत अथवा दुसऱ्या पातळ पदार्थांत विरघळणारे जे पदार्थ ते विद्राव्य होत, आणि दिव्यावर अथवा विस्तवांत वितळणारे पदार्थ ते द्राव्य होत.

विष्णु—समजलों, पण ह्या आपल्यापुढें असलेल्या टेबलाविषयीं जर तूं कांहीं बोलशील तर फार चांगलें होईल. कारण, काल एथून गेल्यावर मी त्याविषयीं विचार करीत बसलों होतों, तेव्हां त्याची वरची फळी गुळगुळीत आहे, त्याला चार पाय आहेत आणि तें लिहिण्याच्या उपयोगीं आहे,एवढेंच काय तें माझ्या मनांत आलें.

वामन—तरी पुष्कळ आलें ह्मणावयाचें. कोणत्याही गोष्टीवर विचार करूं लागलें असतां आपल्या ज्ञानाचा, विचारशक्तीचा; स्मरणशक्तीचा, आणि कल्पनांचा आपणांस फार उपयोग होतो. जसजशी तुझी माहिती वाढत जाईल तसतसे तुला अधिकाधिक विचार सुचत जातील.

विष्णु—पण टेबलाबद्दल तुझे विचार काय आहेत ते मला ऐकूं दे. बोल पाहूं.

वामन—का होईना. हें सागाचें टेबल भरींव, कठीण, अपारदर्शक, आणि ज्वालाग्राही आहे. जो पदार्थ पेट घेणारा असतो तो ज्वालाग्राही होय. ह्याचे भाग—वरची सपाटी, कोपरे, खण आणि पाय हे आहेत. हें जंगम आहे, ह्मणजे हें एका जाग्यावरून दुसऱ्या जागीं नेतां

येतें. हें मुख्यत्वेंकरून कागद व पुस्तकें ठेवण्याच्या आणि लिहिण्याच्या उपयोगीं आहे. आतां मी ह्यापुढें काय सांगेनसें तुला वाटतें ?

विष्णु—बहुतकरून तूं अनुषंगिक गोष्टींला आरंभ करशील; खरें कीं नाहीं ?

वामन—होय, आतां त्याच आल्या. सागाचीं झाडें मुंबईत अगर पुणें प्रांतांत होत नाहींत. हीं मलबार देशांत फार होतात. हीं बहुतकरून सरळ उंच वाढत जातात. ह्यांस आडव्या तिडव्या फांद्या फारशा फुटत नाहींत. वारा सोंसाट्यानें वहात असला ह्मणजे हीं एकसारखीं झोंके खात असतात, आणि कांहीं उमळून देखील पडतात. ह्या झाडांवरून अनेक पक्षी घरटीं बांधून रहातात. हीं झाडें तोडावयाचीं असल्यास पंधरा वीस मनुष्यें कुऱ्हाडी व दोरखंडें घेऊन जंगलांत जातात, आणि मग आपणांस पाहिजे असतील तसलीं झाडें पाहून तोडावयास आरंभ करितात. झाड खालीं पडलें ह्मणजे पहिल्यानें त्याची पालवी आणि फांद्या तोडितात. मग राहिलेल्या सोंटाची साल काढून जितक्या लांबीचें लांकूड हवें असेल त्या मानानें त्या सोंटाचे तुकडे पाडितात, आणि नंतर ते समुद्रकिनाऱ्यापर्यंत आणून गलबतावर चढवितात, आणि हव्या त्या देशास घेऊन जातात. मग तीं लांकडें आणिलीं ह्मणजे सुतारलोक त्यांचें मोज

माप घेऊन हवेत तसे जाड अथवा बारीक तुकडे करितात, अथवा करवतून तक्के पाडितात. हें लांकूड इमारतीच्या कामास फार उपयोगीं आहे, ह्मणून त्या कामाकडेच ह्याचा बहुतेक भाग लागतो, आणि लहान सहान तुकडे व फळ्या राहतात त्यांचीं टेबलें आणि इतर सामान तयार करितात.

विष्णु–वाः, तूं तर अगदीं शेवटापर्यंत आलास. असें मला कधीं बोलावयास येईल कोण जाणे.

वामन–तूं उमेद धरून शीक, ह्मणजे तुलाही असेंच येऊं लागेल. बरें, आतां उद्यां ये.

---

## भाग सहावा.

विष्णु–वामन, हा मी आलों. आतां जे गुणधर्म मला समजत नाहींत ते तूं सांगशील काय ?

वामन–होय सांगतों. काल गुरुजींचें मला पत्र आलें आहे तें अगोदर तुला दाखवितों. त्यावरून ते मजवर किती लोभ करितात हें तुला समजेल.

विष्णु–त्यांत काय लिहिलें आहे ?

वामन–मला तुजपेक्षां थोडेंसें जास्ती समजतें, ह्मणून मीं गर्विष्ट होऊं नये असें त्यांत लिहिलें आहे.

त्यांना जगाचा पुष्कळ अनुभव असल्यामुळें, तुला व मला मनुष्याच्या अंतःकरणाची जितकी पारख आहे, त्यापेक्षां त्यांस पुष्कळ अधिक आहे. असो, आतां पत्र ऐक ह्मणजे झालें.

"चिरंजीव वामन ह्यासः-

अनेक आशिर्वाद विशेष- तूं विष्णूला विचारशिक्षा शिकविण्याचें काम हातीं घेतलें आहेस, परंतु तूं गर्व आणि अभिमान ह्यांविषयीं सावध रहा. कारण, ते केंव्हां हृदयांत शिरतील ह्याचा नेम नाहीं. विष्णूला जें ज्ञान आहे त्यापेक्षां मला पुष्कळ अधिक आहे असें मनांत न आणितां, शहाण्या विद्वान मनुष्यांपेक्षां तुला किती कमी आहे हें मनांत आणीत जा. गर्व करणें हें मूर्खपणाचें लक्षण आहे. गर्विष्ट मनुष्य कधींही शहाणा व्हावयाचा नाहीं. ह्या माझ्या थोड्याशा उपदेशाचें लक्षपूर्वक मनन कर, आणि हा नेहमीं वाचीत जा; ह्मणजे तुला विस्मरण पडणार नाहीं. कळावें हे आशिर्वाद."

पाहिलेंस? मी तुला शिकवीत असतां मला स्वतःविषयींही कांहीं विचार केला पाहिजे. असो, आतां आपण पुढें चालवूं या. अंतर्गोल ह्मणजे वाटीच्या आंतील बाजूप्रमाणें; ही कुमारीची वाटी आंतल्या बाजूनें अंतर्गोल आहे. बाह्यगोल ह्मणजे चेंडूच्या बाहेरील बाजूप्रमाणें; ही गोटी बाह्यगोल आहे. खनिज ह्मणजे खाणींत ज-

न्मणारें किंवा सांपडणारें; सोनें हें खनिज आहे. कृत्रिम ह्मणजे कृतीनें केलेलें; तो चेंडू कृत्रिम आहे.

विष्णु—हो, बरी आठवण झाली, तूं भोंवऱ्याविषयीं आणि चेंडूविषयीं अद्यापि मला कांहीं सांगितलें नाहींस.

वामन—सर्व कांहीं हळू हळू येईल, काळजी करूं नको. सगंध ह्मणजे ज्यापासून गंध अथवा वास सुटतो तें; हें केशर सगंध आहे. तिक्त ह्मणजे चुरचुरणारें, अथवा मिरचीप्रमाणें तिखट लागतें तें. स्थितिस्थापक ह्मणजे उडणारा अथवा उसळणारा; हा रबराचा तुकडा स्थितिस्थापक आहे. चिक्कण ह्मणजे गोंदासारखा चिकट. औषधीय ह्मणजे बरें करणारें; आजारी मनुष्याला बरी करिते अशी वस्तु. कुंचनीय ह्मणजे जें सहज वांकतें तें; जशी वेताची छडी. ह्या सांगितलेल्या गुणांपैकीं कांहीं तुझ्या ध्यानांत रहातील काय ?

विष्णु—होय, हे सर्व माझ्या ध्यानांत रहातील.

वामन—बरें तर, आणखी थोडे सांगतों. दाहक ह्मणजे जाळणारें; आगपाणी हें जाळणारें आहे. तंतुमय ह्मणजे ज्यामध्यें दोर असतात तें; केळीचें सोप तंतुमय असतें. बंधक ह्मणजे बांधणारें, अथवा ओढून घेणारें; कातडी रंगविण्यामध्यें बाभळीच्या सालींचा उपयोग करितात ती बंधक असते. सकोण ह्मणजे ज्याला कोन असतात तें; ती पेटी सकोण आहे. विरलावयव ह्म-

णजे स्पंजासारखें पुष्कळ छिद्रांचें, आणि पातळ पदार्थ शोषून घेणारें; हा पंचा विरलावयव आहे. प्रसारक्षम ह्मणजे हवा तो आकार देतां येण्याजोगें; हा तांब्याचा तुकडा प्रसारक्षम आहे. संलग्नशील ह्मणजे एके ठिकाणीं घट्ट होऊन रहाणारें; जसें कठीण लांकूड. घनवर्धनीय ह्मणजे घणानें ठोकिलें असतां वाढणारें; सोनें हा घनवर्धनीय धातु आहे. विभेद्य ह्मणजे ज्याचे तुकडे करितां येतात तें; केळें हें विभेद्य आहे. आतां शेवटीं आणखी एकच सांगतों. क्षणस्थाई ह्मणजे नाहींसें होणारें, अथवा थोडावेळ रहाणारें; ढग हे क्षणस्थाई आहेत. ह्या आणि दुसऱ्या गुंणांचें ज्ञान विचार करण्यास शिकण्यामध्यें फार उपयोगीं आहे.

विष्णु— हे बहुतेक माझ्या ध्यानांत रहातील.

वामन— बरें, कागद हा कृत्रिम आहे किंवा अकृत्रिम आहे?

विष्णु— कृत्रिम; कारण, तो कृतीनें केलेला आहे, अकृत्रिम नव्हे.

वामन— शाबास, लेखणी ही कृत्रिम किंवा अकृत्रिम आहे?

विष्णु— अकृत्रिम; कारण, बोरू जमिनीवर आपोआप होतात.

वामन—बोरू अकृत्रिम आहे, परंतु लेखणी कृत्रिम आहे.

विष्णु—होयरे होय, खरेंच. ती चाकूनें करितात हें मी विसरलों.

वामन—ह्या वाटीचा बाहेरल्या बाजूनें आकार कसा आहे?

विष्णु—अंतर्गोल—अरे नाहीं! बाह्यगोल आहे. ही बाहेरून वाटोळी ह्मणजे चेंडूसारखी आहे.

वामन—जर ही गुलाबपाण्याची बाटली तुझ्या हातांतून खालीं पडून लवंडली, तर जमिनीवर सांडलेलें गुलाबपाणी कशानें टिपून घेशील?

विष्णु—तें पाणी शोषून घेण्यास कांहीं तरी विरलावयवांचा पदार्थ घेतला पाहिजे. तें स्पंजानें अथवा फडक्यानें चांगलें होईल.

वामन—ही वेताची छडी प्रसारक्षम आहे काय?

विष्णु—नाही; कारण, हिला हवा तो आकार देतां येणार नाहीं, ह्मणून ही प्रसारक्षम नव्हे; तंतुमय आहे.

वामन—बरें, ही लोखंडाची पट्टी सगंध आहे, का चिक्कण आहे, का दाहक आहे तें सांग.

विष्णु—सगंध तर नाहींच, पण चिक्कण असावीसें वाटतें. थांब मला विचार करूं दे—नाहीं, ती चिक्कणही नाहीं आणि दाहकही नाहीं हें खास.

वामन—तूं चांगला विचार करूं लागलास. बरें, आतां हिच्या आंगीं कोणकोणचे गुण आहेत तें सांग.

विष्णु—हिला चार कोपरे आहेत ह्मणून ही सकोण आहे, आणि प्रसारक्षम आहे. आणखी मला पाहूं दे हो. हो, ही घनवर्धनीयही आहे.

वामन—होय; हे गुण तुझ्या लक्षांत चांगले राहिले आहेत. हळू हळू हें तुझें ज्ञान तुझ्या कामीं चांगलें पडेल. काल रात्रीं मी एक पुस्तक वाचीत होतों, त्यामध्यें पुष्कळ उपयुक्त गोष्टी लिहिलेल्या आहेत. त्यांतील एक मी तुला वाचून दाखवितों. “ ही खुर्ची पहा. ही तयार होण्यास पुष्कळ विचार लागलेला आहे. मनुष्याला जमिनीवर बसतां येतें, परंतु बसावयास कांहीं तरी उंच असावें हें जास्ती सोईचें आहे. मनुष्याला घराबाहेर कोठें तरी बसावयाचें झालें, ह्मणजे तो एखाद्या मोठ्याशा धोंड्यावर अथवा लांकडाच्या खोडावर जाऊन बसतो, आणि घरांत असला ह्मणजे जोत्यावर अथवा वळकटीवर बसतो. परंतु वळकटी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बसावयास नेतां येत नाहीं, ह्मणून विचारानें घडवंची फायदेशीर दिसूं लागली. परंतु हात आणि पाठ टेंकण्यास कांहीं तरी लागतें, ह्मणून त्या घडवंचीला मग खुर्चीचें रूप प्राप्त झालें. पुढें खुर्चीवर नकशी करूं लागले. ह्या योगानें ती सुंदर आ-

णि उपयोगी अशी बनली." असा हा खुर्चीचा इतिहास आहे.

विष्णु—हा खुर्चीचा इतिहास तर गमतीचा आहे बुवा. ह्या रीतीनें आपणांजवळ असणाऱ्या वस्तूंचा जर मला विचार करितां येईल तर बहार होईल.

वामन—ह्यांत आणखी दोन अशाच पण लहान गोष्टी आहेत, त्या तुला वाचून दाखवूं काय ?

विष्णु—हो हो, दोन्ही वाच.

वामन—ही पहिली तर मुलांच्या विचारास उत्तेजन देणारी आहे; ऐक. " मुलानें जर आपल्या कपड्याकडे लक्ष दिलें, तर त्याला असें आढळून येईल कीं, कपड्याचा उपयोग ह्मटला ह्मणजे हातपाय हालविण्यास कांहीं पंचाईत न पडतां शरीरांत ऊब रहावी, आणि हवेच्या कडकपणापासून त्याचें रक्षण व्हावें हा होय. ह्मणून कपडे बळकट, टिकाऊ, मऊ, आणि उबदार असे असावे. आतां लोखंड बळकट असतें, कमाविलेलें कातडें टिकाऊ असतें, आणि रेशीम मऊ असतें; परंतु लोखंड, कातडें अथवा रेशीम ह्यांपैकीं एकाच्याही कपड्यापासून व्हावें तसें सुख होणार नाहीं. कपडे अशा पदार्थांचे केलेले पाहिजेत कीं, त्यांत वरील सर्व गुण असावे. असा पदार्थ ह्मटला ह्मणजे कापूस अथवा लोंकर होय." आतां ही दुसरी गोष्ट ऐक. " छत्री

असली ह्मणजे आपण पावसांत भिजून जाणार नाहीं, आणि भर उन्हांत आपणांला फारसें ऊनही लागणार नाहीं. हें प्रत्येक मुलाला माहीत आहे, परंतु आपल्यास ह्या जरूरीनें लागणाऱ्या वस्तूंच्या आंगीं अवश्य असे कोण कोणचे गुण असावे, ह्याचा विचार एक देखील मुलगा करीत नाहीं. छत्रीच्या कापडाची विणकर चांगली असली पाहिजे; त्या कापडानें पाऊस आंत येऊं देतां कामा नये; छत्रीचा आकार बेताचा असावा, नाहीं तर ती अगदीं लहान होईल, अथवा उगीच फताडी होऊन बसेल; ती वाऱ्याला आडविण्याजोगी बळकट आणि स्थितिस्थापक असावी; ती सहज हातांतून नेण्यां-जोगी हलकी असावी; आणि पाहिजे तेव्हां तिची लहा[illegible] गुंडाळी करितां यावी. हीं

विष्णु—उत्कृष्ट ! मी या पूर्वींच विचार करावयास शिकूं लागलों असतों तर बरें झालें असतें.

वामन—हें तुझें बोलणें ऐकून मला संतोष होतो. दुसऱ्याला विचार करण्यास शिकविण्याचें अवघड आहे खरें, परंतु त्याची त्याला गोडी लावण्याचें तर त्याहूनही फार अवघड आहे. ज्या जगाकडे देवांनींही टकमक पहात रहावें, अशा चमत्कारांनीं भरलेल्या जगामध्यें आपण राहिलेले आहों. असें असतां जर आपण आपल्या ज्ञानानें त्याचा चांगला उपयोग केला नाहीं,

तर ईश्वरानें जी ही आपणांस उत्तम देणगी दिली आहे तिचा धिःकार केल्यासारखें होईल. असो, आतां आपण उद्यां बोलूं.

---

## भाग सातवा.

वामन—विष्णु, आलास, बरें झालें. पण आज मला फारसा वेळ नाहीं. ये, बैस.

विष्णु—तर आपण लवकर आरंभ करूं या; तूं सांगितलेले सर्व गुण माझ्या लक्षांत आहेत.

वामन—बरें तर, आतां मी तुला विचारितों. कोणत्याही वस्तूविषयीं विचार करितांना कोण कोणच्या तीन गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत बरें ?

विष्णु—पहिल्यानें तिचे गुण, मग तिचे उपयोग, आणि मग तिच्या अनुषंगिक गोष्टी.

वामन—बरोबर. परवां गारगोटीवरून तुला काय विचार सुचतात ह्मणून मीं विचारिलें होतें, त्या वेळेस तूं ह्मणाला होतास कीं, " तिजविषयीं काय विचार करावा हें मला समजत नाहीं; ही गारगोटी आहे, ह्यावांचून माझ्या मनांत दुसरें कांहीं येत नाहीं. " मला वाटतें आतां तूं तसें उत्तर देणार नाहींस?

विष्णु—नाहीं देणार.

वामन– तर ही गारगोटी पुन्हा हातांत घे, आणि हिजविषयीं तुझ्या मनांत काय काय येतें तें मला सांग. त्यावरून विचार शिक्षेमध्यें तुझें पाऊल पुढें पडतें आहे कीं नाहीं हें आपणांस समजेल.

विष्णु– बरें आहे; पण मी भलतेंच बोललों तर हंसूं मात्र नको.

वामन– हः हः! चांगल्या हेतूनें हंसलें तर तें कांहीं वाईट नाहीं. दुसऱ्याची उगीच टर उडवावयासाठीं हंसावयाचें तें मात्र वाईट. मी हंसलों तर आनंदानें हंसेन, आणि त्यापासून तुला वाईटही वाटावयाचें कारण नाहीं. गुरुजी ह्मणतात कीं, आपले स्नेही आपणांस भलत्यां-संवयी लावितील ही मोठी भीति असते, परंतु जर अध्यें पण त्यांस 'नाहीं' ह्मणावयास आणि त्यांचें हंसें सोशी-सण्यास तयार झालों तर मात्र ही भीति मुळींच बाळ-गावयास नको. हं, आतां गारगोटीविषयीं चालूं दे.

विष्णु– गारगोटी ही कठीण थंड, जड, भरींव, अपार-दर्शक, आणि अकृत्रिम वस्तु आहे. ती चकमकीस आणि बंदुकीच्या घोड्यास लावण्याला उपयोगीं पडते.

वामन– वाः, फार चांगलें सांगितलेंस. आणखी तुझ्या मनांत काय येतें.

विष्णु– अंधारांत गारगोटीवर गारगोटी आपटली ह्मणजे ठिणग्या दृष्टीस पडतात. आणि ती बंदुकीस

लाविलेली असते त्यावरून बंदुकीविषयीं आणि शिपायां-विषयीं माझ्या मनांत विचार येत आहेत.

वामन— शाबास, तूं कांहीं दिवसांनीं विचारी होशील. तूं झपाट्यानें शिकत चालला आहेस. 'गार ती गार' असें ह्मणण्यापेक्षां हें फार चांगलें.

विष्णु— होय; तें काय भिकार उत्तर होतें.

वामन—आपण विचार करीत असतां खुबीदार तर्क आणि साधारण माहिती किती उपयोगीं पडते, आणि त्यांपासून विचार कसे वाढत जातात हें मी आतां तुला दाखवितों. अंधारांत गारगोटीवर गारगोटी आपटली णजे त्यांतून विस्तव पडतो हें तुझ्या मनांत आलें, हां गारगोटीमध्यें देखील मानवजातीस उपयोगीं डण्यासारखा गुण ईश्वरानें ठेवून दिला आहे हें तुझ्या मनांत यावें; विस्तवापासून आणि उजेडापासून होत असलेल्या सुखाविषयीं तुझ्या मनांत विचार यावे; आणि हीं ईश्वरी कृपेचीं सुखें मनांत आल्याबरोबर बिचाऱ्या आंधळ्यांची स्थिति तुझ्या मनांत येऊन तुला त्यांची दया यावी; आणि ईश्वरानें तुला चांगली दृष्टि दिली आहे ह्मणून तुला आनंद व्हावा. जर हें आकाश, सूर्य, चंद्र, हिरवींगार शेतें, झाडेंझुडपें आणि आपले आप्त ह्या सर्वांस आपणांस पाहतां आलें नसतें, तर आपला फार तोटा झाला असता.

विष्णु– तुजप्रमाणें मला विचार करितां येणार नाहीं, तरी पण जसजसा मी शिकत जाईन तसतसा सुधारेन, असें मला वाटतें.

वामन– विचारी मनुष्यास साधारण वस्तूपासून देखील ज्ञान आणि कर्मणूक हीं प्राप्त होतात. खुर्ची, कपडे, छत्री, ह्यांच्या रचनांविषयींचे विचार त्याच्या मनांत आले, ह्मणजे त्यांपासून अडकित्त्याच्या रचनेपासून तों वाफेच्या यंत्राच्या रचनेपर्यंत, आणि अगदीं लहान झोंपडीच्या रचनेपासून तों मोठ्या राजवाड्याच्या रचनेपर्यंत एकंदर वस्तूंच्या रचनांच्या गोष्टी त्याच्या मनांत येऊं लागतात. सर्व वस्तूंच्या रचनांत अतिसोपेपणा, अतिस्वस्तपणा, आणि उत्तमपणा हे साधण्याचें ध्येय साधारण धोरण ठेवून त्यांच्या रचना केलेल्या असतात.

विष्णु–परवांचें पुस्तक तुझ्याजवळ असलें तर त्यांतल्या आणखी कांहीं गोष्टी वाच. तें फार चांगलें पुस्तक आहे.

वामन– तें मीं कालच परत केलें. मजजवळ तें असतें तर तुला त्यांतल्या आणखी कांहीं गोष्टी वाचून दाखविल्या असत्या; नाहीं तर तुला वाचावयालाच दिलें असतें. गेल्या रविवारीं हें एक पुस्तक मीं आणिलें आहे. ह्यांतही सुंदर गोष्टी आहेत. आतां ही कविता पहा कशी सुरेख आहे ती:–

## आर्या.

ये वस्तु दृष्टिला ती नव विविध विचार मानसीं भरवी ॥
अज्ञानस्थिति सरवी येतां उदयास जेविं तिमिर रवी १
पूर्वीं न श्रुत ऐशा सौंदर्यें भूमि-सिंधु-नभ भरलें ॥
सरलें कविमानसबल यत्कथनीं परि असे न तें सरलें २

विष्णु—फारच सुरेख आहे. मी ती उतरून घेऊन पाठ करून टाकितों.

वामन—आतां ह्यांतला आणखी एक चुटका वाचतों ह्मणजे झालें. " जर मुलाला विचार करितां येत नसला, तर ज्ञानापासून आपणांस केवढे मोठमोठाले लाभ झाले आहेत आणि अजून होत आहेत, हें त्याच्या लक्षांत यावयाचें नाहीं; परंतु जर तो विचार करूं लागेल तर ह्या पुढील गोष्टी त्याला समजतील. कृषिकर्माच्या ज्ञानापासून आपणांस पाहिजे तसें आणि पाहिजे तितकें धान्य मिळतें; शिल्पाच्या ज्ञानापासून आपणांस सर्व प्रकारचें यथेच्छ वस्त्रप्रावर्ण मिळतें; वैद्यक्रिया आणि शस्त्रक्रिया ह्यांच्या ज्ञानानें आमच्या अमोल आयुष्याची वृद्धिच केली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं; वाफेच्या यंत्राच्या अवाढव्य शक्तीनें आज मितीला जे फायदे होत आहेत ते तर अगण्य आहेत; आणि छापण्याच्या कलेपासून जगभर

ज्ञानभांडार जसें काय खुलें झालें आहे. ज्या सूक्ष्मदर्शक यंत्राच्या योगानें पूर्वी कधीं न पाहिलेले असे हजारों प्राणी आपल्या दृष्टीस पडतात, तें सूक्ष्मदर्शक यंत्र; ज्या दुर्बिनीच्या योगानें दूरवरचे असंख्य तारे व त्यांचे आकार स्पष्टपणें आपल्या पाहण्यांत येतात, ती दुर्बीन; ज्या तारायंत्रानें दूर देशांत रहाणाऱ्या आपल्या मित्रांशीं बोलतां येतें, तें तारायंत्र; ज्या जहाजांच्या योगानें पृथ्वीवरील चोहोंकडचीं मनुष्यें खुशाल एकमेकांस भेटतात, तीं जहाजें; ज्या होक्याच्या योगानें अफाट आणि निर्मार्ग जलसमूहावर जहाजें हवीं तशीं फिरतात, तो होका; पर्वतप्राय समुद्राच्या लाटा येऊन आपटल्या तरी न ढळणारा, आणि तुफानांत सांपडलेल्यें खलाशांस सुरक्षित मार्ग दाखविणारा, असा दीपस्तंभ; ह्या सामग्रीकडे पाहिलें म्हणजे विचार आणि शास्त्र ह्यांपासून आपणांस केवढाले लाभ झाले आहेत हें सहज कळून येईल. ईश्वराच्या कृपेनें हे सर्व लाभ आपणांस प्राप्त झाले आहेत. त्यांजबदल जर आपण त्यास अनन्य भावानें शरण गेलों नाहीं, तर आपल्यासारखा महा अज्ञान, महा कृतघ्न, आणि महा दुष्ट ह्या भूतलावर दुसरा प्राणीच नाहीं असें म्हटलें पाहिजे."

विष्णु—ह्या पुस्तकानें तर मजा केली बुवा!

वामन—मीं जें मागें आणिलें होतें त्यापेक्षांही हें

चांगलें आहे. असो, आज झालेल्या गोष्टींचा तूं चांगला विचार करशील तर मग पट्टा कां धांवत जातो, भोंवरा कां फिरतो, चेंडू कां उशी देतो, जंगी भोंवरा आवाज कां करितो, आणि हवेंत पतंग कां उडतो, हें मी तुला सांगेन.

विष्णु– फार चांगलें; साऱ्यांपेक्षां ह्या गोष्टी मला अगोदर समजल्या पाहिजेत. उद्यां मी पहा अगदीं वेळेवर येईन. येतों तर आतां.

वामन– ठीक आहे.

## भाग आठवा.

विष्णु– वामन, हा मी आलों; हे नुक्ते सहा वाजत आहेत. हातरुमाल जाग्यावरून हालत नसतांना पट्टा भराभर कां पळत जातो, भोंवरा कां फिरतो, जंगी भोंवरा आवाज कां करितो, चेंडू कां उशी देतो, आणि हवेमध्यें पंतग कां उडतो हें सर्व आतां तूं सांग.

वामन– विचार करण्यास शिकणें हें किती महत्वाचें आहे, ह्याचें दुसरें उदाहरण मी पहिल्यानें तुला दाखवितों. पहिल्यानें जेव्हां मी तुझ्याशीं बोलूं लागलों, तेव्हां माझ्या बोलण्याकडे तूं मुळींच लक्ष देत नव्हतास; त्या वेळेस मीं विचार केला कीं, जर मी तुझा

पट्टा, चेंडू, भोंवरा, ह्यांविषयीं बोललों तर कदाचित् त्यांविषयीं कांहीं अधिक समजून घेण्याची तुला इच्छा होईल.

विष्णु—आणि ह्मणूनच त्यांविषयीं पहिल्यानें बोललास वाटतें ?

वामन—हो; तूं विचार करण्यास शिकण्याचा मार्ग धरावास ह्मणून मी तें बोललों होतों.

विष्णु—असें; पण हें उत्तम केलेंस. याबद्दल मला नित्य तुझे उपकार मानिले पाहिजेत. असो, आतां पट्टयाविषयीं चालूं दे. तो असा कां धांवत जातो बरें ?

वामन—आतां नीट लक्ष दे. गुरुजींनीं मला असें सांगितलें आहे कीं, सर्वत्र लागू पडणारे असे सृष्टीमध्यें कांहीं नियम आहेत. ह्मणजे त्या नियमांस जर कांहीं अडथळा आला नाहीं तर ते सदैव सारखे लागू पडतात. सृष्टीचा असा एक नियम आहे कीं, पाणी नेहमीं आपली सपाटी राखतें. ह्मणजे जर तूं जरा उंचीवरच्या खळग्यांतलें पाणी खालच्या खळग्यांत सोडिलेंस, तर खालच्या खळग्यांतील पाणी वरच्या खळग्यांतील पाण्याच्या सपाटीबरोबर येईपर्यंत तें वहात राहील; आणि दोन्ही खळग्यांतील पाण्यांची सपाटी एक झाली ह्मणजे तें वाहण्याचें बंद पडेल.

विष्णु—हें मी समजलों.

वामन—दुसरा असा नियम आहे कीं, आकाशांत फेंकलेला धोंडा जमिनीवर पडल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. आणखी एक मी तुला नियम सांगतों; तो तुझ्या धांवणाऱ्या पट्टयाला लागू पडण्यासारखा आहे.

विष्णु—आतां आलें !

वामन—तो नियम असा कीं, प्रत्येक निर्जीव पदार्थाला दुसऱ्या स्थितींत घातल्यावांचून तो ज्या स्थितींत असतो त्याच स्थितींत नेहमीं राहील. जमिनीवर पडलेल्या धोंड्याला दुसरीकडे सारिलें नाहीं, तर तो सदैव पहिल्या जाग्यावर जशाचा तसाच राहील. आणि गोफणगुंड्याला थांबविलें नाहीं, तर तो तसाच पुढें पुढें जात राहील.

विष्णु—तसाच पुढें पुढें जात राहील ?

वामन—होय; त्याप्रमाणेंच एकदां गति दिलेल्या तुझ्या पट्टयास जर कशानें तरी थांबविलें नाहीं, तर तो तसाच धांवत राहील.

विष्णु—पण त्याला कोण थांबवितो ? तो धांवतांना एखाद्या मोठ्या धोंड्याला अथवा दुसऱ्या कशाला तरी जाऊन थडकेपर्यंत त्याला कोणी थांबवीत नाहीं.

वामन—असें नाहीं. त्याच्या मार्गांतील प्रत्येक लहान खडा देखील त्याच्या धांवण्याचा वेग थोडा तरी कमी करीत असतो. जर तूं पाण्यांतून पट्टा चालवूं लागलास

तर तो दूर न जातां थांबेल. कारण, पाणी त्याच्या गतीस अटकाव करील. तूं तो गवतामधून चालविलास तरी तसेंच होईल. कारण, गवत त्याला प्रतिबंधक होईल.

विष्णु—हो हें खरें; पण तो फरसावर चालविला ह्मणजे जोरानें पुष्कळ लांब धांवत जातो.

वामन—तो फरसावर वेगानें धांवत जातो, परंतु त्याला धांवतांना जी हवा तोडीत जावें लागतें तिच्यापासून, आणि फरसावरून तो घांसत जातो त्या घांसण्यापासून त्याच्या गतीस अडथळा होत असतो. आणि त्यावर जर तूं पुन्हा पट्टी मारिली नाहींस, तर ह्या वर सांगितलेल्या अडथळ्यांपासून त्याची गति हळूहळू मंद होत शेवटीं अगदीं बंद पडेल. आतां तूं आपल्या पट्ट्याला एकदां गति दिलीस ह्मणजे तो चांगला धांवत जातो, ह्याचें कारण असें आहे कीं, त्याचा अगदीं लहान भाग जमिनीला लागत असल्यामुळें त्याला फारच थोडें घर्षण मिळतें, आणि हातरुमाल मुळींच धांवणार नाहीं, ह्याचें कारण हें कीं, त्याचा बहुतेक भाग जमिनीस लागत असल्यामुळें त्याला घर्षण फार मिळतें.

विष्णु—बरें, हें मला समजलें; परंतु माझ्या रुंद लांकडी पट्ट्यापेक्षां माझा लोखंडी अरुंद पट्टा कां चांगला धांवत जातो ?

वामन—त्याचें कारण इतकेंच कीं, लोखंडी पट्ट्या लां

कडी पट्ट्यापेक्षां आकाराच्या प्रमाणानें अधिक जड आहे, आणि तो लांकडी पट्ट्यापेक्षां अरुंद आहे. ह्या दोन कारणांनीं त्याला हवेचें आणि जमिनीचें घर्षण कमी होतें.

विष्णु—समजलों; मीं त्याला एकदां पळविलें कीं तो तूं सांगितलेल्या नियमाप्रमाणेंच घर्षणाच्या योगानें थांबेपर्यंत धांवत जात असतो.

वामन—आणि हीच गोष्ट भोंवऱ्यास लागू आहे. त्याच्या भोंवतीं गुंडाळलेली दोरी असते ती तूं त्याला जमिनीवर टाकिलेंस ह्मणजे गरगर फिरावयास लाविते, आणि जर त्याला हवेच्या आणि जमिनीच्या घर्षणानें हळू हळू थांबाविलें नाहीं, तर तो फिरतां फिरतां अगदीं झिजून नाहींसा होईपर्यंत तसाच फिरत राहील.

विष्णु—हें पट्ट्यासारखेंच आहे ह्मण. बरें, आतां चेंडू कां उशी देतो एवढें कृपा करून सांग.

वामन—स्थितिस्थापकता ह्मणजे काय हें तुला माहीत आहेना ?

विष्णु—हो; स्थितिस्थापकता ह्मणजे उडण्याचा गुण. रबर लांब ताणून सोडिला कीं लागलाच उडाल्यासारखा होऊन पुन्हा पहिल्यासारखा होतो, ह्मणून रबराच्या आंगीं स्थितिस्थापकता आहे.

वामन—फार चांगलें; शाबास. हा रबराचा चेंडू पहा. ह्याला मीं बोटानें दाबून खळगी पाडिली तर बोट-

काढितांक्षणीं खळगा पाडिलेला भाग लागलाच वर उडून हा पुन्हा पहिल्यासारखा वाटोळा होईल, ह्मणून चेंडू स्थितिस्थापक आहे. हा जमिनीवर आपटला ह्मणजे चपटा होतो, परंतु त्याची स्थितिस्थापकता अथवा पुन्हा पूर्ववत् वाटोळा होण्याचा त्याचा जोर त्याला हवेमध्यें वर उडावयास लावितो.

विष्णु– बरोबर, मी समजलों. आतां जंगी भोंवऱ्याविषयीं सांग.

वामन–होय; तुला हें माहीत असलें पाहिजे कीं, कोणत्याही भरींव पदार्थाला जोरानें भिरकाविलें, ह्मणजे तो आपल्याभोंवतीं एकसारखा गरगर फिरत जात असतो; आणि त्या त्याच्या फिरण्यानें त्याच्या सभोंवतालची हवाही हालूं लागते. ही हालणारी हवा आपल्या कानांशीं येऊन पोहोंचली, ह्मणजे कांहीं एक प्रकारचा ध्वनि ऐकूं येतो. तूं ढोलक्यावर काठी मारिलीस, ह्मणजे त्याचें ताणून बसविलेलें कातडें हालूं लागतें. जर तूं ग्लासांत पाणी घातलेंस, आणि त्या ग्लासांतून नाद निघेपर्यंत त्याच्या कडेवर ओलें बोट फिरवीत राहिलास, तर आंतील पाणी हालतें आहे असें तुला दिसून येईल. आतां मी करितों तें पहा. हें ग्लास पाण्यानें भरलें आहे. आतां हें पाणी हालतें आहे हें तुला दिसतें कीं नाहीं?

विष्णु– होय, चांगलें स्पष्ट दिसतें आहे.

वामन– बरें तर, ह्यावरून जरी ग्लास हालतेंसें तुला दिसत नाहीं, तरी तें हालत आहे अशी तुझी खात्री झाली पाहिजे. जेव्हां गवई वीण्याच्या तारांवरून आपलें बोट फिरवितो, तेव्हां त्या ताणिलेल्या तारा लागल्याच हालूं लागतात. तसेंच सनयीवाला सनय फुंकूं लागतो तेव्हां सनय आणि हवा हीं लागलींच हालूं लागतात. आणि त्याप्रमाणेंच जेव्हां तुझा जंगी भोंवरा फिरूं लागतो, तेव्हां त्याच्या बाजूला असलेल्या भोंकाजवळ हवा येते, आणि भोंवरा व ती हवा लागलींच हालूं लागते. ती हालणारी हवा कानांवर आपटली ह्मणजे जंगी भोंवऱ्याचा नाद स्पष्टपणें ऐकूं येऊं लागतो

विष्णु– तर मग भोंवरा आणि हवा ह्यांच्या हालण्यानें आवाज उत्पन्न होतो ?

वामन– होय, तसेंच होतें; आणि तेणेंकरून आपणांस ध्वनीचें ज्ञान होतें. आतां शेवटची गोष्ट हवेमध्यें पतंग कां उडतो.

विष्णु– हा हा! आतां पतंग !

वामन– हवेमध्यें पतंग उडण्याचें कारण असें कीं, तो हलक्या पदार्थांचा केलेला असून त्याचा रुंदट भाग नेहमीं वाऱ्याकडे केलेला असतो, ह्मणून त्याला वारा वाहून नेतो. तोच जर बाजूला फिरला तर त्याला

लोटण्यास वाऱ्याला हवा तितका त्याचा पृष्ठभाग नाहींसा होऊन पतंग खालीं पडेल; त्याला शेंपूट किंवा गोंडा नसला तर तो गरगर फिरूं लागेल; आणि त्याची दोरी तुटली तर वाऱ्याकडे त्याचा पृष्ठभाग नाहींसा होऊन तो जमिनीवर पडेल. एका बाजूला त्याची दोरी आणि दुसऱ्या बाजूला त्याचें शेंपूट किंवा गोंडा, अशीं दोन्हीकडे दोन होऊन तीं आपणांमध्यें पतंगाला तोलून धरितात.

विष्णु– पण पट्ट्याला ज्या पट्टीनें मी मारितों, ती कां पतंगासारखी उडत नाहीं?

वामन– त्याचें कारण असें कीं, तिच्या आकाराच्या मानानें ती फार जड आहे. मोठ्या पतंगाच्या आठव्या हिश्शा इतका जरी पैसा जड नसतो, तथापि तो हवेंत उडावयाचा नाहीं. कारण त्याचा सुमारें एका चौरस इंचा इतका पृष्ठभाग मात्र वाऱ्याकडे व्हावयाचा; आणि पैशाच्याच वजनाच्या कागदाचा पृष्ठभाग शें दोनशें चौरस इंच वाऱ्याकडे होतो.

विष्णु–हें मला चांगलें स्पष्ट समजलें. आणि मी एथें प्रथम आलों तेव्हां जें मला समजत होतें, त्यापेक्षां आतां मला पुष्कळ समजूं लागलें आहे. उद्यां पुन्हा मी अगदीं नेमका येईन. कारण विचार करण्यास शिकण्याची मला आतां फारच गोडी लागली आहे.

वामन– बरें आहे, तूं येशील तेव्हां मी येथें आहेंच.

## भाग नववा.

विष्णु—वामन, आजही मी लवकर आलों, अद्यापि सहाला दहा मिनिटें आहेत.

वामन—फार चांगलें केलेंस. विद्यार्थ्यानें शिकण्याविषयीं नेहमीं उत्सुक असावें. ज्याला शिकण्याची उत्सुकता नाहीं तो मुलगा चांगला शिकावयाचा नाहीं, आणि त्याला शिकविण्यास दुसऱ्यालाही हुरूप येणार नाहीं. त्यांतून गरीबाच्या मुलानें तर फारच उत्सुकतेनें शिकलें पाहिजे; कारण त्याचें सर्व कांहीं त्याच्या शिकण्यावरच अवलंबून असतें. शिवाय आपण जें कांहीं शिकतों त्याविषयीं वारंवार विचार करीत जावा. विचारानें विचार वाढतो. विचारानें एक गोष्ट शोधून काढिली म्हणजे दुसरी काढण्याविषयीं इच्छा होते. एखाद्या वस्तूविषयीं विचार करितांना कशाची अवश्यकता लागते, हें तुला माहीत आहेच. पहिल्यानें तिचे गुण, मग तिचे उपयोग, आणि शेवटीं तिच्या अनुषंगिक गोष्टी. परंतु तुला तुझ्या पांच इंद्रियांनीं वस्तूंचे गुण नेहमीं शोधून काढितां यावयाचे नाहींत.

विष्णु-जर वस्तु जड अथवा हलकी, किंवा गोड अथवा आंबट असली, तर मी लागलेंच सांगेन.

वामन—होय, हें सांगशील. पण ती अकृत्रिम आहे

किंवा कृत्रिम आहे; प्राणिवर्गापैकीं, किंवा वनस्पतिवर्गापैकीं, किंवा खनिजवर्गापैकीं आहे; हें तुला लवकर सांगतां येणार नाहीं. ह्याचा शहाण्यांस देखील सहज उलगडा होत नाहीं. परंतु वाचन, अवलोकन, मनन आणि संभाषण ह्यांच्या योगानें कठीण गोष्टी सोप्या होतात. तुला विचार करण्याची संवय झाली ह्मणजे तुझें ज्ञान वाढत जाईल. ज्याप्रमाणें पेरलेलें उगवल्याशिवाय रहात नाहीं, त्याप्रमाणें विचार केल्यापासून ज्ञान वाढल्याशिवाय रहाणार नाहीं. मला विचार करावयास लावण्याला गुरुजी केव्हां केव्हां असे प्रश्न विचारतात कीं, त्यांचीं उत्तरें मला विचार केल्यावांचून देतांच येत नाहींत.

विष्णु–कसे प्रश्न ते मला सांग पाहूं ?

वामन–त्यांतील कांहीं आतां मी तुला विचारितों. या प्रश्नाचें उत्तर दे पाहूं. एक शेर कापूस आहे आणि एक शेर लोखंड आहे, तर ह्यांतलें जड कोणचें ? विचार करून उत्तर दे.

विष्णु–ह्याला विचाराची गरजच नाहीं. कारण लोखंड कापुसापेक्षां दहापट– हो, वीसपटीनें जड असतें, हें सर्वांस माहीत आहे.

वामन–पण कोणचें जड असतें, असें मीं तुला

विचारिलें नाहीं. एक शेर कापूस आणि एक शेर लोखंड आहे ह्यांतून कोणचें जड, असें विचारिलें आहे.

विष्णु– हं हं ! आतां मी समजलों. दोन्ही शेर शेर आहेत त्यापेक्षां दोन्हीं सारखींच जड आहेत. तुझ्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं मला विचार केला पाहिजे खरा.

वामन–तेंच मी तुला शिकवितों आहें. उत्तर देण्याच्या पूर्वीं विचार करणारा मुलगा दहांत एकही सांपडण्याचें कठीण आहे. आरसे कशाचे करितात हें तुला सांगतां येईल? आतां उत्तर देण्याच्या अगोदर विचार कर.

विष्णु– कांचेचे.

वामन– पुरता विचार केला नाहींस. आरसे कशाचे करितात असें मीं विचारिलें नाहीं. कशाचे करितात तें तुला सांगतां येईल काय, असें विचारिलें होतें. ही फार निराळी गोष्ट आहे.

विष्णु– होय, आहे खरी. आतां मात्र नीट विचार करून उत्तर देईन.

वामन–एका मनुष्याजवळ पांच लिंबें आहेत, दुसऱ्याजवळ तीन पेरू आहेत, आणि तिसऱ्याजवळ चार लिंबें आहेत; तर सर्वांजवळचीं मिळून एकंदर किती लिंबें झालीं?

विष्णु—सांगतों, पांच नि तीन आठ, आठ आणि चार बारा. एकंदर बारा झालीं.

वामन—थोडा थांब, आणि बोलण्याच्या अगोदर चांगला विचार कर.

विष्णु—अं? अरे हो, मीं लिंबांत पेरू काय ह्मणून मिळविले! पांच नि चार नऊ लिंबें झालीं, आणि तीन पेरू निराळेच.

वामन—बरोबर. एक मनुष्य एका दिवसांत दहा कोस जातें, तर दोन मनुष्यें बरोबर निघाल्यास तितक्याच वेळांत किती कोस जातील?

विष्णु—वीस कोस. ह्यांत काय?

वामन—पहा नीट, थोडा विचार तर कर.

विष्णु—नाहीं रे नाहीं, एकापेक्षां दोघे कांहीं अधिक चालणार नाहींत. मी कशाचा विचार करीत होतों?

वामन—कशाचाही करीत ऐस, तूं योग्य विचार करीत नव्हतास हें खरें. एक मनुष्य पाव तासांत शेराचे लाडू खातो, तर तो अर्ध्या तासांत किती शेरांचे खाईल?

विष्णु—दोन शेरांचे खाईल.

वामन—चुकलास. एका वेळेस एका शेरापेक्षां अधिक शेरांचे लाडू खाणारे फार थोडे, आणि जर ते खातील तर दुसऱ्या शेराचे लाडू खाण्यास त्यांस खचित पहिल्यापेक्षां अधिक वेळ लागेल. उत्तर देण्या-

च्या पूर्वीं थांबत जा, नाहीं तर विचार करण्यास शिकणार नाहींस. आतां थोडा थांब हो. एक खण सोपा बांधण्यास दोन खांब लागतात, तर तीन खणांचा सोपा बांधण्यास किती खांब लागतील ?

विष्णु—मला नीट विचार करून पाहूं दे. एका खणाचे दोन खांब, दुसऱ्याचे दोन, दोन नि दोन चार झाले; आणि तिसऱ्याचे दोन, सहा. सहा खांब लागतील.

वामन—अगदीं चुकलास. त्या समोरच्या सोप्याकडे लक्ष दे. एका खणाला दोन खांब लागतात खरें, पण दोन खणांला तीनच खांब पुरतात. कारण मधला खांब दोन्ही खणांला सारखा उपयोगीं पडतो. तीन खणांला चार लागतात. कारण मधले दोन खांब मधल्या खणाच्या उपयोगीं पडून कडेच्याही खणांस आधार देण्याचें काम करितात.

विष्णु—खरेंच, मी शुद्ध टोणपा आहें; मी आपला विचार न करितां घाईनें मोजायलाच लागलों.

वामन—खरेंच घाई केलीस. थोडा थांबतास आणि विचार करितास, तर अशी चूक केली नसतीस. गुरुजी ह्मणतात, मुलें उदाहरणें करितांना फार घाई करितात. त्यांना बेरीज करावयाची असली, ह्मणजे प्रश्न काय आहे हें पाहण्याच्या अगोदर भराभर आंकडे मिळवीत सुटतात. पाहिलें असतां मुलानें असें केलें

पाहिजेः—प्रथम प्रश्न समजून घ्यावा, मग बेरीज करून पाटीवर मांडावी, आणि ती बरोबर आहे किंवा नाहीं हें समजण्यासाठीं ताळा पहावा. आज मीं तुला जे प्रश्न विचारिले ते तुझी बुद्धि तीव्र करण्याला, आणि त्याप्रमाणेंच विचार करण्यास शिकविण्याला पुरे आहेत.

विष्णु—होय; आणि शांतपणानें तूं माझें वेडेंवांकडें बोलणें ऐकून घेतोस, ह्याबद्दल मी तुझा उपकारी आहें. पण एक प्रश्न तुला विचारावासा वाटतो.

वामन—खुशाल विचार.

विष्णु—कांहीं दिवसांपूर्वीं मी वसईस मावशीच्या घरीं गेलों होतों, तेव्हां तेथें एक चमत्कार माझ्या दृष्टीस पडला; तो असाः—ओझ्यानें भरलेली एक गाडी एका चढावाच्या पायथ्याशीं उभी होती. तो चढाव चढून जाण्यास बैल आपणांकडून ओढीत होते, तथापि ती गाडी कांहीं केल्या वर जाईना. पण जेव्हां गाडीवाला त्या बैलांच्या मानेवरच्या जुंवावर बसला, तेव्हां ती गाडी लागलींच चढाव चढून पार झाली. गाडीवान जुंवावर बसतांक्षणीं बैलांच्या आंगांत इतका जोर कसा आला, आणि पूर्वीं कां नव्हता, हें मला समजत नाहीं.

वामन—ह्याचें कारण माझ्याही लक्षांत येत नाहीं. मी विचार करून पाहीन, आणि उद्यां सांगेन.

## भाग दहावा.

वामन—विष्णु, तूं अगदीं वेळेवर आलास. तुला शिकवावयास मला आनंद वाटतो. कारण तूं काळजीनें शिकतो आहेस.

विष्णु—तूं इतक्या आस्थेनें शिकवीत आहेस, त्यापेक्षां मीं काळजीनें शिकावेंच. पण ती गाडी बैलांनीं चढावावर कशी नेली, हें तुला समजलें काय ?

वामन—पुष्कळ विचार करूनही मला समजेना, तेव्हां मग मीं गुरुजींस विचारिलें.

विष्णु—मग त्यांनीं सांगितलें काय ?

वामन—होय; त्यांनीं सांगितलें कीं, जुंवावर बसलेल्या गाडीवानाच्या ओझ्यामुळें बैलांच्या नख्या त्या चढावाच्या जमिनीवरून न निसटतां जास्त नेटानें बसत चालल्या, त्यामुळें बैलांस तितका जास्त आधार मिळाल्या कारणानें त्यांनीं गाडी वर नेली.

विष्णु—बरोबर, असें असेल खरें.

वामन—असो, आतां आपल्या कामाकडे वळूं. आपण कोठवर आलों होतों हें पाहूं दे. एखाद्या वस्तूविषयीं विचार करावयाची रीति ह्मटली ह्मणजे तिचे गुण, तिचे उपयोग, आणि तिच्या अनुषंगिक गोष्टी मनांत आणावयाच्या, हें तुला ठाऊक आहे; आणि

तुला सांगितलें आहे कीं, जसजसें तुझें साधारण ज्ञान वाढत जाईल तसतशी ही रीति अधिक सोपी आणि उपयोगीं होत जाईल. मीं तुला पट्टा, भोंवरा, चेंडू इत्यादिकांविषयीं जें सांगितलें आहे, आणि काल तुझ्या बुद्धीस तीव्रता येण्याजोगे, आणि बोलण्याच्यापूर्वी थांबण्याची संवय लागण्याजोगे जे प्रश्न विचारिले आहेत, त्यांवरून ज्ञानानें आपल्या सुखाची वृद्धि होते, ह्याचीं प्रमाणेंही तुला मिळालीं आहेत. आतां प्रपंचामध्यें अविचारापासून दुःखकारक परिणाम होतात, आणि विचाराच्या संवयीपासून मोठे लाभ होतात, ह्यांचीं थोडीशीं उदाहरणें दिलीं असतां बरें होईल असें मला वाटतें. गुरुजींनीं ह्याच पद्धतीनें मला शिकविलें आहे, आणि हिच्यापेक्षां चांगली पद्धति मलाही दिसत नाहीं.

विष्णु—ही पद्धति चांगलीच आहे.

वामन—जो कधीं विचार करावयास शिकला नाहीं, अशा मनुष्याला अविचारापासून जे अपकार होतात ते सांगितले, तर त्याला खरे देखील वाटावयाचे नाहींत. एका मुलानें आपल्या खोलींत चोरटें मांजर आलें आहे असें पाहून झटकन् खोलीचें दार लावून घेतलें, आणि त्यास कोंडून तो मारावयास लागला. तेव्हां तें मांजर त्याचा मार चुकवावा, आणि वाट शोधून प-

ळून जावें, ह्मणून कांहीं वेळ इकडून तिकडून पळालें. शेवटीं पळून जाण्यास वाट नाहीं, असें समजतांच तें त्यावर बिथरून त्याच्या समोर गुरगुरत उभें राहिलें. सुदैवानें इतक्यांत त्या मुलाचा बाप तेथें येऊन दार उघडण्याविषयीं मुलास हांक मारूं लागला, तेव्हां मुलानें दार उघडतांक्षणीं तें पळून गेलें ह्मणून बरें झालें, नाहीं तर त्यानें त्याचा प्राण घेतला असता.

विष्णु– तो मुलगा अविचारीच ह्मणावयाचा.

वामन– आमच्या शेजारीं गोपाळा राहतो, तो तुझ्या ओळखीचा असेल. त्याची बहीण यमुनाबाई एके दिवशीं सकाळीं ओसरीवर वेणी सोडीत बसली होती. ती वेणी सोडून डोकींतलें फूल खालीं ठेवीत आहे, इतक्यांत तिच्या आईनें तिला हांक मारिली. तेव्हां फूल तसेंच तेथें टाकून ती मागील दारीं गेली, आणि अर्धघटकेनें परत येते आहे, तों एका कावळ्यानें तिच्या देखत तें फूल तोंडांत धरून पोबारा केला !

विष्णु– आणि मग ? पुढें तरी तें सांपडलें का ?

वामन– तें कशाचें सांपडतें ! तो फूल घेऊन कोणीकडे उडून गेला तें कोणासही समजलें नाहीं.

विष्णु– हा निष्काळजीचा परिणाम.

वामन– कापावरील एका शिपायाच्या चवदा वर्षांच्या मुलानें आपल्या बापाची बंदुक हातांत घेतली,

परंतु ती भरलेली आहे हें त्यास माहीत नव्हतें. तो ती घेऊन आपल्या धाकट्या बहिणीजवळ गेला, आणि थट्टेनें तिच्यावर नेम धरून ' तुला गोळी घालितों आतां ' असें ह्मणाला. परंतु त्यानें बंदुकीचा चाप दाबल्याबरोबर त्याची बहीण ठार होऊन जमिनीवर पडली !

विष्णु–काय हें !!

वामन–एक बाई आपल्या चार वर्षांच्या मुलीस सैंपाक घरांत एकटीच सोडून आपण घागर घेऊन पाण्याला गेली. तेव्हां चुलीवर पाणी तापत ठेविलें होतें; असें पाहून आपल्या बाहुलीस न्हाऊं घालण्याकरितां त्यांतील पाणी घ्यावें, ह्मणून ती मुलगी अविचारानें चुलीजवळ गेली; तोंच तिच्या परकरानें खालून पेट घेतला! आणि ती जगते कीं मरते इतकी भाजली ! तिचें तें जळकें प्रेत मीं स्वतः पाहिलें आहे.

विष्णु–ह्या गोष्टी भयंकर बुवा !

वामन–एक बाई आपल्या लहान मुलाजवळ खेळावयास अविचारानें बोरें ठेवून आपण शेजारच्या घरीं गोष्टी सांगावयास गेली. इकडे त्या मुलानें एक बोर तोंडांत घालून गिळिलें, पण तें त्याच्या वशांत अडकल्यामुळें तें मूल गुदमरून जमिनीवर पडून तडफडूं लागलें. पुढें घटकाभरानें ती बाई घरीं येऊन पाहते तों त्याचें प्रेत तिच्या दृष्टीस पडलें !

विष्णु–छे छे, ऐकवत देखील नाहीं ! त्या वेळेस त्या बाईला काय झालें असेल ! !

वामन–आतां पहा, ह्या सर्व गोष्टींमध्यें वाईट करण्याविषयीं कोणाचाही इरादा नव्हता. केवळ अविचारापासून ह्या गोष्टी घडल्या. मीं सांगितल्या ह्या गोष्टी कांहींच नव्हत, अशा शेंकडों गोष्टी अविचारामुळें घडलेल्या आहेत.

विष्णु–अविचार हा फारच वाईट आहे, अशी आतां माझी खात्री झाली.

वामन–हा एक पक्ष झाला. आतां विचारापासून कसें हित होतें, तें तुला सांगतों. गेल्या दिवाळींत एक मुलगा फटकड्या उडवीत बसला असतां त्याच्या नेसलेल्या धोतरानें एकाएकीं पेट घेतला; त्याबरोबर तो मुलगा उठून धांवूं लागला, त्यामुळें त्याचें धोतर जास्तीच पेटूं लागलें. त्या वेळेस त्या मुलाचा मामा जवळ होता; त्यानें त्याचें तें धोतर झट्कन् फेडून टाकिलें, आणि परसांतून कोरफड आणून तिचा बलक काढून तो भाजलेल्या ठिकाणीं लाविला. पुढें वैद्य आणिल्यावर त्या मामाची कृति त्याच्या पसंतीस आली, आणि ‘ हे नसते तर मुलगा मेला असता, ’ असें तो ह्मणाला.

विष्णु–कोणच्या वेळेस काय उपाय करावा, हें समजणें कठीण आहे.

वामन—विचारी मनुष्यें ऐकलेल्या गोष्टी लक्षांत धरून ठेवितात, आणि वेळ आली ह्मणजे त्यांचा योग्य उपयोग करितात. ज्याला विचार नाहीं त्याच्या हातून चांगलें व्हावयाचें नाहीं, पण उलटा कदाचित् अपकार व्हावयाचा. गेल्या कार्तिकांत एका कुणब्यानें कापणी करीत असतां विळयानें पाय फार कापून घेतला. त्या वेळेस रक्त फार जाऊन तो मेला असता; पण दुसऱ्या एका विचारी मनुष्यानें झट्कन् आपलें पागोटें काढून त्या जखमेवर आंवळून बांधून रक्त बंद केलें. नंतर त्याला घरीं आणून औषधपाणी देऊन वरें केलें.

विष्णु—त्याच्या आयुष्याची दोरी खंबीर, ह्मणून असा विचारी मनुष्य त्या वेळेस त्याजवळ होता.

वामन—कांहीं दिवसांपूर्वी एका मोठ्या घरा शेजारच्या झोंपड्यास आग लागली होती. ती विझविण्यास पांच सहा मनुष्यें झटत होतीं, परंतु व्यर्थ; कांहीं उपयोग होईना. तेव्हां एका विचारी मनुष्यानें तें झोंपडें पाडण्यास आरंभ करून जमीनदोस्त केलें; त्यामुळें तें तर सर्व जळून गेलें, परंतु त्याच्या शेजारचें घर सुरक्षित राहिलें.

विष्णु—एकट्यानें युक्तीनें आग विझवून घर वांचविलें! शाबास त्याची !

वामन—जगांतील अति महत्वाच्या गोष्टींचे शोध

दैवयोगेंकरून झालेले आहेत, आणि विचारी मनुष्यें त्यांपासून फायदे करून घेत आहेत. वाळू आणि गार ह्यांमध्यें अल्कली* नांवाचा पदार्थ मिसळला ह्मणजे त्यांपासून कांच होते. कांहीं व्यापारी वादळांत सांपडून सिरिया देशाच्या किनाऱ्यास जाऊन लागले होते. तेथें कली नांवाची वनस्पति पुष्कळ आहे. त्या वनस्पतीचीं लांकडें जमवून त्या व्यापाऱ्यांनीं वाळूवर शेंकोटी केली. तेव्हां त्या उष्णतेनें वाळू वितळून तींत कली वनस्पतीची राख मिसळली गेल्यामुळें कांच तयार झाली. ते व्यापारी विचारी होते, ह्मणून त्यांनीं कांच कशी करावी ह्याचा पक्का शोध लाविला. आज जें नाना प्रकारचें कांचेचें सामान आपल्या देशांत दृष्टीस पडत आहे, हें त्या व्यापाऱ्यांच्या विचाराचें फळ होय.

विष्णु– शाबास व्यापाऱ्यांनो ! तुह्मीं साऱ्यांवर उपकार केले खरें.

वामन–असें सांगतात कीं, पहिल्यानें रेशिमाचा व्यापार करणारा एक मनुष्य रेशीम चांगलें तकतकीत व सुंदर करण्यास पुष्कळ झटला, परंतु त्याचे सर्व श्रम फुकट गेले. एके दिवशीं तो सहज कच्चें रेशीम तोंडांत घालून चघळीत, आणि पुढें काय करावें ह्मणून विचार करीत फार वेळ उभा राहिला होता. अखेरीस

* कली वनस्पतीचा क्षार.

त्यानें तें थुंकलें, तेव्हां तें छानदार तकतकीत झालेलें त्याच्या दृष्टीस पडलें. ह्या सहजी घडलेल्या गोष्टीवरून पुष्कळ विचारी मनुष्यांनीं रेशिमांत सुधारणा करून त्याला हल्लींच्या सौंदर्यावस्थेस आणून सोडिलें आहे.

विष्णु–हा लागलेला शोध पाहून त्या व्यापाऱ्याला पुष्कळ आनंद झाला असेल.

वामन–ज्या वाफेच्या शक्तीनें आज जगावर मोठे उपकार केले आहेत तिचा ज्याप्रमाणें सहजगत्या शोध लागला, त्याप्रमाणेंच बंदुकीच्या दारूचाही शोध लागला आहे. आणि त्याप्रमाणेंच झाडावरून सहजगत्या फळ पडतांना पाहून सर ऐझाक न्यूटन ह्या विचारी पुरुषानें गुरुत्वाकर्षणाचा सर्वव्यापक नियम शोधून काढिला. असो, आतां आपण पुरे करूं या.

विष्णु–बरें आहे, परंतु मी विचार करण्यास केव्हां एकदां शिकेन असें मला झालें आहे.

---

## भाग अकरावा.

विष्णु–वामन, माझ्या मनांत तुला कांहीं विचारावयाचें आहे.

वामन–खुशाल विचार. मला उत्तर देतां आलें तर पाहीन.

विष्णु–बरें तर, आमच्या डोक्यावरील ढग इतके

उंच दिसतात, आणि हे समोरचे ढग अगदीं जमिनीला लागलेले दिसतात ह्याचें कारण काय बरें ?

वामन– कारण,–नाहीं; त्याचें हेंही कारण नसावें. त्याचें खरोखर कारण मला माहीत नाहीं. मला हें गुरुजींस विचारिलें पाहिजे.

विष्णु– बरें, त्यांना विचारून सांग. मीं त्याबदल पुष्कळ विचार केला, परंतु तुला जें समजेना तें मला कसचें समजणार ?

वामन–असें तूं समजूं नको. मला जी गोष्ट समजणार नाहीं, ती वेळेनुसार तूंही विचारानें शोधून काढशील.

विष्णु– हें तुझें बोलणें मीं उमेद धरावी ह्मणून आहे; असो. ज्यावर मला पुष्कळ विचार करितां येईल असा एखादा विषय सांग. विचार करण्यास कोणचा विषय घ्यावा हें मला सुचत नाहीं.

वामन– विचार करण्याजोगे पुष्कळ विषय आहेत; आणि त्यांतही किती एक असे आहेत कीं, त्यांवर हवा तितका विचार केला तथापि ते पूर्णपणें ह्मणून समजावयाचे नाहींत. आपण ईश्वराविषयीं, अथवा अनाद्यनंत काळाविषयीं विचार करूं लागलों, ह्मणजे हे विषय लागलेच आपल्या आटोक्याच्या बाहेरचे होतात. असल्या गोष्टींचें मनन पूज्य भावानेंच केलें पाहिजे.

विष्णु—होय; पण असले विषय माझ्या काय उपयोगाचे ? मला ज्यावर विचार करितां येईल असा कांहीं तरी सांग.

वामन—बरें तर, पुस्तक हा विषय भरपूर आणि हवा तसा वाढण्या जोगा आहे. बहुतेक गोष्टींवर पुस्तकें लिहिलेलीं आहेत. हें पुस्तक पहा, ह्यामध्यें तुझें लक्ष लागण्यासारखे पुष्कळ भाग आहेत. ह्याचें बाहेरील आंग, आंतील आंग, बांधणी, कोपरे, कडा, बाजू, आरंभ, मध्य, शेवट, कागद, शाई, अक्षरें, शब्द, वाक्यें, ओळी, विराम चिन्हें, मुखपृष्ठ, प्रस्तावना, विषय, शिवण, मुलामा, चित्रें आणि मलपृष्ठ.

विष्णु—एवढें मला विचार करण्यास रगड झालें.

वामन—पुस्तकांचे उपयोग पाहूं गेल्यास असंख्य आहेत. चांगलीं पुस्तकें मनोरंजन करितात, शिकवितात, दोष दाखवितात, आणि आणखी वाचण्याला मनाला उत्साह देतात. त्यांच्यापासून आपलें ह्या लोकीं आणि परलोकीं कल्याण होतें. आपण तरुण असो वा म्हातारे असो, श्रीमंत असो वा गरीब असो, शहाणे असो वा मूर्ख असो, निरोगी असो वा आजारी असो, कसेंही असलें तरी चांगल्या पुस्तकांचा आपल्याला फारच उपयोग होतो.

विष्णु—हें चांगल्या पुस्तकांविषयीं झालें. आतां

वाईट पुस्तकांविषयीं चालूं दे. आणि मग अनुषंगिक गोष्टींवर ये ह्मणजे झालें.

वामन—वाईट पुस्तकांशीं जितका कमी संबंध ठेवावा तितका बरा; ह्मणून आपण त्यांच्याविषयीं कांहीं बोलूं नये. पण चांगल्या पुस्तकांविषयीं आतां आपण बोलूं या. ज्या पुस्तकावरून आपण पहिल्यानें मूळाक्षरं आणि उजळणी शिकलों आहों, आणि जीं मनोरंजक आणि उपयोगी क्रमिक पुस्तकें आपण शाळेंत आणि घरीं वाचिलीं आहेत त्यांविषयीं मनांत आण. त्याप्रमाणेंच भूगोल, इतिहास, व्याकरण, अंकगणित, आणि पशुपक्ष्यादिकांच्या गोष्टी ह्यांपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाविषयीं विचार कर. ह्यांशिवाय रसायनशास्त्र, ज्योतिःशास्त्र, शिल्पशास्त्र, भूगर्भशास्त्र, सूपशास्त्र, इत्यादि अनेक शास्त्रांपासून जे आज अगणित फायदे होत आहेत, त्यांची नुसती कल्पना तरी मनांत आण पाहूं बरें?

विष्णु—छे, त्यांच्यावांचून आपलें कांहीं चालावयाचें नाहीं. त्यांच्या मदतीशिवाय साधें अन्नवस्त्र देखील मिळावयाचें नाहीं.

वामन—शिवाय थोर, उदार, पराक्रमी आणि साहसी पुरुषांचीं जीं आनंददायक आणि चित्तवेधक चरित्रें आपल्या वाचण्यांत नित्य येत आहेत तीं निराळींच.

विष्णु—आतां भाऊ साहेबाची बखरच माझ्यापुढें आहे असें मला वाटतें.

वामन—तीचशी काय; असल्या प्रकारच्या वीस पंचवीस पुस्तकांपासून आपणांस आनंदाचा लाभ झाला आहे. जर पुस्तकें नसतीं, तर फेरोजशहा, शिरशहा, अकबर बादशहा, शिवाजी महाराज, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, थोरले माधवराव, नाना फडनवीस, तुकाराम, रामदास अशा थोर पुरुषांच्या चारित्रांपैकीं आपणांला काय समजलें असतें?

विष्णु—किती तरी चरित्रें तुला अवगत आहेत हीं!

वामन—जर लोक विचार करावयास शिकले नसते, तर आपल्यास वाचावयास छापील पुस्तकें कधीं मिळालीं नसतीं. ज्या पुरुषांनीं छापण्याची कला, सूक्ष्मदर्शक यंत्र, दुर्बीन, खलाशांचा होका आणि जहाज बांधण्याची कला हीं शोधून काढून पूर्णतेस आणिलीं ते पुरुष विचार करणारे होते.

विष्णु—आजपर्यंत आपण अमुक एक गोष्टीविषयीं विचार करावा असें माझ्या मनांत कधीं आलें नाहीं; तथापि ह्यापुढें कोणच्या ना कोणच्या तरी गोष्टीविषयीं मला विचार केला पाहिजे. अशी हयगय करून उपयोग नाहीं.

वामन—मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, मनुष्याला

पहिल्यानें जें जग दिसत असतें, तेंच तो विचार करावयास शिकला ह्मणजे त्यास निराळें दिसूं लागतें. मग तो एकच वस्तु पहात न बसतां जगांतील लहान मोठ्या सर्व पदार्थांचा सूक्ष्म रीतीनें विचार करितो. तो पृथ्वीवरील महा द्वीपें, बेटें, पर्वत, गुहा, नद्या, सरोवरें आणि महासागर ह्यांकडे विचारदृष्टीनें पाहील. नंतर तो वनस्पतिवर्गांतील झाडें, वेली, त्यांचीं फुलें आणि फळें ह्यांचें अवलोकन करील; आणि ह्याप्रमाणें त्यानें अवलोकन केल्यावर परमेश्वरानें हें जग मनुष्यजातीस रहाण्यास योग्य स्थळ निर्माण केलें आहे अशी त्याची खात्री होईल. तो सजीव सृष्टीकडे वळला ह्मणजे कीटक, पक्षी, पशु, आणि जलचर ह्यांच्या निरनिराळ्या स्वभावांकडे पाहून आश्चर्यभरित होईल. मग त्याला मनुष्याविषयीं विचार करावा असें वाटूं लागेल; आणि शेवटीं तो परमेश्वराविषयीं विचार करण्याकडे वळेल.

विष्णु—आज तूं पुष्कळ गोष्टी मला सांगितल्यास. आतां मला विचार करण्याला पुष्कळ मिळालें.

वामन—मनुष्य विचार करण्यांत तरबेज झाला ह्मणजे सर्व सजीव सृष्टीवर त्याचा केवढा आश्चर्यकारक अम्मल बसतो, तें तुला सांगतों. सरपटणाऱ्या प्राण्यांत नाग, आणि जलचरांत सुसर हे फार भयंकर प्राणी आहेत, परंतु विचारी मनुष्य त्या दोघांचा हांहां ह्म-

णतां नाश करून टाकितो; हवेंत कितीही जलदीनें उडणारा पक्षी असो, तो त्याला त्यापेक्षांही जलद चालणारा तीर अथवा गोळी मारून जमिनीवर पाडितो; सर्व पशूंत सिंह आणि हत्ती हीं दोन जनावरें अतिशय बळकट आहेत, तथापि तो त्या दोघांसही सहज आपल्या ताब्यांत आणून त्यांस आपले गुलाम करून सोडितो; आणि खोल समुद्रांतील अति मोठा आणि बळकट असा देवमासा विचारी मनुष्याबरोबर झूज खेळून अखेरीस प्राणास मुकतो.

विष्णु—मला वाटतें, विचारी मनुष्यासारखें सामर्थ्य सृष्टींत कोणासही नसेल.

वामन—ज्या मनुष्याच्या आंगीं विचारशक्ति आहे, तो इतर लोकांस पाहिजे तिकडे वळवितो. त्याच्या शब्दानें जें कार्य होतें, तें इतरांच्या एकवटलेल्या शक्तीनें आणि संपत्तीनेंही होणार नाहीं. त्याप्रमाणेंच लढाई करण्याची वेळ आल्यास तो एकटा दहावीस अडाणी मनुष्यांचा सप्पा उडविण्यास मागें सरावयाचा नाहीं. कारण अडाणी मनुष्यें अंतरावर आहेत तोंपर्यंत तो तीरांनीं किंवा गोळ्यांनीं त्यांचे प्राण घेईल. विचार करण्यास शिकल्यापासून एवढी शक्ति प्राप्त होते, तरी चांगलीं मनुष्यें त्या शक्तीचा वाईट मनुष्यांप्रमाणें दुरुपयोग करीत नाहींत. तीं इतरांस विद्या व

कलाकौशल्य शिकवून त्यांचें अनेक प्रकारांनीं हित करितात. परहित करणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे असें समजून तीं रात्रंदिवस परोपकारांत काळ घालवून आनंद पावतात. असो, आज आपलें बरेंच संभाषण झालें. ह्यापासून तुला विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी मिळतील. आतां उद्यां ये, ह्मणजे तुझें ढगांचें कोडें गुरुजींस विचारून येऊन तुला सांगेन.

विष्णु—बरें आहे. मी उद्यां सहा वाजण्याच्या अगोदर येईन, ह्मणजे आपल्याला पुष्कळ वेळ मिळेल. तूं आज मला चांगल्या गोष्टी सांगितल्यास, तेणेंकरून मी तुझा फार उपकारी झालों. येतों आतां.

## भाग बारावा.

विष्णु—वामन, अद्यापि सहा वाजायाला वीस मिनिटें आहेत. मी बराच लवकर आलों, नाहीं ? हल्लीं माझ्या मनांत विचारशिक्षा घोळत आहे. तूं नवीन आणि चमत्कारिक गोष्टी सांगतोस त्या ऐकून माझें मन आनंदभरित झालें आहे. पण तूं गुरुजींस ढगांविषयीं विचारिलेंस काय ?

वामन—होय. अंतरावरील ढग जमिनीला लागलेले कां दिसतात, ह्याचें कारण ते असें सांगतातः—पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, आणि पृथ्वीसभोंवतीं चहूं-

कडे सारख्या अंतरावर ढग पसरलेले आहेत. आतां जरी आपणांमधील आणि पृथ्वीवर फार दूर असलेल्या दृश्य पदार्थांमधील अंतर आपल्या समजण्यांत येते, तरी ते पदार्थ आणि ढग ह्यांमधील अंतर आपल्या समजण्यांत येत नाहीं; ह्यामुळें अंतरावरील पदार्थांस ढग लागले आहेतसे दिसतात.

विष्णु—आतां मला चांगलें समजलें; असा मला विचार कधीं करितां येईल तो येवो.

वामन—तूं असा हिरमुसून जाऊं नको. तूं नुक्ता विचारशिक्षेला कोठेंसा आरंभ केला आहेस. विचार करण्याच्या कामांत जसजसा तूं पुढें जात जाशील तसतसे तुझे विचार वाढत जातील, आणि मग तुला तसतशा गोष्टीही समजत जातील. जो मुलगा विचार करण्यास शिकूं लागतो, त्याला किती एक गोष्टी अडावयाच्या; परंतु जो विचाराकडे ढुंकून देखील पहाणार नाहीं, त्याला कांहीं एक अडावयाचें नाहीं. ह्याला तुझेंच उदाहरण घे. कांहीं दिवसांपूर्वीं पट्टा कां धांवतो आणि हातरुमाल कां धांवत नाहीं, ही शंका तुझ्या मनांत आली होती काय ?

विष्णु—नाहीं हें खरें, पण विचार करण्यांत माझ्या हातून फार चुका होतात ह्याचें मला वाईट वाटतें.

वामन—तुला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

आतां मीं तुझी विचार करण्यास शिकण्याची इच्छा जागृत केली आहे, त्यापेक्षां तूं विचार करण्याच्या कामांत मध्येंच थांबशील ह्याची मला भीति वाटत नाहीं. केव्हां केव्हां सर्वांच्या हातून चुका होतात. तुझ्यानें एखाद्या गोष्टीचा उलगडा करवणार नाहीं तेव्हां तूं उदास होऊं नको. तूं मला ढगाविषयीं कसें घोटाळ्यांत घातलें होतेंस ह्याची आठवण कर.

विष्णु— तूं मला प्रत्येक गोष्ट चांगली उलगडून सांगतोस, ह्मणून मला दुसऱ्या पुष्कळ गोष्टी तुला विचाराव्याशा वाटतात. आतां पहिल्यानें माझ्या पिचकारीविषयीं मी विचारतों. माझी पिचकारी पाणी वर कसें ओढून घेते हें तुला ठाऊक आहे काय ?

वामन— मी असल्या पुष्कळ गोष्टी समजून घेतलेल्या आहेत; आणि तुला जें कांहीं समजत नसेल तें समजावून सांगण्याला प्रयत्नही करीन. आपल्या सभोंवतीं जी हवा आहे ती प्रत्येक पदार्थाला दाबीत असते. असें असतां तिचा दाब आपल्यास कां समजून येत नाहीं, ह्याचें कारण एवढेंच आहे कीं, ती आपणांस आंतून व बाहेरून अशी चहूंकडून एकसमयावच्छेदें करून सारखी दाबीत असते. परंतु तीच जर चहूंकडून न दाबितां एखाद दुसऱ्या बाजूनें दाबील, तर तिचा दाब आपणांस घटकाभरही सहन करवणार नाहीं.

विष्णु—असें खरेंच होईल काय?

वामन—होय; पण आतां मी पिचकारीविषयीं सांगतों. पिचकारीच्या दांड्याच्या नळींतील भागाला कांहीं तरी गुंडाळून तो नळींत गच्च बसेसा केलेला असतो. तो पिचकारीच्या अगदीं टोंकापर्यंत सारून आणि तिचें टोंक पाण्यांत बुडवून दांडा वर ओढला ह्मणजे पिचकारींत निर्वात स्थळ होतें; ह्मणजे पिचकारींत हवा नाहींशी होते. आणि पाण्याला बाहेरील हवा दाबीत असते, त्यामुळें त्याला त्या निर्वात जाग्यांत शिरावेंच लागतें.

विष्णु—हें मला नीटसें समजलें नाहीं.

वामन—नाहीं समजलें? बरें, दुसरी गोष्ट सांगतों ऐक. तूं गव्हांच्या काडाची एक नळी घेऊन तिचें एक टोंक पाण्यांत बुडविलेंस, आणि दुसरें टोंक तोंडांत धरून शोषिलेंस, तर तेणेंकरून तूं नळींतील सर्व हवा ओढून घेशील. मग बाहेरील हवेचा पाण्यावर दाब असल्यामुळें तें त्या नळींत शिरूं लागेल.

विष्णु—हो, हें मीं करून पाहिलें आहे.

वामन—मनुष्य गुडगुडी ओढीत असतां वरच्या चिलिमींतील धूर त्याच्या तोंडांत येतो, तोही याच रीतीनें. चिलिमींत तंबाखू आणि विस्तव घातला ह्मणजे त्या तंबाखूचा धूर चिलिमींतून बाहेर पडत असतो;

परंतु गुडगुडीच्या नळीस तोंड लावून ती मनुष्यानें एक दोन वेळां ओढिली ह्मणजे तींतील हवा नाहींशी होऊन बाहेरील हवेचा जो दाब चिलिमीवर असतो, त्या दाबाच्या योगानें धूर नळींत शिरून मनुष्याच्या तोंडांत शिरतो.

विष्णु– आतां तुझें ह्मणणें मला बरोबर समजलें. गेल्या रविवारीं गोविंदानें मला एक चमत्कार करून दाखविला. त्यानें अगोदर उखळ पाण्यानें तोंडोतोंड भरिलें, आणि पाण्यानें भरलेला तांब्या आंतील पाणी सांडूं न देतां हळूच त्या उखळावर पालथा घातला. नंतर उखळ आणि तांब्या ह्यांमध्यें राहिलेली फट शेणानें लिंपून त्यानें मला तो तांब्या वांकडा तिकडा न हालवितां उचलावयास सांगितला. त्या वेळेस तो उचलण्यासाठीं मीं पराकाष्ठा केली, परंतु कांहीं नाहीं. पण तोच जरा वांकडा करितांक्षणीं फुसादिशीं निघाला! हा तरी हवेचाच खेळ असेल.

वामन– हो, तर दुसरें काय? उखळ आणि तांब्या ह्या दोहोंत पाणी भरलेलें असल्यामुळें त्यांत हवा नाहींशी होते, आणि बाहेरच्या हवेचा दाब त्यावर पडल्यामुळें तो तांब्या उचलेनासा होतो. एके दिवशीं गुरुजींनीं वाताकर्षकयंत्रानें माझ्या हाताखालची हवा काढून टाकिली, त्याबरोबर माझ्या हातावर इतकें

कांहीं ओझें पडल्यासारखें वाटलें कीं, तो मला मुळींच हालवितां येईना. हें ओझें बाहेरील हवेचें होतें,आणि ह्या ओझ्याच्या योगानें माझा हात खालीं चेपला गेला.

विष्णु—काय तरी चमत्कार हा !

वामन—हें जग अशा असंख्य चमत्कारांनीं भरलेलें आहे.पण तुला आणखी कांहीं विचारावयाचें आहे काय ?

विष्णु—होय, मी आज सकाळीं रामा लोहाराच्या घरीं गेलों होतों, तेव्हां त्याच्या भट्टींतील विस्तव बहुतेक विझला होता; त्या वेळेस तो पुन्हा फुलावा म्हणून त्यानें त्यावर एक लोखंडाचा दांडा टाकिला. लोखंडाचा दांडा टाकून विस्तव फुलवावयाचा हें कसें ?

वामन—त्याचें कारण हें असावें:—लोखंड हें फार उष्णताग्राहक आहे, आणि म्हणूनच तें लवकर तापतें. तें विस्तवांतील उष्णता आपल्याकडे आकर्षून घेऊं लागलें, म्हणजे आपल्यासभोंवतालची हवा पातळ करीत जातें. मग ती पातळ हवा जलद वर चढूं लागली म्हणजे तिच्या ठिकाणीं दुसरी हवा येऊं लागते, त्या योगानें विस्तवास वारा लागून तो फुलतो.

विष्णु—तुला विचारावी ती गोष्ट सांगतां येते.

वामन— असें कांहीं नाहीं; परंतु ज्या गोष्टी मीं समजून घेतल्या आहेत, त्याच गोष्टी तूं मला विचारितोस असें मात्र होतें आहे.

विष्णु–बरें, त्रिस्तवावर लोखंडाचा दांडा ठेवण्याबदल काठी ठेविली तर त्रिस्तव फुलेल काय ?

वामन– हें माझ्यानें सांगवत नाहीं; ह्याबदल मीं कधीं विचार केला नाहीं आणि कोणास विचारिलेंही नाहीं. तथापि काठीनें विस्तव फुलूं नये असें वाटतें. कारण काठी लोखंडासारखी उष्णतावाहक नाहीं.

विष्णु– नागपाड्यावर शाहू नांवाच्या मनुष्याजवळ एक पेटी आहे. दमसर हवा असली ह्मणजे तिच्यांतून शिपायाचें बाहुलें बाहेर येतें, आणि शुष्क हवा असली ह्मणजे शिपाई आंत जाऊन त्याची बायको बाहेर येते. हें कसें ?

वामन–पेटीच्या आंतल्या बाजूस एक तात लावून तिच्या योगानें तो शिपाई आणि त्याची बायको हीं हालण्यासारखीं केलेलीं असतात. हवा दमसर असली ह्मणजे ती तात लांबते, आणि शिपाई बाहेर येतो. परंतु हवा शुष्क झाली ह्मणजे ती तात चिरमटून आंखूड होते, आणि काठीच्या एका टोंकावरील शिपायास आंत ओढून तिच्या दुसऱ्या टोंकावरील बायकोस बाहेर ढकलिते.

विष्णु–किती चमत्कारिक हें ! उन्हामध्यें विस्तव नेला ह्मणजे तो विझतो ह्याचें कारण काय असावें ?

मीं एके दिवशीं उन्हांत नेला तो अगदीं विझल्यासारखा झाला.

वामन—त्याचें कारण असें कीं, हवा ही आक्सीजन आणि नैत्रोजन ह्या दोन शुद्ध वायूंच्या मिश्रणानें झालेली आहे; आणि आक्सीजन वायु हा विस्तवास पेटविणारा आहे खरा, परंतु त्याला सूर्यकिरण आकर्षून घेत असतात त्यामुळें तो विस्तवाला हवा तितका मिळेनासा होतो.

विष्णु—आतां आणखी एकच विचारतों, म्हणजे पुरे. पृथ्वी वाटोळीच आहे सपाट नाहीं, असें आपण कशावरून सांगावें ?

वामन—त्याविषयीं नीट समजूत करून घेईपर्यंत मी घोंटाळ्यांत पडत असे, परंतु आतां मी त्याचीं पुष्कळ कारणें सांगेन. परंतु सध्यां एकच पुरे होईल. जर एखादी मुंगी सपाट जाग्यावरून समोर चालत गेली, तर जेथून ती निघाली त्या जाग्याला तोंड फिरविल्यावांचून कधीं परत यावयाची नाहीं; परंतु तीच ह्या चेंडूवरून समोर चालत गेली, तर ज्या जाग्यावरून ती निघाली त्या जाग्याला तोंड न फिरवितां परत येईल.

विष्णु—येईल, ह्यांत संशय नाहीं.

वामन—असेंच जहाजांचें होतें. तीं पृथ्वीप्रदक्षिणेस

निघून समोर चाललीं असतां नाळ न फिरवितां जेथून निघालीं असतील त्या जाग्याला परत येतात.

विष्णु– पृथ्वी वाटोळी आहे ही गोष्ट आतां मी पाहिजे त्याला खरी करून देईन.

वामन– तूं एखाद्या गोष्टीचा विचार करूं लागलास ह्मणजे तिचे गुण, उपयोग आणि तिच्या अनुषंगिक गोष्टी ह्या लक्षांत ठेवीत जा. आतां मी विचारापासून होणारे फायदे तुला सांगतों.

विष्णु– हो सांग, ह्मणजे ते माझ्या लक्षांत चांगले रहातील.

वामन– विचारापासून आपलें ज्ञान वाढतें, बुद्धीस तीव्रता येते, समज चांगला होतो, मनाचा विस्तार होतो आणि ज्या गोष्टी आपणांस समजत नसतात त्या समजूं लागतात. सर्व वस्तु मनोरंजक दिसूं लागतात, आणि आपल्या ठिकाणीं विचाराची आवड उत्पन्न होते. त्यापासून अवघड गोष्टी सोप्या होतात. अविचारापासून जीं संकटें यावयाचीं तीं टळतात. सर्व प्राण्यांवर आपली सत्ता चालते. दुसऱ्यास अनेक प्रकारची मदत करितां येते, आणि तेणेंकरून आपण सुखी होतों. सारांश, आपण विचार करावयास शिकलों, आणि आपले विचार सदुपयोगाकडे लाविले, तर आपण स्वतः सुखी होऊन आपल्यापासून दुसऱ्यांनाही सुख होईल.

विष्णु—वा:, विचारापासून होणारे सर्व फायदे तूं सांगितलेस. विचार करण्यास शिकण्यासारखें दुसरें कांहीं चांगलें नाहीं अशी माझी खात्री झाली. आतां मी तुझी रजा घेतों; मला घरीं थोडेंसें काम आहे. उद्यां मी लवकर येईन.

वामन— तूं येशील त्या वेळेस मी तयार असेन.

---

# भाग तेरावा.

विष्णु—परवां ' मी उद्यां लवकर येईन ' ह्मणून तुला सांगून गेलों होतों, पण काल आमच्या घरीं कांहीं नैमित्तिक होतें त्यामुळें मला येववलें नाहीं. परंतु काल मी येथील शाळेंत मुलांची सभा भरत असते त्या सभेस गेलों होतों. तेथें माझ्यापेक्षां कमी वयाचा एक मुलगा होता. त्यानें फुलांविषयीं जी कांहीं माहिती सांगितली ती ऐकून मी चकित झालों ! आणि अशा लहान मुलास असें चांगलें भाषण करितां येत असून मला त्याच्या अर्धानेंही येत नाहीं, हें मनांत येऊन मला लाज वाटली. ह्यासाठीं आज अगोदर भाषण कसें करावें, हें मला कृपाकरून शिकीव. चांगलें बोलावयास शिकण्याचा एखादा सुलभ मार्ग असला तर मला सांग.

वामन—चांगलें बोलावयास शिकण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे विचार करावयास शिकणें हाच होय.

तूं विचार करण्यास शिकत आहेस, त्याअर्थी तूं त्या मार्गावरच आहेस. शांतपणानें, शहाणपणानें आणि नम्रतेनें सरळ व गोड भाषण करणें ही एक कला आहे.

विष्णु—कशावरही बोलावयाचें असो, तुला आपलें हवें तितकें बोलतां येतें.

वामन—असें नाहीं, मी तुझ्यापेक्षां जरा अधिक शिकलों आहे, ह्मणून तुला तसें वाटतें इतकेंच. आपण जसजसा विचार करीत जावें, तसतसें ते मनांत अधिकाधिक वाढत जातात.

विष्णु—हें कसें ? विचार कसे वाढत जातात?

वामन—ह्याचें उदाहरण तुला पाहिजे तर सांगतों. तुला फुलांविषयीं बोलावयाचें असें मनांत आण; ह्मणजे तुझ्या मनांत जास्वंद, कण्हेर, सुरंगी, तगर, गुलाब, चांफा, मोग्रा, गुलछबू, चमेली हीं फुलें येतील.

विष्णु—हो, पण हीं नांवें मात्र माझ्या मनांत येतील, आणि मग पुढें कांहीं नाहीं. पण माझे विचार कसे वाढतील?

वामन—ह्या फुलांचा आणखी थोडा पुढें विचार कर, ह्मणजे मग हीं फुलझाडें कोठें होतात, त्यांचीं झाडें कशीं असतात, इत्यादि गोष्टी तुझ्या मनांत येतील. जास्वंद ही बागेच्या कडेस लावितात. हिचीं झाडें मोठमोठीं असून वाटोळीं असतात. तांबडी, पांढरी, पिंवळी

अशा हिच्या जाती आहेत. जास्वंदीच्या फुलांस वास नाहीं खरा, तरी हीं झाडें फुलांनीं डवरलीं ह्मणजे मनोहर दिसतात. कण्हेर हें फुलझाड ह्मटलें ह्मणजे पांचपंचवीस लांब छड्या एकत्र उभ्या करून ठेविल्या आहेत असें दिसतें. ह्याला थोडीं पानें असतात, पण प्रत्येक छडीच्या टोंकाला पानांचा जसा काय गोंडाच करून बांधिला आहे असें दिसतें. हीं झाडें बहुतकरून पाणथळीला उगवलेलीं असतात, आणि ह्यांला पुष्कळ फुलांचे झुबकेच्या झुबके येतात. पांढरी, तांबडी, गुलाबी, इत्यादि कण्हेरीच्या जाती आहेत. तिच्या फुलांस मधुर वास येतो. जास्वंदीच्या झाडाप्रमाणें कण्हेरीची चांगली छाया पडत नाहीं, तथापि हीं झाडें डोळ्यांला फार आनंद देतात. सुरंगीचीं झाडें डोंगरांवरून असतात. त्यांचीं फुलें तोंगलासारखीं असून सुवासिक असतात—

विष्णु—ओहो! पुरे; विचार लवकर वाढतात खरे. परंतु जर तूं असाच फुलांविषयीं विचार करीत गेलास तर ते असेच वाढत जातील काय?

वामन—खचित जातील; पण तूंच विचार कर ह्मणजे झालें. अनुषंगिक गोष्टींविषयीं मीं तुला सांगितलें होतें तें विसरलास काय?

विष्णु—तें कसें विसरेन? परंतु विचार करण्यास

शिकतांना अनुषंगिक गोष्टी मनांत आणावयाच्या.

वामन–होय, तूं ह्मणतोस तें खरें आहे; परंतु विचार करण्यास शिकल्यावांचून भाषण करितां येत नाहीं, त्याअर्थी ज्याप्रमाणें विचार करण्यांत अनुषंगिक गोष्टी मनांत आणावयाच्या, त्याप्रमाणें भाषण करण्यांतही त्यांच्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

विष्णु–पण अनुषंगिक गोष्टी फुलांविषयींचे विचार कशा वाढवितील ?

वामन–ह्या रीतीनें वाढवितील:–डोंगर मनांत आल्यानें मला जरंड्याच्या डोंगराची आठवण झाली. त्या डोंगरावर चांगल्या चांगल्या वनस्पति पुष्कळ आहेत. तेथें श्री रामदासांनीं स्थापिलेल्या मारुतीचें प्रसिद्ध स्थान असल्यामुळें नेहमीं पुष्कळ लोक त्याच्या दर्शनास जातात. तेथें कांहीं साधु व बैरागी लोक फळांमूळांवर किंवा शेजारच्या गांवांतून भिक्षा आणून तिजवर आपली उपजीविका चालवून सदाचरणांत काळ घालवितात. त्यांपैकीं कांहींकांस तेथील वनस्पतींची चांगली माहिती झालेली असते. एके दिवशीं एक बैरागी शेजारच्या गांवांतून भिक्षा मागून परत डोंगरावर जात असतां, त्या डोंगरा शेजारच्या शेतांतील एक मनुष्य सर्पदंश होऊन प्रेतासारखा पडला आहे, आणि त्याच्यासभोंवतीं त्याची बायको

व मुलें रडत बसलीं आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें त्या सर्वांस धीर देऊन लागलींच एका वनस्पतीचा पाला ओरबडून आणून रस काढला, आणि त्यांतील थोडा त्याच्या तोंडांत घालून बाकीचा डोक्यास आणि छातीस चोळिला. नंतर त्या वनस्पतीचा राहिलेला चोथा दंशाच्या जागीं बांधून तो वैरागी निघून गेला. पुढें पंधरा एक मिनिटांनीं तो सर्पदंश झालेला मनुष्य झोंप घेऊन उठल्याप्रमाणें खडखडीत उठून बसला.

विष्णु—वाः, वनस्पतीच्या आंगीं काय विलक्षण गुण हा! पण तुझ्या मनांत भराभर विचार कसे वाढतात हे!

वामन—मी विचार कसा करीत जातों हें तूं पहात आलाच आहेस, तर मजप्रमाणें तुझ्या मनांत विचार उत्पन्न होतात किंवा नाहींत तें मला पाहूं दे. आतां आपण पक्ष्यांविषयीं बोलूंया. तुझ्या मनांत कोणकोणचे पक्षी येतात बरें?

विष्णु—पुष्कळ येतात. चिमणी, पारवा, साळुंखी, कावळा, घार, पोपट, गीध, बहिरीससाणा——

वामन—हीं नांवें तूं सांगितलींस, पण तुझ्या मनांत विचार वाढतात कीं नाहींत पाहूंया. कोणकोणचीं फुलझाडें कशीं असतात आणि कोठें होतात, हें ज्या-

प्रमाणें मीं तुला सांगितलें, त्याप्रमाणें हे पक्षी आपलीं घरटीं कोठें बांधितात आणि ते कसे असतात तें सांग.

विष्णु—चिमणी आपलें घरटें घराच्या वळचणीस किंवा भिंतीच्या भोंकांत बांधिते. ती लहान असल्यामुळें तिला थोडी जागा पुरते. एका जातीच्या चिमण्या झाडांच्या फांद्यांस आपलीं लांब लांब घरटीं लटकावून देतात. तीं फार मौजेचीं आणि कुशलपणानें केलेलीं असतात. पारवा आणि साळुंखी हीं आपलीं घरटीं विहिरीच्या खबदडींत किंवा बुरुजासारख्या उंच इमारतींत करितात. कावळा आणि घार हीं आपलीं घरटीं झाडांवरून करितात. तीं काटक्यांचीं केलेलीं असतात. पोपट हे बहुतकरून झाडांला घरटीं करण्यासारखीं भोंकें तयार केलेलीं असतात त्यांतून रहातात. हीं भोंकें सुतार नांवाचा पक्षी आहे तो तयार करितो. गीध आणि बहिरीससाणा ह्यांचीं घरटीं मीं पाहिलेलीं नाहींत, पण तेहीं उंच झाडांवर अथवा डोंगराच्या कड्यांशीं करीत असतात ह्मणून ऐकलें आहे.

वामन—पहा, तुझ्या मनांत अगोदरच विचार कसे वाढत आहेत ते. हे तुझ्या पहिल्या विचारांपेक्षां कितीतरी चांगले आहेत ! आतां हे पक्षी कसे असतात, आणि ह्यांच्या चाली कशा असतात तें सांग.

विष्णु—चिमणी हा एक कबऱ्या रंगाचा पक्षी

आहे. त्याला एक एक पाय उचलून इतर पक्ष्यांप्रमाणें चालतां येत नाहीं. तो दोन्ही पायांनीं उड्या मारीत चालतो. हा पक्षी मोठा धीट आहे. हा सकाळीं सूर्योदयाबरोबर उठल्यापासून अस्तमानपर्यंत एक सारखा चरत असतो. एके दिवशीं आमच्या आंगणामध्यें चिमण्या चरत होत्या इतक्यांत एक मांजर तेथें आलें; त्यास पाहतांच त्या सर्व उडून घरावर जाऊन बसल्या, आणि असा कलकलाट करूं लागल्या कीं, आमच्या घरांतील सर्व मनुष्यांस कंटाळा येऊन गेला. अखेरीस मीं तें मांजर हांकून दिलें, तेव्हां तो त्रासदायक गलबला बंद झाला.

वामन—शाबास, चिमणीचें खासें वर्णन केलेंस. दुसऱ्या पक्ष्यांविषयीं तुला कांहीं माहिती असेल तर सांग पाहूं.

विष्णु—कावळा हा पक्षी बराच मोठा असतो. कांहीं कावळे अगदीं काळे असतात, आणि कांहीं मानेवर मात्र भस्म्या रंगाचे असतात. हिमालय पर्वतावर तांबड्या पायांचे कावळे असतात ह्मणून सांगतात. कावळ्याचा शब्द कर्कश असतो, आणि तो हवा तो पदार्थ खातो. त्यास सरळ भराभर चालतां येत नाहीं. जलदीनें चालावयाचें असलें ह्मणजे तो तिर्कस उड्या मारीत जातो. त्याला दोन्ही डोळ्यांनीं एकदम दिसत नाहीं.

तो हजार वर्षें वांचतो असें सांगतात. हा पक्षी मोठा धीट आणि खोडकर आहे. संधि सांपडली तर तो लहानसान वाटचा, निरांजनें, व चिरगुटें चोरून नेतो. माझ्या आईचीं दोन सोधनीं कावळ्यानें चोरून नेलीं आहेत. मनुष्यांत न्हावी लबाड, पशूंत कोल्हा लबाड, आणि पक्ष्यांत कावळा लबाड असें सांगतात तें खरें आहे.

वामन–हें सर्वथैव खरेंच असें ह्मणतां येत नाहीं. कावळा ज्या वस्तु चोरून नेतो असें आपण ह्मणतों, त्या तो मुद्दाम चोरून नेतो असें नाहीं. त्यांत कांहीं खावयास मिळेल ह्मणून तो नेतो. असो, पण किती एक मुलें कावळ्यापेक्षांही खोडकर असतात.

विष्णु–हें तूं मला तर उद्देशून बोलत नाहींस?

वामन–तूं खोडकर आहेस ही कल्पना देखील माझ्या मनांत नाहीं, मग मी तुला उद्देशून कसें बोलेन? पण कावळ्याप्रमाणें आपण खोडकर आहों असें तुला वाटतें काय ? असो, तुला ससाण्याविषयीं अथवा गिधाविषयीं कांहीं ठाऊक आहे काय ?

विष्णु–गिधाविषयीं कांहीं ठाऊक नाहीं, परंतु गत वर्षीं मी आजोळीं गेलों होतों, तेव्हां तेथें आपाबरोबर सदू चव्हाणाच्या शेतांत हुरडा खावयास गेलों होतों. तेथें गेलों तेव्हां चार वाजून गेले होते. त्या

वेळेस पिकावर भोडच्यांची एकच गर्दी झाली होती, ह्मणून शेतकऱ्याचा मुलगा माळ्यावर बसून गोफणगुंडे मारून त्यांस हांकीत होता. त्यानें त्यांस ह्या बाजूनें उडविलें ह्मणजे त्या दुसऱ्या बाजूनें पिकावर बसत. असें चाललें असतां ' सूं ' असा पंखांचा शब्द करीत एक ससाणा मोठ्या वेगानें आला. त्यास पाहतांच भोड्यांची गाळण झाली. तो तीन चार भोड्यांवर झडप घालून दोन गवींत धरून चालला. इतक्यांत त्या बहादर मुलाची नेमकी गोफण कांडदिशीं वाजली; त्याबरोबर ससाणा जमिनीवर आणि त्या भोडच्या आकाशांत, असें झालें.

वामन—मी फुलझाडांविषयीं बोललों त्याच्या दुपटीनें तूं पक्ष्यांविषयीं बोललास; ह्यावरून तुझे विचार वाढत आहेत असें तुला वाटत नाहीं काय ?

विष्णु—असे माझे विचार वाढतीलसें मला वाटलें नव्हतें. परंतु तूं मधून मधून सूचक प्रश्न केलेस, ह्मणून मला हें इतकें बोलतां आलें.

वामन—असो, आज आपण जें कांहीं बोललों असेंच आणि ह्याच पद्धतीवर तुला पशूंविषयीं, आणि दुसऱ्या इतर प्राण्यांविषयीं सहज बोलतां येईल. आपण कोणत्याही सृष्ट पदार्थांविषयीं बोललों, तरी त्या संभाषणापासून आपण फायदा करून घेण्यास झटावें. ज्या ई-

श्वरानें मुंगी निर्माण केली, त्यानेंच हत्ती केला; ज्यानें सुंदर चमकणारे दंवाचे थेंब गवताच्या पात्यांवरून ठेवून दिले आहेत, आणि जमिनीवर धुरोळा पसरून दिला आहे, त्यानेंच हा अफाट सागर पसरून दिला आहे, आणि जमीन तयार करून तिजवर पर्वतांवर पर्वत रचून दिले आहेत. प्रत्येक सृष्ट पदार्थांत ईश्वराची अनंत शक्ति आणि अवर्णनीय कुशलता हीं दिसून येतात.

विष्णु—आणि हें खरें आहे. मला वाटतें मी पहिल्यानें तुजकडे आलों तेव्हां जें मी बोलत असें त्यापेक्षां आतां पुष्कळ वस्तूंविषयीं फार चांगलें बोलेन.

वामन—हें तुझें ह्मणणें ऐकून मला आनंद झाला. ह्यावरून आपण नुसत्या चकाठ्याच पिटिल्या असें अगदीं होत नाहीं, असो, आपली वेळ झाली.

## भाग चवदावा.

वामन— विष्णु, ये बैस. तुला सांगून ठेवितों कीं, जसजसें तुझें ज्ञान वाढत जाईल, तसतसा तूं अभिमानी आणि गर्विष्ट न होण्याविषयीं अधिकाधिक जपत जा. हे दुर्गुण जडावयास फार वेळ लागत नाहीं, पण मग ते काढून टाकण्यास फार प्रयास पडतात.

विष्णु—पण मी गर्विष्ट होण्याला मला काय येतें आहे? आणि कांहीं येत असलें तर फारच थोडें असेल.

वामन—आपल्या ह्या देशांत कांहीं वर्षांपूर्वी भर्तृहरि ह्या नांवाचा एक विद्वान् प्रसिद्ध कवि आणि साधुपुरुष होऊन गेला. त्यानें आपल्या स्वतःच्या झालेल्या स्थितीविषयीं एका श्लोकांत असें वर्णन केलें आहे कीं,

श्लोक.

जधीं कांहीं कांहीं हरि कवि असे शब्द शिकलों ।
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों ॥
जधीं कांहीं नेणें ह्मणुनि वदले पंडित मला ।
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला ॥ १ ॥

ह्यावरून ज्यांना पुष्कळ समजतें त्यांच्यापेक्षां ज्यांना थोडें समजतें त्यांनाच नेहमीं गर्वाची पीडा होते हें उघड झालें. आतां तुला ह्मणजे गर्व झाला आहे असें नाहीं, तरी ही सूचना नेहमीं लक्षांत ठेव. साधारण बुद्धीचाच पण गरीब आणि उद्योगी असा मुलगा पुढें चांगला निपजण्याचा पुष्कळ संभव असतो, परंतु हुशार पण आपल्या ठिकाणींच फाजील मोठेपणा मानणारा अशा मुलाची फारशी आशा नसते. आपण ज्या रीतीनें कांहीं काम करितों त्याच रीतीनें तें दुसरा करीत नाहीं, एवढ्यावरून तो आपल्यापेक्षां अडाणी आहे असें आपण समजूं नये. एकच काम करावयाच्या निरनिराळ्या रीति असतात. एखादें काम करण्याची दुसऱ्याची

रीति आणि आपली रीति ह्या ताडून पाहून त्यांत चांगली कोणची हें पहावें; आणि मग दुसऱ्याची वाईट असें ठरल्यास त्याला नांव ठेविलें तर चालेल.

विष्णु—काम करण्याच्या रीति निरनिराळ्या असल्या तरी एका रीतीपेक्षां दुसरी चांगली असलीच पाहिजे.

वामन—परंतु सर्वच गोष्टींत असें होईल असें नाहीं; आणि त्यांतही आपलीच रीति चांगली ठरेल असें होणार नाहीं.

कांहीं दिवसांमागें मी आणि गुरुजी पुण्यास गेलों होतों. तेथें एके दिवशीं आह्मी पर्वतीकडे तळ्याच्या कांठानें फिरावयास चाललों असतां, शिपाई लोक भाला फेंकून कसा मारितात हें ते मला दाखवीत होते, तों त्यांची काठी तळ्यांत दूर जाऊन पडली. तेव्हां ती पुन्हा हातीं लागते कशी ह्या विचारांत मी असतां माझ्या मनांत आलें कीं, त्या काठीच्या पलीकडच्या बाजूस धोंडे मारिले तर पाण्यांत लाटा उत्पन्न होऊन त्यांच्या धक्यांनीं ती हळू हळू कांठास येईल. पण त्या वेळेस वारा जोरानें वहात होता, त्यामुळें लाटांनीं जितकी ती अलीकडे आली असती त्यापेक्षां वाऱ्यानें ती जास्ती पलीकडे गेली असती. तेव्हां गुरुजींनीं थोडा विचार करून ती पोहत जाऊन आणण्याचा बेत केला, आणि ते आंगरखापागोटें काढूं लागले.

विष्णु—हो, त्या वेळेस पोहण्यावांचून दुसरा इलाजच नव्हता.

वामन—ते ह्मणाले, जर मजपाशीं लांब दोरी असती तर तिच्या शेवटास धोंडा बांधून ती काठीच्या पलीकडे झोंकून देऊन काठी कडेस आणिली असती. पण त्यांच्या जवळ दोरी नव्हती.

विष्णु—हां, ही युक्ति चांगली होती; परंतु त्या वेळेस तिचा काय उपयोग? शेवटीं त्यांना पाण्यांत जावेंच लागलें.

वामन—नाहीं; इतक्यांत गोपाळा शिपाई तेथें आला. त्याच्या मागून त्याचा कुत्रा येत होता. आमचें काय चाललें आहे हें त्याला समजलें, तेव्हां त्यानें एक धोंडा घेतला, आणि कुत्र्याला हांक मारून तो काठीजवळ जाऊन पडे अशा बेतानें फेंकला. त्याबरोबर त्या कुत्र्यानें पाण्यांत उडी घातली, आणि हां हां ह्मणतां तो काठी तोंडांत धरून घेऊन आला.

विष्णु— खाशी! भले गोपाळा! भली केली! धोंडा पाण्यांत टांकिला ती काठीच फेंकली असें त्या कुत्र्यास खचित वाटलें असावें.

वामन— तसेंच, दुसरें काय? मी एका भिल्लाची गोष्ट ऐकली आहे ती तुला सांगतों. एक भिल्ल पहिल्यानेंच एका कसब्यांत बाजारास गेला होता, त्यामुळें तेथील

मनुष्यांचा घोळका पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें; आणि त्यानें तीं सर्व मनुष्यें मोजण्याचा निश्चय केला. मग तो रस्त्याच्या एका बाजूस उभा राहिला, आणि जवळून मनुष्य गेलें ह्मणजे त्याबदल तो हातांतल्या काठीवर ओरखडा काढी. असें करितां करितां ती काठी ओरखड्यांनीं भरून गेली, तरी आणखी लोक चाललेच आहेत असें पाहून तो गोंधळून गेला, आणि लोकांच्या तोंडांकडे पहात राहिला. विचार करावयास शिकलेल्या मनुष्यानें हें काम निराळ्या रीतीनें शेवटास नेलें असतें. त्यानें दहा दहा, वीस वीस, अथवा शंभर शंभर मनुष्यांबदल एक, असे अंक मांडून ठेविले असते. मागें आपलें नांगराविषयीं बोलणें झालें होतें तें तुला आठवतें काय?

विष्णु—होय, चांगलें आठवतें.

वामन—नांगराला आणि जहाजाला बांधावयाचा लंगरदोर असतो तो युरोपांत तागाचा करितात, एशिया खंडांतील कांहीं देशांत लांब गवताचा करितात, आणि आपल्या हिंदुस्थानांत काथ्याचा करितात. अलीकडे युरोपांत लोखंडाचा लंगरदोर करूं लागले आहेत. ह्याप्रमाणें ते निरनिराळ्या प्रकारचे केलेले असतात, तरी त्या सर्वांना लंगरदोरच ह्मणतात, आणि ते एकच काम करितात.

विष्णु–तरी सर्वांत लोखंडाचा लंगरदोर उत्तम. तो काथ्याचा किंवा गवताचा करणें हा मूर्खपणा आहे.

वामन–लोखंडाचा उत्तम खरा, परंतु दुसरे करायाला सोपे आणि सस्ते असतात, शिवाय लोखंडाच्या दोरासारखेंच काम जर काथ्याच्या अथवा गवताच्या दोरानें होत आहे, तर तो काथ्याचा अथवा गवताचा करण्यांत मूर्खपणा नाहीं.

विष्णु–एकच गोष्ट निरनिराळ्या रीतींनीं करितां येते हें खरें आहे.

वामन–कल्पना कर, पांच सहा मनुष्यांना एक काठी किती लांब आहे हें पहावयाचें आहे; तर एक जण ती विती घालून मोजील. दुसरा बोटें घालून मोजील, तिसरा हात घालून मोजील, चवथा फुटानें मोजील, आणि पांचवा यार्डानें मोजील, सारांश, अशी ती निरनिराळ्या प्रकारांनीं मोजली, तरी प्रत्येकाला तिची लांबी समजण्यास कांहीं अवघड आहे असें नाहीं.

विष्णु–एकच गोष्ट करण्याला पांच सहा रीति ! आणि त्या सर्व चांगल्या !

वामन–मी तुला दोन मळेकऱ्यांची गोष्ट सांगतों. एक मळेकरी नित्य पहांटेस उठून मळ्यांत कामास जाई; आणि दुसरा सकाळीं, दोनप्रहरीं अथवा संध्या-

काळीं वाटेल तेव्हां आपल्या मळ्याकडे जाई, परंतु दोघेही उद्योगी होते.

विष्णु—असें कसें होईल? पहिला उद्योगी होता हें खरें, पण दुसरा निःसंशय आळशी होता.

वामन—असें नाहीं. पहिल्याचीं मुलेंबाळें कर्तीं असल्यामुळें त्याला आपल्या गुरांढोरांकडे किंवा दुसऱ्या धंद्यांकडे पाहावें लागत नसे, ह्मणून तो उठतांक्षणीं मळ्याला जाई, आणि दुसरा घरचा एकटा असल्यामुळें सारा खटला त्यालाच पहावयाचा पडे, ह्मणून तो वेळ फावेल तेव्हां मळ्यांत जाऊन काम करी. ह्यावरून दोघेही सारखेच उद्योगी होते कीं नाहीं?

विष्णु—होय, खरी गोष्ट. मला विचार करितां न आल्यामुळें अशा चुका होतात.

वामन—बरें, ह्या गोष्टीचा नीट विचार करून सांग. गोपाळा आणि कोंडाजी हे दोघे कुणबी स्नेही होते. एके दिवशीं एका मोठ्या रस्त्यावर त्यांची गांठ पडली; परंतु गोपाळा रस्त्याच्या एका बाजूस होता, आणि कोंडाजी दुसऱ्या बाजूस होता. आतां बोलण्यासाठीं गोपाळानें रस्ता वलांडून कोंडाजीकडे जावें, किंवा कोंडाजीनें गोपाळाकडे जावें सांग.

विष्णु—कोणी कोणाकडे गेला तरी सारखेंच.

वामन—हें तुझें चुकीचें उत्तर आहे.

विष्णु—नाहीं अगदीं बरोबर आहे. नुसता काय तो रस्ता वलांडावयाचा, तो ह्यानें काय आणि त्यानें काय.

वामन—जर त्या दोघांसही सहज रस्ता वलांडितां येता तर मात्र हें तुझें उत्तर बरोबर होतें, परंतु ह्यावरून पुष्कळ गोष्टी मनांत येण्याजोग्या आहेत. एक चांगला धडाखडा असला, आणि दुसरा लंगडा असला; अथवा एकाच्या डोकीवर मोठें ओझें असलें, आणि दुसरा केवळ रिकामा असला तर कसें ?

विष्णु—होय. मला तुझ्यासारखा विचार करितां येत नाहीं त्यामुळें अशा चुका होतात.

वामन—तूं विचार करण्यास शिकला आहेस त्यापेक्षां ह्या गोष्टी तुझ्या मनांत याव्या. एखाद्याच्या डोकीवर ओझें असलें, तर आपण बाजूला होऊन त्याला वाट द्यावी; त्याला बाजूला होऊन जावयास लावूं नये. लंगड्या किंवा आंधळ्या मनुष्याचा कोणाला कांहीं निरोप सांगावयाचा असल्यास तें काम आपण आनंदानें करावें, आणि ज्यांना वाचतां येत नाहीं त्यांचें कांहीं वाचावयाचें असल्यास आपण वाचून दाखवावें.

विष्णु—मला पट्टा, भोंवरा असल्या वस्तूंवर बोलतां येतें, पण लोकांनीं काय करावें आणि कसें वागावें, ह्यांविषयीं माझ्या मनांत फारसें येत नाहीं.

वामन—कारण ह्या दुसऱ्या गोष्टींचा विचार करण्याला अधिक बुद्धि लागते. पण कांहीं दिवसांनीं तूं चांगला विचारी होशील ह्यांत संशय नाहीं.

विष्णु—आतां एखाद्याची काम करण्याची निराळी रीति पाहून मी त्यास एकदम दोष देणार नाहीं.

वामन—फार चांगलें. दोन मनुष्यांस सात आठ कोस जमीन चालून जावयाचें आहे, असें मनांत आण. त्यांतील जो धट्टाकट्टा असेल तो पांयींच जाईल, आणि दुसरा अशक्त असला तर तो भाड्याचें घोडें करून जाईल. अशानें जरी त्याचा पैसा खर्च होईल, तथापि तो चालत जाणाऱ्यापेक्षां लवकर जाऊन पोहोंचेल, आणि त्याचे चालण्याचे श्रमही वांचतील.

विष्णु—होय, एकच मजल दोघांनीं आपआपल्या रीतीनें केली तरी फळ सारखेंच

वामन—बरें, सध्यां झालें इतकें पुरे. ह्यावरून एकच गोष्ट करण्याला एकच नाहीं अनेक रीति असतात हें लक्षांत धर.

विष्णु—होय, हें मी विसरणार नाहीं.

---

## भाग पंधरावा.

विष्णु—वामन, आज तुला घराविषयीं माहिती विचारावी असें माझ्या मनांत आलें आहे.

वामन—खुशाल विचार. माझ्यानें फारसें सांगवेल असें जरी नाहीं, तरी मला येतें आहे त्यापैकीं जें विचारशील तें मी तुला सांगेन.

विष्णु—आज एका गवळ्याच्या घरीं गेलों होतों. तेथें सैंपाक घरांत चूल पेटविली असल्यामुळें मनस्वी धूर झाला होता, आणि नुक्ताच पाऊस पडला होता त्या योगानें आंगणांत पाणी सांठून घरांत देखील शिरलें होतें. शिवाय वाराही फार सुटला होता, त्यामुळें आतां घर पडतें कीं काय असें वाटत होतें. मला घर बांधावयाचें झाल्यास आंत धूर न होईल, आणि पाणी न शिरेल, अशी तजवीज करून मी बांधीन.

वामन—घर बांधण्याला पुष्कळ विचार लागतो; पण तूं तें कसें बांधिशील?

विष्णु—मला नीटसें समजत नाहीं, तरी पण मी कवलारू घर बांधीन ह्मणजे धूर होणार नाहीं; नाहींतर धूर जाण्यासाठीं चुलीवर मोठें थोरलें सहाणें ठेवीन. घर बांधावयाचें तें उंच टेंकडीवर बांधीन, ह्मणजे कितीही पाऊस पडला तरी घराशीं एक थेंबही तुंबणार नाहीं.

वामन—मोठें सहाणें ठेविलेंस तर पावसाळ्यांत सैंपाक करितां येणार नाहीं. सहाण्या वाटें पाऊस आंत येऊन चूल भिजून जाईल, ह्मणून तसें करितां कामा

नये. घर कवलारूं असो वा नसो, त्याला साहेब लोकांच्या घराला जसें लोखंडी नळाचें धुराडें बसविलेलें असतें, तसें बसविल्यावर धुराचा त्रास होणार नाहीं.

विष्णु— हें धुराडें कसें असतें बरें ?

वामन— सुमारें एक फूट व्यासाचा एक लोखंडी नळ असतो. तो चुलीपासून वर अजमासें एक हात उंचीपासून, तों घराच्या उंचीवर दोन हात असा बसवून दिलेला असतो. हा घराच्या वर फार उंच ठेवतां कामा नये, नाहींतर वाऱ्याच्या सोंसाट्यानें घरावरच कोंसळायाचा. ह्यांतून सर्व धूर अगदीं घराच्यावर निघून जातो, पण हें जरा खर्चाचें काम आहे; तेव्हां निदान आपलें सैंपाक घर तरी कौलारूं बांधावें हें विशेष सोयीचें आहे. आतां उंच टेंकडीवर घर बांधण्याचा बेत मला पसंत वाटत नाहीं. कारण त्या ठिकाणीं पाणी मिळण्याची पंचाईत. विहीर खंटली तर फार खोल खणावी लागेल आणि खर्च फार होईल; तो होऊनही सोय नाहीं ती नाहींच.

विष्णु— तर हाही माझा चुकीचाच बेत आहे.

वामन— उंच टेंकडीवरील हें तुझें घर उन्हाळ्यांत थोडेंसें सुखाचें होईल, तरी पावसाळ्यांत वाऱ्याच्या झपाट्यामुळें आणि हिंवाळ्यांत थंडीमुळें तेथें राहवणार देखील नाहीं. शिवाय वर बांधते वेळेस व त्यानंतर

तुला लागणाऱ्या मोठमोठ्या जिनसा अशा उंच टेंकडी-वर चढवावयाच्या ह्मणजे कांहीं सोपें काम नाहीं.

विष्णु— उंच टेंकडीवर घर बांधण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें मला समजलें, परंतु तूं घर कोठें आणि कसें बांधशील तें मला सांग.

वामन— माझ्याच विचारानें घर बांधावयाचें झालें तर त्याविषयीं मला चांगलीशी माहिती नसल्यामुळें मजकडून थोड्या एवढ्या चुका होतील, परंतु तुझ्या इतक्या होणार नाहींत हें खरें.

विष्णु— तूं घर बांधावयास कसा आरंभ करशील?

वामन— मनुष्याला अन्न, वस्त्र आणि रहाण्याला घर हीं तीन पहिल्यानें अवश्य पाहिजेत. रानटी लोक पारध करून निर्वाह करितात, जनावरांचीं कातडीं पांघरितात, आणि दरींतून, झाडांखालून अथवा झोंपड्यांतून रहातात. परंतु विचार करावयास शिकलेले लोक जमिनीची लागवड करून खावयास धान्य पिकवितात, कापुसाचीं अथवा लोंकरीचीं वस्त्रें करितात, आणि घरें बांधितात. गुरुजी ह्मणतात, "घर बांधावयास आरंभ करण्याच्या अगोदर मनुष्यानें त्याचा पक्का विचार केला पाहिजे. कांहीं लोक आपल्या हातून शेवटास जाईल किंवा नाहीं ह्याचा अगोदर विचार न करितां घर बांधूं लागतात, आणि मग अर्धें मुर्धेंच टाकून देतात; अथवा उध-

ळेपणानें खर्च करून नुकसानींत येतात." मला घर बांधावयाचें झालें तर कसें बांधीन तें मी तुला सांगतों.

विष्णु– हो, हेंच मला पाहिजे आहे.

वामन– 'मनुष्यानें घर बांधून पहावें आणि कार्य करून पहावें.' अशी एक आपल्यांत ह्मण आहे. तिचा अर्थ हा कीं, ह्या दोन गोष्टींत नेहमीं अजमासाच्या बाहेर पुष्कळ खर्च होत असतो. ह्याकरितां घर बांधण्यास आरंभ करावयाच्या अगोदर किती खर्च लागेल त्याचा मी सढळ रीतीनें अजमास करून पाहीन, आणि तितका खर्च मला पार पाडितां येईल अशी खात्री झाली ह्मणजे मग मी हवाशीर, सुखी खडखडीत, आणि जवळपास चांगलें पाणी असणारी, अशी जमीन पाहून विकत घेईन; अथवा पुष्कळ मुदतीच्या कौलानें भाड्यानें घेईन. कौल थोड्या वर्षांचा असला ह्मणजे माझें घर जमिनीचा मालक थोड्याच दिवसांत बळकावून बसेल.

विष्णु– मग पुढें काय करशील ?

वामन– मग घराला खोल्या किती पाहिजेत, दिवाणखाना कसा पाहिजे, सैंपाक घर केवढें पाहिजे आणि धुराडें कोठें व कसें असावें, ह्या गोष्टी मनांत आणून घराचा नकाशा एका कागदावर काढीन. तो पसंत पडला ह्मणजे मी घरास आरंभ करीन, आणि पाया भरतांना

विशेष काळजी घेईन. कारण पायाचें काम कच्चें झालें कीं घर पुरें होण्याच्या आंतच खालीं यावयाचें.

विष्णु—असे विचार माझ्या मनांत कधीं आले नसते.

वामन—नंतर घराच्या आसपास पाणी तुंबून घरास ओल येऊं नये, म्हणून पाणी निघून जाण्याला मी मोऱ्या बांधीन. घराच्या भिंती बांधण्याचें काम चाललें असतां मी गवंड्यांवर चांगली नजर ठेवीन. त्या बांधण्याला पक्या विटा आणि चांगला तयार केलेला चुना लावीन, त्यांत कसर झाली तर घर फार दिवस टिकणार नाहीं. भिंती सावकाशीनें बांधिल्या पाहिजेत, कारण त्यांना स्थिरावण्यास वेळ लागतो. मी घर बांधिते वेळीं जशा पाहिजेत तशा सोयी करून घेईन, आणि लोखंडाच्या नळाचेंच धुराडें बसवून टाकीन.

विष्णु—तूं विचार करावयास शिकला आहेस त्याचा चांगला उपयोग करितोस.

वामन—लांकूडकामांत विशेष नजर पुरविली पाहिजे. जर कुजकें अथवा भिकार लांकूड घरास लाविलें, तर तें घर कवडीच्या मोलाचें होईल. सुतार, गवंडी, कवलें घालणारा, आणि इतर मजूर ह्यांच्या पाठीवर मी सदैव राहीन, आणि प्रत्येक गोष्टीची खात्री करून घेत जाईन. घराला लागणारीं कुलुपें, कड्या, अडसर वगैरे सर्व चांगलें आहे कीं नाहीं तें पाहीन.

विष्णु– हो हो, सर्व गोष्टी आल्या ! मला कधीं घर बांधावयाचें झालें तर तूं सांगितलेल्या सर्व गोष्टी मनांत आणून काम चालवीन.

वामन– बरें आहे. स्वतः एखाद्या गोष्टीविषयीं विचार करण्याचा निश्चय करून जसें आपण विचार करण्यास शिकतों, तसें दुसऱ्याचे विचार ऐकून शिकत नाहीं. ह्याकारितां तुला घर बांधावयाचें झालें तर कसें करशील तें सांग.

विष्णु–पहिल्यानें मला किती खर्च लागेल त्याचा पैन् पै हिशेब करून तितका खर्च मला झेपेल किंवा नाहीं तें पाहीन, आणि मग खडखडीत सुखी, हवाशीर आणि जवळ चांगलें पाणी असलेली अशी जमीन पाहीन. मग ती विकत घेईन, किंवा विकत न मिळाल्यास चांगल्या पुष्कळ मुदतीच्या कौलानें घेईन. थोड्या कौलानें जमीन घेऊन मी आपलें घर जाऊं देणार नाहीं.

वामन– शाबास ! मग घर बांधण्यास आरंभ करशीलना ?

विष्णु– नाहीं; कौल झाला ह्मणजे मला जसें घर पाहिजे तसा नकाशा अगोदर तयार करीन, आणि त्याप्रमाणें घर बांधावयास लागेन. परंतु पाया चांगला झाला आहे कीं नाहीं तें आधीं पाहीन.

वामन— वाः, तुझे विचार सुरेख रीतीनें वाढत आहेत. बरें मग काय करशील ?

विष्णु— मग घराभोंवतीं पाणी सांठूं नये ह्मणून मोऱ्या बांधण्याकडे लक्ष देईन. नंतर चुना, विटा आणि लांकूड हीं सर्व चांगलीं आहेत अशी माझी खात्री झाली ह्मणजे गवंड्यांस सावकाशीनें भिंती बांधावयास सांगेन. सर्व कामकऱ्यांवर सारखी नजर ठेवीन, आणि घर बांधून होत आलें ह्मणजे कड्या, अडसर, ह्यांकडे लक्ष पुरवीन.

वामन— आजचें आपलें संभाषण पुढें तुझ्या पुष्कळ उपयोगीं पडेल. पण तुला सांगतों, विचार करण्यास शिकण्यासारखी दुसरी मौज नाहीं. मनुष्याचें शरीर हेंही अगदीं घरासारखें आहे. डोळे ह्या त्याच्या खिडक्या आहेत, आणि कान,नाक व तोंड हीं त्यांचीं दारें आहेत. आतां तूं उद्यां आलास ह्मणजे आपण त्याविषयीं बोलूं. तुला विचार करण्यास लावण्याजोगा हा विषय आहे.

विष्णु— बरें आहे. तूं मला पट्टा कां धांवतो, भोंवरा कां फिरतो, चेंडू कां उशी देतो, आणि पतंग कां उडतो, हें सांगितल्यापासून मला विचार करण्यास शिकण्याची फारच हौस उत्पन्न झाली आहे. आणि त्यांत मनुष्याचें शरीर हें घरासारखें कसें आहे हें जर सांगशील तर बहार होईल.

## भाग सोळावा.

वामन–विष्णु, फिरून आलास वाटतें. पण तुला विचारावयास नको, तुझें तोंडच सांगतें आहे.

विष्णु–होय, पण मला येण्यास उशीर झाला काय?

वामन–नाहीं, भिऊं नको. वेळेवरच आला आहेस. ज्या गोष्टीपासून संतोष व्हावयाचा असतो, ती साधण्यास ज्याप्रमाणें आपण वेळेवर तयार असतों, त्याप्रमाणें प्रत्येक कामाची आपणांस वेळ साधिली पाहिजे. मला पहिल्यानें 'शिकावयास ये' ह्मणून तुला बोलावावें लागत होतें, पण आतां तूं आपण होऊन येऊं लागला आहेस.

विष्णु–होय हें खरें. पहिल्यानें मला विचारशिक्षेविषयीं कांहीं समजत नव्हतें, पण आतां मला तिचें महत्व पूर्णपणें कळून आलें आहे. असो, आतां मनुष्याचें शरीर घरासारखें आहे, ह्याविषयीं चालूं दे.

वामन–ह्या शरीराच्या प्रत्येक अवयवाचा सुबकपणा, त्याची ठेवण, त्याची योग्यता, आणि निरनिराळ्या अवयवांची परस्परांशीं केलेली जडण, हीं लक्षपूर्वक पाहिलीं असतां अशी उत्तम कारागिरी एका ईश्वरावांचून कोणाच्यानेंही व्हावयाची नाहीं असें समजून येईल. त्याप्रमाणेंच शरीर हें एक घर आहे असें

मनांत आणिलें असतां असें चमत्कारांनीं पूर्ण भरलेलें दुसरें घर साऱ्या सृष्टींत दृष्टीस पडणार नाहीं.

विष्णु–ह्यांत इतकें काय चमत्कारिक आहे ? मला तर ह्यांत कांहीं इतकें विशेष आहेसें वाटत नाहीं.

वामन–विचार करणाऱ्या मनुष्याला शरीरांतील प्रत्येक भागांत चमत्कार दृष्टीस पडतील. ह्या शरीरांत इतके कांहीं भाग आहेत कीं, त्यांचीं नुसतीं नांवें सांगूं लागलें तरी देखील आपला सर्व वेळ निघून जाईल.परंतु मला अर्ध्यांचींसुद्धां नांवें माहीत नाहींत. शरीराचा कोणचाही अवयव पहात बसलें असतां आपण चकित होऊन जाऊं. असो, शरीर हें घराप्रमाणें आहे, ह्याविषयीं आतां आपण बोलणें चालवूं या.

विष्णु– मी सांगतों, तर तूं पायापासून आरंभ करशील. हं, चालूं दे. मी मध्यें मध्यें बोलतों त्यानें वेळ मात्र फुकट जातो.

वामन– आपण ज्या ह्या मातीच्या घरांत राहतों, त्याच्या पायाविषयीं आपणांस इतकेंच ह्मणतां येईल कीं, त्याचा पाया ह्मणजे मातीच आहे. आणि ही माती मुंगीसारखा एखादा लहान प्राणीही ढांसळून पाडील. ह्याचा कौल फार थोड्या मुदतीचा असतो, ह्मणजे जन्मास आलेला मनुष्य थोडे दिवस रहाणारा आहे;आ-

णि ते दिवसही संकटांनीं व्यापिलेले आहेत. एका कवीनें ह्मटलें आहे कीं,

ओंवी

मानवजीविताची अत्यल्प मिती ॥
तीही वेढिली असे विघ्नशतीं ॥
तरी ईशनामाची न होय स्मृती ॥
मनुजा संसारीं नवल हें ॥ १ ॥

विष्णु– कवीचें ह्मणणें अगदीं खरें आहे. असो, आतां भिंती यावयाच्या.

वामन– अशी घाई करूं नको; मला नीट वाटेल तसतसें मी सांगत जाईन. हें जें मी तुला सांगत आहें, हें माझ्या पदरचें नव्हे. वाचनापासून ज्या गोष्टी मला समजल्या आहेत त्या मी माझ्या शब्दांनीं तुला सांगत आहें. ह्या शरीररूपी गृहाच्या शेंड्याला घुमट आहे.

विष्णु– तो घुमट ह्मणजे काय बरें? हो, बहुतकरून मस्तक असावें.

वामन– ह्या घरांत राहणारा जो आत्मा त्याविषयीं मला तूर्त कांहीं बोलावयाचें नाहीं; मी आतां घराविषयीं मात्र सांगतों. ह्या घराचें लांकडी आणि लोखंडी काम ह्मटलें ह्मणजे हाडें हीं होत. हें काम मोठ्या योग्यतेचें आहे; आणि ह्या घराचे खांब पाय हे आहेत.

विष्णु– ह्या घराचा हाडांचा संच तर फार उत्तम आहे !

वामन– आणि डोळे ह्या खिडक्या; आणि तोंड, कान आणि नाकपुडच्या हीं त्याचीं दारें होत.

विष्णु– हें तूं मला अगोदरच सांगितलें आहेस.

वामन– ह्याचें आच्छादन स्नायूंचे, कातडीचें आणि केंसांचें आहे. सर्व सांधे हे ह्याचीं बिजागरें होत, कारण तेणेंकरून ह्या घराचे बहुतेक भाग खालवर आणि मागेंपुढें हालतात.

विष्णु– होय, हीं फार चांगलीं बिजागरें आहेत.

वामन– घुमट ह्मणजे मस्तक, हें ह्या घराला आणि खालील भागांला उत्तम शोभतें. ह्या घरांत सामान फारच भरलेलें आहे, परंतु मी त्यांपैकीं थोडेंसें सांगतों. घुमटामध्यें दांत, जीभ, आणि मेंदू हीं आहेत, आणि त्याच्या खालच्या भागांत रक्ताशय आणि फुप्पुस हीं आहेत.

विष्णु– ज्याच्या योगानें हें रक्ताशय असें एकसारखें वर खालीं होतें तें काय आहे ? छातीवर डाव्या बाजूस हात ठेविला ह्मणजे तें उडत आहे इतकें मात्र आपणांला समजतें.

वामन– तें मला तर काय, पण मोठमोठ्या शहाण्यांस देखील समजत नाहीं. ईश्वरानें आपणांमध्यें

जीवनकला ठेवून दिली आहे, पण ती काय आहे हें कोणालाही सांगतां येत नाहीं. रक्ताशय हें शरीरांत रक्त खेळवितें, आणि त्याला धमन्या व शिरा जोडलेल्या आहेत; त्या प्रत्येक अवयवांत रक्ताचा प्रसार करितात. फुप्फुस हें श्वासोच्छ्वास करून साऱ्या शरीरांतून शुद्ध हवा खेळवितें. मेंदूच्या साधनानें आपणांस विचार करितां येतो. जिभेचा आणि दांतांचा उपयोग काय, हें तुला आणि मला सारखेंच माहीत आहे.

विष्णु—ह्या शरीरांतील भागांविषयीं असें मला कधीं सांगतां आलें नसतें.

वामन— असें हें चमत्कारिक शरीररूपी घर तयार करण्याला, आणि तें दुरुस्त राखण्याला केवढें शहाणपण आणि सामर्थ्य पाहिजे ह्याचा विचार कर. असलीं घरें आज मितीला पृथ्वीच्या पाठीवर लाखों आहेत, आणि मागें कोट्यावधि होऊन नाश पावलीं आहेत तीं मनांत आण. त्याप्रमाणेंच पृथ्वीवर आज जे असंख्य पशु, पक्षी, मासे, किडे इत्यादि जीवंत आहेत त्यांविषयीं मनांत आण, ह्मणजे ईश्वरकृति किती अगाध आहे ह्याची थोडीशी कल्पना तुझ्या मनांत येईल. असो, ह्या मानवी शरीराविषयीं मीं जें काय थोडें बहुत तुला सांगितलें, त्यापैकीं जें तुझ्या लक्षांत राहिलें असेल तें आतां मला सांग.

विष्णु– सांगतों. पहिल्यानें मला शरीराचे किती भाग आहेत तें पाहूं दे. मस्तक, शरीर, बरें आतां अवयव– डोळे, कान, नाक, तोंड, दांत, जीभ, रक्ताशय, फुप्फुस, पोट, हात आणि पाय. आतां ह्यांचे उपयोग. मस्तकानें विचार करितां येतो, डोळ्यांनीं पाहतां येतें, कानांनीं ऐकतां येतें, नाकानें वास घेतां येतो व श्वासोच्छ्वास करितां येतो, दांतांनीं चावतां येतें, जिभेनें बोलतां येतें आणि रुचि घेतां येते, रक्ताशयानें अंगांत रक्त खेळतें, फुप्फुसानें शरीरांत शुद्ध हवा खेळते, पोटामध्यें खाल्लेल्या अन्नाचें पचन होतें, हातानें काम करितां येतें, आणि पायांनीं चालतां येतें. आतां अनुषंगिक गोष्टी पाहूं. कांहीं मुलें शाळेंत जाऊन विद्याभ्यास करितात, कांहीं आपल्या आईबापांस काम करूं लागतात, आणि कांहीं उनाड पोरें रस्त्यांतून खेळत असतात, आणि एकमेकांशीं भांडतात.

वामन–वाः, खासें बोललास. दिवसानुदिवस तूं चांगला सुधारत चालला आहेस. असो, आतां पुरे करूं या.

---

## भाग सतरावा.

विष्णु– आज मी आमच्या शेजाऱ्याबरोबर गिरण पहावयास जाणार आहें. जाण्याच्यापूर्वीं आपला विचारशिक्षेचा धडा अंतरूं देऊं नये, ह्मणून मी अगोदर इकडे आलों आहें

वामन—बरें तर, आपण आरंभच करूं या. एखाद्या विषयावर योग्य रीतीनें विचार केल्यापासून मोठा फायदा होतो, ह्याविषयीं आज मी तुला सांगणार आहें. ज्या विषयाविषयीं आपणांस बोलावयाचें किंवा लिहावयाचें आहे, त्याचे भाग नीट रीतीनें कसे करावे, हें समजलें ह्मणजे तो अपणांस चांगला स्पष्टपणें समजूं लागतो. विषय एकदम सगळ्याचा सगळा घेऊन त्यावर बोलूं लागल्यास सारा घोंटाळा होतो, परंतु त्याचे नीट रीतीनें भाग करून बोलूं लागल्यास क्रमा क्रमानें सर्व सांगतां येतें. आपण शरीराविषयीं बोललों, तेव्हां खालचा भाग, वरचा भाग, मस्तक असे त्याचे भाग केले होते, त्यामुळें त्याविषयीं आपणांस नीट बोलतां आलें हें तुला माहीत आहे.

विष्णु—होय, हें खरें.

वामन—ह्या कागदाकडे पहा. हा कागद निरनिराळ्या आकारांच्या काळ्या ठिपक्यांनीं भरून गेला आहे. आतां ह्या ठिपक्यांविषयीं तुला सांगावयाचें असलें तर हा अमुक ठिपका आणि तो तमुक ठिपका असें तुला सांगतां येणार नाहीं. तूं एक ठिपका दाखविलास, तर पुन्हा तोच चट्दिशीं दाखवितां येण्यासाठीं तूं त्याला काय ह्मणशील?

विष्णु—कां बरें? तो कागदाच्या उजव्या बाजूचा

ठिपका, अथवा तो कागदाच्या शेंड्याकडील ठिपका असें ह्मणेन ह्मणजे झालें.

वामन—परंतु कागदाच्या उजव्या बाजूस लहान मोठे शंभर दीडशें ठिपके आहेत हें तुला दिसतें आहे; आणि जर हा कागद कांहीं कारणानें असा फिरला गेला, तर तूं आतां ज्याला शेंडा ह्मणतोस तोच बुडखा होईल, आणि उजवी बाजू ह्मणतोस ती डावी होईल; आणि मग तेणेंकरून तुझ्या सांगण्यांत सगळी चूक होईल.

विष्णु—तर मी तो मोठा ठिपका, अथवा तो लहान ठिपका असें ह्मणेन.

वामन—पण असें ह्मणण्यानेंही कांहीं भागावयाचें नाहीं. कारण मी मुद्दाम ह्यावरील पुष्कळ ठिपके अगदीं सारख्या आकाराचे केले आहेत.

विष्णु—तर मग मला कांहीं समजत नाहीं बाबा.

वामन—थोड्याशा विचारानें हा घोंटाळा नाहींसा करितां येईल. मग कागदावर थोडेसे ठिपके असले ह्मणजे जसें तुला पाहिजे त्या ठिपक्याविषयीं सरळ रीतीनें सांगतां येईल, त्याप्रमाणेंच ह्यांविषयींही येईल.

विष्णु—हें न सांगतां येण्याचें अज्ञान जर दूर होईल तर मी पेढे वाटीन.

वामन—हें कसें सांगतां येईल तें पहा. आतां मी ह्या कागदाच्या एका शेवटास खूण करितों; हा ह्या

कागदाचा शेंडा समजावयाचा. आतां मी रूळ घेऊन पेन्सिलीनें ह्या कागदावर बोटा बोटाच्या अंतरानें उभ्या आणि आडव्या रेघा आंखतों. पहा, हा सर्व कागद चौरसांनीं भरून गेला. आतां ह्या पहिल्या चौरसापासून तों शेवटच्या चौरसापर्यंत १,२,३,४,५,६ असें मी आंकडे घालीत जातों, ह्मणजे प्रत्येक चौरसाला नंबर मिळेल. मग ह्या कागदावरील पाहिजे त्या ठिपक्याबदल मला बोलतां येईल.

विष्णु—परंतु हा अमुक ठिपका आणि तो तमुक ठिपका हें तुला त्यावरून कसें कळेल ?

वामन—तो पांचव्या चौरसांतील उजव्या बाजूचा ठिपका, अथवा तो बत्तिसाव्या चौरसाच्या मध्यावरील मोठा ठिपका असें-जसें असेल त्याप्रमाणें- मला सांगतां येईल. असेच ठिपके पाडिलेला, आणि असेच चौरस पाडून त्यांवरून आंकडे घातलेला दुसरा एक कागद तुझ्याजवळ असला, तर मग जरी आपण दूरच्या निरनिराळ्या गांवीं रहात असलों तरी आपणांस पाहिजे त्या ठिपक्याविषयीं परस्परांस लिहितां येईल; आणि आपण एके ठिकाणीं बसून पाहिल्याप्रमाणें त्या लिहिण्यावरून आपणांस समजेल.

विष्णु—हो, हें चांगलें आहे; पण ह्याचा उपयोग काय हें माझ्या ध्यानांत येत नाहीं.

वामन– तुझ्या ध्यानांत नाहीं येणार, कारण अद्यापि तुझा विचारशिक्षेंत व्हावा तसा प्रवेश झाला नाहीं. ह्या साध्या युक्तीनें जगांतील पुष्कळ उपयुक्त गोष्टींचे शोध लाविता येतात.

विष्णु– काय ? असल्या कागदानें !

वामन– असल्या कागदानें नाहीं, पण हा ज्या रीतीनें तयार केला आहे त्या रीतीनें. तुझ्याजवळ मोठें चित्र असलें, आणि तसेंच हुबेहुब दुसरें लहान चित्र तुला काढावयाचें असलें, तर तुझ्याजवळच्या मोठ्या चित्रावर चौरस कर; आणि जेवढी तुला प्रत करावयाची असेल तेवढा कोरा कागद घेऊन त्यावरही तितकेच चौरस कर. नंतर मोठ्या चित्राच्या एका चौरसांत त्याचा जो भाग आला असेल तितकाच भाग तूं कोऱ्या कागदावरील त्याच चौरसांत काढ. ह्याप्रमाणें सर्व चौरसांतील भाग काढिलेस ह्मणजे अगदीं हुबेहुब लहान चित्र निघेल.

विष्णु– होय, मी हें उद्यां करून पाहीन.

वामन– मीं ह्या कागदावर चौरस काढिले आहेत, त्यांबदल दुसऱ्या आकृति काढिल्या असत्या, आणि त्यांला आंकडे घातले असते तरीही काम झालें असतें.

विष्णु–होय, झालें असतें ह्यांत संशय नाहीं. कारण एकच काम करण्याला निरनिराळ्या रीति असतात.

वामन—ह्याच रीतीनें विद्वान लोकांनीं आकाशांतील ताऱ्यांचे भाग पाडिले आहेत, त्यामुळें पाहिजे त्या वेळीं कोणच्याहि ताऱ्याविषयीं त्यांस एकमेकांशीं बोलतां येतें. एकाच आकाराचे आणि रंगाचे शेंकडों तारे आकाशांत आहेत, तरी कोणच्या ताऱ्याविषयीं दुसरा बोलत आहे हें त्यांना चांगलें समजतें.

विष्णु—परंतु त्यांनीं आकाशांतील ताऱ्यांचे भाग कसे केले? त्यांना आकाशांत रेघा कशा काढितां आल्या?

वामन—त्यांनीं रेघा काढिल्या नाहींत, परंतु ताऱ्यांच्या प्रत्येक समुदायाकडे पाहून आणि त्यांच्या भोंवतालीं रेघांच्या कल्पना करून एका समुदायाला विंचू, दुसऱ्याला घोड्याचें तोंड, तिसऱ्याला पंजा, चवथ्याला चवथें कांहीं तरी अशीं नांवें दिलीं आहेत. त्या योगानें हा विंचवाच्या नांगींतला फार मोठा तारा, अथवा हा घोड्याच्या डोक्यांतला अगदीं लहान तारा, असें त्यांस ह्मणतां येऊं लागलें. अशा रीतीनें त्यांना कोणच्याही ताऱ्याविषयीं बोलतां येऊं लागल्यानंतर त्यांनीं ह्या काल्पनिक आकृति ताऱ्यांसहित कागदावर आणि गोलावर काढिल्या, त्यामुळें कागदावर किंवा गोलावर पाहून रात्रींप्रमाणें दिवसांदेखील त्यांना ताऱ्यांविषयीं बोलतां आणि लिहितां येऊं लागलें.

विष्णु– हें फार चांगलें. आतां मला कागदावरील ठिपक्यांचा उपयोग समजला.

वामन–कागदावर पृथ्वीची आकृति काढून आणि त्या आकृतीवर कल्पनेनें ठरविलेल्या आडव्या रेघा काढून त्या प्रत्येकीस अक्षवृत्त हें नांव दिलें आहे, आणि उभ्या रेघा काढून त्या प्रत्येकीस रेखावृत्त असें नांव दिलें आहे. ह्या रेघांवरून आंकडे घातले आहेत, त्यांवरून आपण जगाच्या कोणच्या भागावर आहों, अथवा समुद्रांत असल्यास किनाऱ्यापासून किती दूर आहों, हें प्रवाशांस समजतें. पृथ्वीचे सहा भाग मानिलेले आहेत, आणि त्या सहांचे पुन्हा देश, प्रांत, जिल्हे, तालुके असे लहान भाग केले आहेत. हे सर्व भाग पृथ्वीच्या आकृतींत दाखविले ह्मणजे पृथ्वीचा नकाशा तयार झाला. ह्या नकाशावरून जगाच्या कोणच्या भागावर कोणचें स्थल आहे हें समजतें.

विष्णु–विचाराच्या योगानें आपल्यास प्रत्येक गोष्ट समजूं लागते, असें मला वाटतें.

वामन –ज्ञानसंपादनामध्यें योग्य रीतीनें केलेल्या विचाराचा फार उपयोग होतो. जगामध्यें झाडें आणि फुलझाडें असंख्य आहेत हें तुला माहीत आहे. विचारी मनुष्यांनीं त्या सर्व झाडांचे वर्ग केले आहेत, त्यामुळें एखादें झाड दृष्टीस पडल्याबरोबर तें कोणच्या वर्गा-

तील आहे हें लागलेंच त्यांस शोधून काढितां येतें. त्याचप्रमाणें पृथ्वीवरील प्राण्यांचेही वर्ग केलेले आहेत; त्यांवरून पूर्वीं कधीं न पाहिलेला असा एखादा प्राणी आढळला तर विचारवान् मनुष्यास त्याच्या संबंधाच्या पुष्कळ गोष्टी शोधून काढितां येतात.

विष्णु—तो त्या कशा शोधून काढील?

वामन—ज्याला घारीसारखे मोठे पंख आहेत आणि ते सर्व पिसांनीं भरलेले आहेत, असा प्राणी सांपडला तर विचारी मनुष्य लागलाच समजेल कीं, हा प्राणी आकाशांत उडणारा आहे. परंतु जर कोंबडयाप्रमाणें शरीराच्या मानापेक्षां त्याचे पंख लहान असले तर तो मनांत आणील कीं, हा पक्षी उडणारा नव्हे, ह्याचे पंख ह्याला पळण्यास मात्र मदत करणारे आहेत. त्या पक्ष्याचीं बोटें कातडीनें जोडिलेलीं असलीं, तर बदक किंवा पाणकोंबडें ह्याप्रमाणें तो पाण्यांत पोहणारा आहे असें तो लागलेंच समजेल. त्याला घोडयाच्या पायांप्रमाणें चार पाय असून सुळे दांत नसले, आणि नुसते तोडणारे दांत आणि दाढा असल्या, तर तो समजेल कीं हा झाडावर चढणारा नसून वनस्पतीवर निर्वाह करणारा असावा. हा प्राण्यांवर निर्वाह करणारा असता, तर ह्याला प्राणी धरण्याला नखी पंजे असते, आणि तो खाण्याला तीक्ष्ण सुळे दांत असते.

त्याला मनुष्याप्रमाणें पंजे आणि सांधे असले, तर तो प्राणी माकडाप्रमाणें झाडावर चढणारा आहे असें तो खात्रीनें सांगेल.

विष्णु–आतां मी घरीं गेलों ह्मणजे तुझ्या कागदासारखा अगदीं हुबेहुब कागद तयार करीन, आणि लहानशा कागदावर एखाद्या घराचें चित्रही काढीन.

वामन–तूं जाण्याच्या पूर्वीं तुला एक दोन सोपे प्रश्न विचारून तुझी परीक्षा मला पाहूं दे. चिंचोक्या एवढे दांत असलेला एक प्राणी आहे असें तूं ऐकलेंस तर तो केवढा प्राणी असावा, हें तुझ्यानें सांगवेल काय?

विष्णु–नाहीं, परंतु तो मोठा असावा हें खचित. लहान प्राण्याला फार थोडें खावयाचें असतें, ह्मणून त्याला मोठ्या दांतांची गरज नाहीं.

वामन–चांगलें उत्तर दिलेंस. बरें, त्या प्राण्याला घारीसारखे पंख असले तर?

विष्णु–तो आकाशांत उडणारा आहे असें मी समजेन.

वामन–वाः, खासें उत्तर. बरें, जर त्याच्या कातडीवर पुष्कळ लोंकर असली, तर तो कोणच्या प्रदेशांत रहाणारा असावा हें सांगशील?

विष्णु–मला वाटतें तो थंड प्रदेशांत राहणारा

असावा, आणि ती लोंकर त्याच्या आंगांत ऊब राखण्यासाठीं असावी.

वामन—बहार केलीस! जा आतां.

---

## भाग अठरावा.

विष्णु—हा पहा माझा कागद कसा सुरेख तयार केला आहे तो.

वामन—होय, परंतु ह्या तुझ्या चौरसांवरून आंकडे कोठें आहेत?

विष्णु—अरे! कोठें गेले ते? हो, हे दुसऱ्या बाजूवर आहेत. ह्यांतच आंकडे घातले असतां गिचमीड होईल, ह्मणून ते दुसऱ्या बाजूला मांडिले आहेत.

वामन—होय आहेत, पण ज्या वेळेस ते पहावे लागतील, त्या वेळेस वारंवार कागद उलटावा लागेल.

विष्णु—खरेंच तें; पण असें होईल हें त्या वेळेस माझ्या ध्यानांत आलें नाहीं. बरें, हे कागद पहा, एकावर लहान चौरस केले आहेत, आणि दुसऱ्यावर मोठे केले आहेत.

वामन—हें बरेंच चांगलें केलेंस, परंतु हें तुझें घर उजव्या बाजूला कललें आहे. हें काढितांना थोडासा डाव्या हाताकडे कल देण्याचा यत्न करितास तर हें सरळ निघालें असतें.

विष्णु– पण हें उजव्या हाताकडे कललेलें कां निघालें? माझ्या मनांत तर हें चांगलें सरळ काढावयाचें होतें.

वामन– त्याचें कारण मला असें वाटतें कीं, तें उजव्या हातानें काढिल्यामुळें असें निघालें असावें. डाव्या हातानें कोणी काढील तर डावीकडे कललेलें निघेल. काल मीं एका जाग्यावरून अगदीं दुसऱ्या जाग्यावर सारून दिलेल्या एका घराचें चित्र पाहिलें आहे.

विष्णु– असें कसें घर सारितां येईल ?

वामन– यंत्रांनीं मोठमोठालीं वजनें उचलितां येतात हें तुला माहीत असेल. पूर्वीं एक प्रख्यात गणिती होऊन गेला, तो असें ह्मणत असे कीं, माझीं यंत्रें ठेवण्याला फक्त जागा मिळाली असती तर मीं जगाला हालविलें असतें. त्यानें ही अतिशयोक्ति केली खरी, परंतु फार मोठ्या शक्तीचीं यंत्रें हल्लीं उपयोगांत असलेलीं आपल्या पाहण्यांत व ऐकण्यांत येतात.

विष्णु– तुला यंत्रांविषयींही पुष्कळ माहिती असेल?

वामन–फारशी नाहीं, परंतु मुख्य ज्या सहा यांत्रिक शक्ति, त्या मला ठाऊक आहेत. त्या ह्या:–तरफ, कप्पी, अक्षचक्र ह्मणजे चाक आणि आंस, उतरण, पाचर आणि मळसूत्र.

विष्णु– ह्या सहा यांत्रिक शक्तींविषयीं कृपा

करून मला सांग. पहिली काय बरें? हो, तरफ.

वामन–तूं विचार करशील तर तुला असें दिसून येईल कीं, ह्या जगामध्यें मनुष्याला श्रम केल्याशिवाय कांहीं प्राप्त होत नाहीं, आणि श्रम केल्यानें तर त्याला फार त्रास होतो; ह्मणून तो फारसे श्रम न पडतां कोणच्या युक्तीनें आपलें कार्य साधेल हें पहात असतो. तशांत जर त्याला एखादी नवी शक्ति सांपडली तर तिजपासून तो आपलें काम करून घेत असतो. त्याला जें ओझें स्वतः नेववत नाहीं तें तो घोड्याच्या किंवा बैलाच्या पाठीवर घालितो, ह्मणजे तो आपलें काम करून घेण्याला घोड्याच्या किंवा बैलाच्या शक्तीचा उपयोग करितो. त्याप्रमाणेंच तो वाफेला गिरण व जहाज चालवावयास लावितो, तेव्हां तो वाफेच्या शक्तीचा उपयोग करितो.

विष्णु–पण तरफेविषयीं तूं अद्यापि कांहीं एक सांगितलें नाहींस.

वामन–एखादा मोठा वाळूचा ढीग तुला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न्यावयाचा असला, तर तो तुला एकदम उचलितां येणार नाहीं, तरी तो थोडा थोडा तुला नेतां येईल. परंतु जर एखादें लांकडाचें खोड अथवा मोठा धोंडा एका ठिकाणाहून दुसरीकडे न्यावयाचा झाला, तर तुला स्वस्थ बसावें लागेल. कारण

तूं जशी वाळू थोडथोडी नेऊन सारी संपविशील, तसें हें तुला करितां यावयाचें नाहीं.

विष्णु– तें ओढून नेण्याला बैल लाविले तर कसें होईल ?

वामन– पण सर्वांस बैल मिळतीलच असें नाहीं; आणि बैलांशिवाय तें काम करितां आलें तर फारच चांगलें. तें काम तरफेच्या साह्यानें होईल.

विष्णु– तें कसें ? तरफ कशी असते ?

वामन– तरफ ह्मणजे लोखंडाची लांब पहार, अथवा दंडासारखें जाड लांकूड असतें; आणि त्याच्या एका शेवटाजवळ त्याला उचलून धरण्यासारखा आधार असतो त्याला टेकू असें ह्मणतात. आतां हें टेबलावरील मोठें पुस्तक मला दूर सारावयाचें आहे असें मनांत आण. ही गारगोटी मी ह्या पुस्तकाजवळ बोटाच्या अंतरावर ठेवितों, आणि हें चाकूचें पातें गारगोटीवर टेकून त्याचा शेंडा पुस्तकाच्या खालीं घालवेल तितका घालितों. आतां चाकूची मूठ खालीं दाबिल्याबरोबर पातें पुस्तकाला कसें ढकलून देतें पहा. चाकूची मूठ जशी लांब असेल तसें हें पुस्तक सहज रीतीनें ढकलिलें जाईल. तरफेच्या योगानें मोठीं ओझीं कशीं उचलीं जातात हें समजण्यासाठीं पुस्तक हें मोठें ओझें

आणि चाकू ही लोखंडाची पहार किंवा लांब लांकूड आहे असें मनांत आण ह्मणजे झालें.

विष्णु— ह्यावर मला चांगला विचार केला पाहिजे.

वामन— होय, विचार करण्यास शिकण्यामध्यें सुधारणा करण्याचा हाच मार्ग आहे. कुदळ हीही तरफच आहे. कारण कुदळ जमिनींत मारून तिचा दांडा एका बाजूस दाबिला ह्मणजे दांड्याचा बुंधा भरींव जमिनीवर टेकून कुदळीचें टोंक जमिनीचा टवका काढितें. कुदळीचा दांडा जितका लांब असेल तितकें जमीन उकरण्यास सोपें. आतां दुसरी यांत्रिक शक्ति कप्पी.

विष्णु— होय, आतां कप्पीविषयीं चालूं दे.

वामन— कप्पी हें एक तळहाता एवढें चाक असतें, आणि त्याला सभोंवतीं खांचणी पाडून तें एका लांकडाच्या ठोकळ्यांत बसाविलेलें असतें. ही कप्पी वर कशाला तरी बळकट अडकवून तिच्या चाकावरून लांब दोरी घालावी, आणि तिच्या एका शेवटास ओझें बांधून दुसरें शेवट धरून ओढावें, ह्मणजे ओझें वर उचलत जातें. कप्प्या जसजशा अधिक लावाव्या तसतसें ओझें उचलण्यास अधिकाधिक सोपें पडतें. मोटेचें चाक ही कप्पीच आहे.

विष्णु—कप्पी मला समजली. आतां तिसरी शक्ति कोणची? हो, अक्षचक्र ह्मणजे चाक आणि आंस.

वामन—ह्या शक्तीचा फार उपयोग आहे. आपल्या घरांतील विहिरींवरून रहाट लाविलेले असतात तीं अक्षचक्रेंच होत. अक्षचक्राचें चाक ज्या मानानें आंसापेक्षां मोठें असेल, त्या मानानें हें अधिक ओझें उचलतें. हें एका प्रकारची तरफच आहे; पण प्रत्येक शक्ति नीट समजण्यास विचार पाहिजे. रहाटाच्या साह्यानें विहिरींतून घागर भरून काढितां येते. ह्याचें कारण रहाटाचीं जीं पातीं असतात तीं चाकाचें किंवा तरफेचें काम करितात; आणि ज्यासभोंवतीं दोर गुंडाळतो तो आंस होय.

विष्णु—आतां चवथी पाचर. अरे नाहीं, अगोदर उतरण.

वामन—उतरण ह्मणजे थोडथोडा होत गेलेला उतार; मग तो जमिनीचा असो, फळ्यांचा केलेला असो, अथवा दुसरा कशाचाही असो. उतरणीच्या योगानें जड पदार्थ वर चढवितां येतात. माडीवरून खालीं येण्याचा जिना ही उतरणच आहे.

विष्णु—पण पायऱ्या नसल्या तर इतकी खडी उतरण माझ्यानें चढवणार नाहीं. चढवेल काय?

वामन—नाहीं. परंतु पायऱ्यांच्या योगानें ह्यापेक्षां अधिक खडी असलेलीही उतरण चढतां येईल. घाटांतून सडक नेलेली असते ती पायथ्याशीं जमिनीवरोबर

असते, आणि डोंगराच्या शेंड्याला पन्नास पाउणशें हातांपेक्षां अधिक उंच असते. परंतु सडक ही उतरण असल्यामुळें ओझ्यांनीं लादलेल्या गाड्या बैल भराभर ओढून नेतात. तीच सडक खडी असली, तर त्यांच्यानें गाडी मुळींच ओढवणार नाहीं. उतरण ज्या मानानें कमी खडी असेल त्या मानानें ओझें चढविण्याचें काम अधिक सोपें जातें.

विष्णु—उतरणीचा उपयोग आतां मला समजला.

वामन—पांचवी शक्ति पाचर ही आहे. हा लांकडाचा अथवा धातूचा चौकोनी तुकडा एका बाजूला जाड आणि दुसऱ्या बाजूला पातळ असा केलेला असतो. कुऱ्हाडीचा लोखंडाचा भाग ही पाचरच आहे. जर पाचरेची पातळ बाजू लांकडाच्या चिरींत बसवून तिच्या जाड बाजूवर घणानें ठोकिलें तर ती त्या लांकडाच्या चिरफळ्या करीत जाईल. फार मोठ्या शिळेखालीं अथवा लांकडाखालीं चहूंकडून पाचरा घालून ठोकिल्या, तर तें ओझें खंडोगणती वजनाचें असलें तरी हळू हळू वर उचलत जाईल. आतां शेवटची शक्ति मळसूत्र ही होय.

विष्णु—हो, मळसूत्राविषयीं सांग ह्मणजे झालें.

वामन—मळसूत्र हें पाचरेसारखेंच हळूहळू काम करितें. हें उतरण आणि तरफ अशा दोहोंचींही कामें

करितें. ज्या शक्तीनें तें फिरतें ती तरफ होय, आणि त्याच्यासभोंवतीं जे वेढे असतात ती उतरण होय. मोठ्या मळसूत्राची शक्ति विलक्षण असते.

विष्णु– आजचें आपलें फार चांगलें संभाषण झालें. आणि अशी तुझी मेहेरबानी असतांही जर मी शिकलों नाहीं, तर मला मूर्ख हें विशेषण अगदीं योग्य होईल.

वामन– आतां आपण उठण्याच्या अगोदर दुसरी एक गोष्ट तुला सांगावयाची आहे, ती अशी कीं, उद्यां मी पुण्यास जाणार आहें. मी पुन्हा परत येईपर्यंत विचार करण्यास शिकण्यामध्यें माझें साह्य तुला मिळावयाचें नाहीं.

विष्णु– छे, हें चांगलें होत नाहीं बाबा. तूं येईपर्यंत माझें शिकणें राहील इतकेंच नाहीं, पण थोडेंसें शिकलों आहें तेंही अर्धेंमुर्धें विसरून जाईन.

वामन– असें होणार नाहीं, भिऊं नको. मी गुरुजींजवळ तुझ्याविषयीं बोललों आहें, आणि 'तो मजकडे येईल तर मी त्यास मदत करीन' असें त्यांनीं सांगितलें आहे. तूं त्यांजकडे जात जा. त्यांचा स्वभाव फार चांगला आहे. ते कोणालाही हिडिसफिडिस न करितां मोठ्या आवडीनें शिकवितात; असे ते ममताळू आहेत. तूं त्यांच्याशीं अर्धा तास बोलत बसला नाहींस तोंच ते मज प्रमाणेंच आहेत असें तुला वाटूं लागेल.

विष्णु– असें आहे, तर मी उद्यां त्यांजकडे जाईन. पण तुला समुद्राविषयीं कांहीं विचारावेंसें मला वाटतें.

वामन– हो, विचार; मी सांगण्याला तयार आहें.

विष्णु–समुद्राची लांबी आणि रुंदी किती असेल बरें?

वामन– कांहीं ठिकाणीं तो हजारों मैल लांब आणि हजारों मैल रुंद आहे.

विष्णु–आणि खोल किती आहे ?

वामन– तें कोणालाही सांगतां येणार नाहीं. अद्यापि त्याचा अंत लागलेला नाहीं. समुद्राचें पाणी एक मैल लांब, एक मैल रुंद आणि एक मैल खोल अशा दोन कोटि तीस लक्ष हौदांतून सांठविलें, तर ते सर्व हौद तोंडोतोंड भरतील. व्हेल माशाच्या तोंडांत एखादी होडी सहज मावेल एवढा तो मोठा असतो, तथापि जेव्हां भरती गर्जना करीत येऊं लागते, तेव्हां अशा हजारों माशांच्यानें तिला क्षणभर देखील प्रतिबंध करवत नाहीं.

विष्णु–केवढी तरी प्रचंड शक्ति ही !

वामन– हा सागर आज कैक वर्षें भरतीओहटीच्या योगानें एकसारखा मागें पुढें होत आहे, तथापि त्याला ईश्वरानें जी मर्यादा नेमून दिली आहे, तिच्या बाहेर तो कधीं जात नाहीं. शिवाय समुद्र हा दोन देशांस जोडणारा मोठा रस्ता आहे.

विष्णु– समुद्र दोन देशांस जोडतो ? तो त्यांना निराळें करितो असें मला वाटतें.

वामन– तो कसा जोडतो पहा. समुद्र आहे त्या ठिकाणीं जमीन असती तर तिजवर निरनिराळ्या लोकांची वस्ती झाली असती, आणि मग त्यांच्या निरनिराळ्या चालींनीं, भाषांनीं, लढायांनीं वगैरे ज्या दूर दूरच्या देशांस हल्लीं आपणांस जातां येतां येतें, तेथें जातां येतां आलें नसतें.

विष्णु– हो, ह्यावरून तो दोन देशांस जोडतो हें सिद्ध झालें.

वामन– समुद्रावर लाखों प्राण्यांचा निर्वाह होत आहे इतकेंच नाहीं, तो दूर दूरच्या जमिनींस पाणी पुरवून चहूंकडे गारेगार करून सोडतो.

विष्णु– काय, तो दूरच्या जमिनींस पाणी पुरवितो? हें तो कसें करितो ?

वामन– सूर्याचे किरण त्याच्या पृष्ठभागावर पडले, ह्मणजे ते वाफेच्या रूपानें त्यांतील लाखों घागरी पाणी वर ओढून नेतात. नंतर ह्या वाफेस वारा दूर दूरच्या देशांस वाहून नेतो. ही वाफ पुष्कळ एके ठिकाणीं जमली ह्मणजे ती ढगांच्या रूपानें आपल्या दृष्टीस पडत असते. ह्या ढगांपासून पर्जन्यवृष्टि होऊन सर्व जमीन सुफल होते. ह्याशिवाय समुद्रापासून आपणांस हजारों

खंडी मिठाचा पुरवठा होतो. त्याप्रमाणेंच मोत्यें, पोंवळीं, स्पंज इत्यादि शोभेचे आणि उपयोगाचे असे पुष्कळ पदार्थ त्यापासून प्राप्त होतात.

विष्णु— ह्या संबंधानें एक शब्दही मीं कधीं ऐकला नव्हता. ह्यानें मला अगदीं चकित करून टाकिलें आहे.

वामन— असो, आतां आपण पुरे करूं या. तूं उद्यां गुरुजींकडे जाण्यास विसरूं नको.

---

## भाग एकोणिसावा.

गुरु— विष्णु, तूं आलास हें पाहून मला फार संतोष झाला.

विष्णु— आपण कृपा करून मला येण्याची परवानगी दिली, त्यामुळें मला आनंद झाला आहे. वामनानें जाते वेळीं आपल्याकडे वेळेवर जात जा असें मला सांगितलें आहे.

गुरु— तो स्वतः वेळेवर येणारा आहे, आणि तो विचारी मुलगा असल्यामुळें लवकर सुधारत चालला आहे, परंतु आपण त्याच्या गोष्टी बोलत बसून वेळ घालवूं नये. तूं बराच शिकला आहेस असें त्यानें मला सांगितलें आहे. आतां तूं भोंवरा कां फिरतो, जंगी भोंवरा कां वाजतो, चेंडू कां उडतो, आणि हवेमध्यें पतंग कसा वर जातो हें मला सांगशील काय?

विष्णु– समजलों, वामनानें ह्या सर्व गोष्टी आपल्या-जवळ सांगितल्या आहेत असें मला वाटतें.

गुरु– असें खरें, तुमच्यामध्यें जें काय होई तें तो मला नेहमीं सांगे, आणि पुढें तुला कसें शिकवावें हेंही विचारी. त्यानें तुला पदार्थांच्या गुणधर्मांविषयीं, टेबला-विषयीं, आणि पुस्तकाविषयीं सांगितलेलें तुला स्मरतें काय ?

विष्णु– होय, चांगलें स्मरतें. त्यानें मला आणखी पुष्कळ गोष्टींविषयीं सांगितलें आहे.

गुरु– मग तुझा वेळ कांहीं फुकट गेला नाहीं. तूं शहाणपणानें विचार करून उत्तरें द्यावीं, ह्मणून त्यानें तुला पुष्कळ प्रश्न विचारिले असावे. आतां एक शेर शिसें आणि एक शेर कापूस ह्यांतून अधिक जड कोणचें, हें तुला चांगलें माहीत आहे असें मला वाटतें.

विष्णु– त्यांमध्यें काडी इतकाही फरक नाहीं, परंतु पहिल्यानें मी घोंटाळ्यांत पडलों होतों.

गुरु– विचार वाढत जातात असें कधीं वामनानें तुला सांगितलें काय ? आणि फुलांविषयीं तो तुजजवळ बोलला काय ?

विष्णु– होय, आणि त्याचें ह्मणणें ऐकून मला फार आश्चर्यही वाटलें होतें.

गुरु– काम करण्याच्या निरनिराळ्या रीति असतात

हें तुला माहीत असेल, आणि जे आपल्यापेक्षां निराळ्या रीतीनें काम करितात ते कमी आहेत असें आपण कधींही समजूं नये.

विष्णु– हें सर्व त्यानें मला सांगितलें आहे, आणि घर बांधण्याविषयीं माझे विचार किती वेडगळ आहेत हेंही त्यानें मला दाखविलें आहे.

गुरु– तुला विचार करावयास लावण्याविषयीं त्यानें जे प्रश्न तुला विचारिले, त्यांपैकीं बरेच फार चमत्कारिक होते.

विष्णु- होय, परंतु आतां मी थोडीशीं चांगलीं उत्तरें देईन.

गुरु– वाईट स्वभावाचा आणि कुद्या मनाचा असा एक शाळासोबती असला, तर तूं त्याला कोणच्या रीतीनें ताळ्यावर आणशील.

विष्णु– तो चांगला वागला नाहीं तर ' गुरुजींस सांगेन ' असा मी त्याला धाक घालीन.

गुरु– ह्यापेक्षां दुसरा चांगला उपाय कोणचा?

विष्णु– त्याला चांगली शिक्षा द्यावी.

गुरु– नाहीं, तेणेंकरून तो कदाचित् अधिक बिघडेल. माझ्या मतें त्यावर ममता करणें हा उपाय चांगला. मी शाळेंत शिकत होतों, तेव्हां असाच एक वाईट स्वभावाचा मुलगा मला भेटला होता. पहिल्यानें

मी त्याचा तिरस्कार करीत असें, परंतु ती चूक आहे असें माझ्या लक्षांत येतांच मीं तें सोडून दिलें; आणि एके दिवशीं तो एक उदाहरण घेऊन फार वेळ कुचंबत बसला होता, ती संधी पाहून मीं तें त्याला नीट समजावून सांगितलें. तेव्हांपासून तो माझ्याशीं अगदीं मोकळ्या मनानें वागूं लागला.

विष्णु– ह्या युक्तीनें ताळ्यावर आला अं ?

गुरु– आणि आला ह्यांत आश्चर्य नाहीं. नीतिशास्त्रच सांगत आहे कीं, जे शत्रु आहेत त्यांवर प्रीति करावी, जे आपलें अकल्याण चिंतितात त्यांचें कल्याण चिंतावें, आणि आपला द्वेष करितात त्यांचें बरें करावें.

विष्णु– वामनानें जाण्याच्या पूर्वीं सांगितलें होतें कीं, ‘ तूं गुरुजींकडे जात जा. तूं त्यांच्याजवळ अर्धा तास बसला नाहींस तोंच ते मजप्रमाणेंच आहेत असें तुला वाटूं लागेल. ’ हें त्याचें ह्मणणें आतां माझ्या प्रत्ययास येत आहे.

गुरु– हें ऐकून मला संतोष होतो. तुला कांहीं निराळेपणा वाटूं नये ह्मणून मी वामनाप्रमाणेंच तुझ्याशीं बोलतों आहें. तो परत येईपर्यंत विचार करण्यास शिकण्यामध्यें मी तुला आनंदानें मदत करीन; तथापि सिद्धि प्राप्त होणें, हें मुख्यत्वें तुझ्यावर आहे. ह्या करितां तुझ्यावर संपाविलेल्या गोष्टींविषयीं सारासार विचार करण्याचा तूं सतत नियम कर.

## भाग विसावा.

गुरु– आलेस ! बरें झालें. आज क्षणही न गमतां तुझ्या सारासार विचाराच्या सुधारणेच्या संबंधानें मी तुला कांहीं सांगणार आहें.

विष्णु– विचार करण्यास शिकल्यानें आपला सारासार विचार सुधारेल.

गुरु– नुस्ता विचार केल्यानें तो सुधारेल असें नाहीं, परंतु शहाणपणानें विचार केला तर त्याची वृद्धि होईल. बरें वाईट, सत्य असत्य, योग्य अयोग्य, हीं एकमेकांत अशीं कांहीं मिसळून गेलेलीं असतात कीं, तीं निरनिराळीं शोधून काढण्याला चांगली सारासार विचारशक्ति पाहिजे. काळ्यांतून पांढरे अथवा पांढऱ्यांतून काळे पदार्थ ओळखून काढण्याला कांहीं अडचण पडत नाहीं, परंतु तेच जर काळ्यापासून पांढऱ्यापर्यंत जितके ह्मणून रंगाचे प्रकार आहेत तितक्या रंगांचे असले, तर ते ओळखून काढण्यास फार पंचाईत पडेल.

विष्णु– होय; पडेल खरी.

गुरु– आतां मी एक लहानशी गोष्ट सांगतों ती नीट लक्ष देऊन ऐक, ह्मणजे तुला कसा काय सारासार विचार आहे तो मला कळेल. एक मुसलमान फार गरीब होता. त्याला लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें.

तो एके दिवशीं आंगरखा व पागोटें घालून इमारतीच्या लांकडांचीं झाडें खरेदी करण्यास निघाला, तेव्हां त्याच्याजवळ पांचशें रुपये मात्र होते, आणि--

विष्णु– पांचशें रुपये! आणि तुह्मीं सांगितलें आहे कीं तो फार गरीब होता. गरीब मनुष्याजवळ पांचशें रुपये कोठून येतील ?

गुरु– खरेंच; तूं विचार करितो आहेस, आणि तुला थोडासा सारासार विचारही आहे. त्याच्याजवळ पांचशें रुपये होते असें ह्मणण्यांत कांहींतरी चूक आहे असें मानूं या, आणि त्याच्याजवळ पैसा मुळींच नव्हता असें धरून चालूं या. असो, तो गरीब मनुष्य वाटेनें चालला असतां त्याची लहानशी शेंडी वाऱ्यानें भुरूभुरू उडत होती.–

विष्णु– शेंडी उडत होती ! त्यानें पागोटें घातलें होतें असें तुह्मीं सांगितलें आहे. डोकीस पागोटें असल्यावर वाऱ्यानें शेंडी कशी उडेल ? आणि त्यांत तो मुसलमान आहे. मग शेंडीचें नांवच नको !

गुरु– असें सांगितलें होतें ? तर मला वाटतें तसें सांगण्यांत चूक असली पाहिजे. असो, तो त्या मैदानांत झाडें खरेदी करण्यास गेल्याबरोबर–

विष्णु– मैदानांत ! हः हः! झाडें रानांत असावयाचीं, असें असतां तो तीं घेण्याला मैदानांत कसा जाईल ?

गुरु—असें? तर मग तो मैदानांत गेला असें ह्मणण्यांत चूक आहे. असो, मग त्यानें तेथें झाडें खरेदी करून तोडण्यास आरंभ केला, आणि—

विष्णु— त्याच्याजवळ पैसा नव्हता, आणि तो एकटा होता तर त्यानें झाडें कशीं खरेदी केलीं, आणि तीं तोडण्यास कसा आरंभ केला? आणि शिवाय असलीं झाडें तोडण्यास अनेक प्रकारचीं हत्यारें लागतात, त्यांचें तर कोठें नांव देखील नाहीं!

गुरु— असें झालें काय? मग त्यानें झाडें तोडण्यास आरंभ केला असें ह्मणण्यांत चूक आहे.

विष्णु— मला वाटतें साऱ्या चुकाच आहेत. कारण जरी त्यानें झाडें तोडिलीं असतीं, तरी त्यांचीं पुढें व्यवस्था करण्यास त्याच्याजवळ कांहीं एक साधन नव्हतें.

गुरु— तुझें ह्मणणें बरोबर आहे. चुका काढण्याजोगा तुला सारासार विचार आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं मी गोष्ट सांगतांना मुद्दाम चुका करीत होतों; परंतु तूं त्या काढिल्यास त्या योगानें मला आनंद झाला. कोणत्याही गोष्टींतील खरेंखोटें पाहत बसण्याच्या अगोदर त्या गोष्टीचे निरनिराळे संबंध कसे आहेत ते पाहिले पाहिजेत. ते विचारपूर्वक पाहूं लागलें ह्मणजे तिचें स्वरूप कसकसें बदलतें तें मी आतां तुला दाखवितों.

एखाद्या मनुष्यानें येऊन तुला सांगितलें कीं, एका गरीब मनुष्याचा मुलगा पैसा घेऊन एका माळणीजवळ गेला, आणि तिच्यापाशीं आंबे विकत मागूं लागला. त्या माळणीनें ते त्याला दिल्यावर मग ती त्यास अपशब्द बोलूं लागली. तर तुला वाटेल कीं, ती द्वाड माळीण त्याला विनाकारण अपशब्द बोलली.

विष्णु– होय, असें कां वाटूं नये बरें?

गुरु– आतां लक्षांत आण. ही गोष्ट खरी ह्मणून जरी सांगितलेली आहे, तरी ती सर्वच खरी असेल असें नाहीं. ज्या मनुष्याला सारासार विचार आहे तो मनांत ह्मणेल कीं, जी गोष्ट सांगण्यांत आली तिच्या पलीकडे जर त्या मुलानें कांहीं केलेलें नाहीं, तर ती माळीण त्यावर इतकी रागावणार नाहीं. ह्मणून तो पुढें चौकशी करून त्या मुलाचा पैसा खोटा होता असें शोधून काढील. असें झालें ह्मणजे खटल्याचें स्वरूप बदललें, आणि मुलगाच लुच्चा ठरला.

विष्णु– होय, मग असें मनांत येईल खरें.

गुरु– पुढें आणखी चौकशी केल्यावरून जर मुलाच्या पक्षानें एखाद्यानें सांगितलें कीं, त्या मुलानें तिला खोटा पैसा दिला खरा, परंतु तो खोटा आहे असें त्याला माहीत नव्हतें. त्याच्या बापानें तो त्याला देऊन आंबे आणावयास पाठविलें होतें.

विष्णु—तर मी ह्मणेन कीं, त्या माळणीनें त्या मुलाला विनाकारण छळिलें.

गुरु—ज्याला नीट विचार कसा करावा हें ठाऊक नाहीं तो तुझ्यासारखेंच ह्मणेल, परंतु समंजस मनुष्याचें असें सहज समाधान होणार नाहीं. तूं त्या मुलाच्या बापाकडे जाऊन त्याला विचारिलेंस, आणि त्यानें 'मीं त्याला पैसा मुळींच दिला नव्हता इतकेंच नाहीं, तर असें लबाडीचें कृत्य पूर्वीं केल्याबद्दल मीं त्याच्या तोंडांतही दोन भडकाविल्या होत्या.' असें सांगितलें; तर तुला काय वाटेल ?

विष्णु—असें माझ्या मनांत कधींच आलें नाहीं. मग तर तो मुलगा पक्का ठक आणि चोर ह्मणावयाचा.

गुरु—जरी हा खटला निरनिराळ्या रीतींनीं दाखविला गेला, तरी ज्यामध्यें सारासार विचाराच्या योगानें सत्य शोधितां येतें असें हें उदाहरण तुजपुढें आहे. चांगला विचार करावयास शिकण्याच्या पूर्वीं जर तूं आमचा न्यायाधीश झालास, तर बहुतकरून निरपराधी ते अपराधी ठरतील, आणि अपराधी अज्ञी सुटून जातील. आपणा सर्वांस पुढें मागें पाहून चालावयाचें आहे तर थोडासा तरी विचार अवश्य पाहिजे.

विष्णु—हः हः ! मी न्यायाधीश झालों ह्मणजे न्यायाला हद्दपारच व्हावें लागेल !

गुरु– कपडे चोरल्याबद्दल एका चोरास एकदां न्यायाधीशासमोर आणिलें होतें. तेव्हां ज्यानें त्यावर फिर्याद केली होती त्यानें न्यायाधीशास सांगितलें कीं, "ह्यानें कपडे चोरतांना ज्या दोघांनीं पाहिलें आहे, ते माझे साक्षीदार पाहिजे तर मी हजर करितों." तेव्हां गुन्हेगार ह्मणाला, "महाराज, आणि मी कपडे चोरतांना ज्यांनीं पाहिलें नाहीं, असे माझे दहा साक्षीदार मी हजर करितों." तेव्हां न्यायाधीश ह्मणाला, "ज्यापेक्षां ह्याचे आठ साक्षीदार जास्ती आहेत त्यापेक्षां ह्याला सोडून द्यावें हें योग्य आहे." ह्यावर तूं काय ह्मणतोस सांग. न्यायाधीशाचें हें ह्मणणें बरोबर होतें कीं चुकीचें होतें ?

विष्णु– मला वाटतें चोरतांना पाहिलें ह्मणणारे सारे दोन, आणि पाहिलें नाहीं ह्मणणारे दहा होते, त्यापक्षीं न्यायाधीशाचें ह्मणणें बरोबर होतें.

गुरु– आणि मी तर ह्मणतों, त्याचें ह्मणणें अगदीं चुकीचें होतें. ज्यांनीं त्याला चोरी करितांना पाहिलें नाहीं असे दहाच काय, पण हवे तितके लोक सांपडतील. कारण चोर चोरी करितो ती लोकांची नजर चुकवूनच करावयास पहात असतो. आतां नीट लक्ष दे हो. एक मनुष्य जमिनीवर पडला आहे, आणि दुसरा हातामध्यें रक्तानें भरलेला सुरा घेऊन धूम पळत

आहे असें तुझ्या दृष्टीस पडलें तर तूं काय करशील?

विष्णु–मी त्याला 'पकडा, पकडा,' ह्मणून ओरडत त्याच्या पाठोपाठ धांवत जाईन आणि तो सांपडला ह्मणजे त्याला न्यायाधीशाकडे ओढून नेईन.

गुरु–असें करशीलसें मला वाटलें होतें; आणि खून झाला असें मानण्यास एवढें पुरेंही आहे. परंतु अगोदर त्याचें ह्मणणें काय आहे तें ऐकून घेणें हें शहाणपणाचें आहे.

विष्णु–पण त्याचें ह्मणणें आणखी काय असणार!

गुरु–तो ह्मणेल, 'मी जातीचा खाटीक आहें. मीं आपलें काम करीत असतां ह्या मनुष्यास झीट येऊन खालीं पडतांना पाहिलें ह्मणून मी झट्कर तसाच इकडे धांवत आलों, आणि ह्यास मूर्च्छा आलेली पाहून सुरा खालीं ठेवीत न बसतां मी हा पाणी आणण्यास चाललों आहें.' हें त्याचें ह्मणणें खरें असेल, आणि त्या जमिनीवर पडलेल्या मनुष्याच्या आंगावर एकही जखम तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं. असें झालें ह्मणजे त्या खाटिकाला संतापून न्यायाधीशापुढें नेण्याबद्दल तुला त्याच्या दयाळूपणाची वाखाणणीच करावी लागेल.

विष्णु–होय, असें होईल खरें; परंतु तुह्मी चुकी दाखवितां तेव्हां ती मला कळतें, नाहीं तर कांहीं

समजत नाहीं; ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें.

गुरु– तूं नुकताच विचार करण्यास शिकूं लागला आहेस, त्यामुळें असें होतें. परंतु मी तुला सांगतों, कोणच्याही गोष्टींतील सत्य निवडून काढितांना तिच्यांतील सर्व संबंध नीट पाहिले पाहिजेत. ज्या गोष्टीपासून दुसऱ्याच्या अब्रूस अथवा जिवास धोका पोहोंचण्याचा संभव असतो, अशा गोष्टींचा फार बारकाईनें विचार केला पाहिजे. सारासार विचाराच्या अभावामुळें एखादा लबाड मनुष्य दोषमुक्त झाला तर एक वेळ चालेल, परंतु निरपराधी मनुष्यास तुरुंग मिळावा, किंवा त्याचा जीव घेण्यास आपण कारण व्हावें, हें फार वाईट आहे.

विष्णु– होय, त्यामुळें त्याच्या हत्येचें पाप आपल्या माथीं बसावयाचें.

गुरु– असो, ह्या पुढील थोड्या सूचना ध्यानांत धर ह्मणजे झालें. ज्या गोष्टीचा तुला निकाल करावयाचा असेल, ती पहिल्यानें चांगली समजून घेत जा. नंतर तिच्या संबंधाच्या ज्या गोष्टी ऐकशील त्यांचा परस्परांशीं मेळ कसा पडतो त्याचा सावकाश विचार कर. मीं तुला त्या गरीब मनुष्यापाशीं पांचशें रुपये होते ह्मणून सांगितलें, तेव्हां त्याच्या गरीबीचा आणि त्याच्याजवळील पैशाचा मेळ पडत नाहीं, हें चटकर

तुझ्या ध्यानांत आलें. नंतर तुला निर्णय करितां येण्याला आणखी माहिती पाहिजे असल्यास ती मिळीव. मग त्या गोष्टीचे विशेष प्रसंग पहा. कारण जी गोष्ट मनुष्याला करवत नसते ती गोष्ट तो रागांत, दुःखांत अथवा मोहांत असला ह्मणजे झट्दिशीं करून जातो. ह्या मुद्यांकडे लक्ष देत जाणाऱ्या मनुष्याची सारासार विचारशक्ति खचित वाढेल.

---

## भाग एकविसावा.

**गुरु**— विष्णु, उद्यां वामन यावयाचा आहे, त्यापेक्षां आजचें हें आपलें शेवटचेंच संभाषण समजावयाचें. विचारशिक्षेंत तूं किती तरबेज झाला आहेस तें एकदां मला पाहिलें पाहिजे.

**विष्णु**— मी आपला शुद्ध टोणपा आहें. मला काय यावयाचें आहे ! तरी पण मी हळूहळू सुधारत जाईन असें मला खास वाटतें. आज पहांटेस एक गमतीची गोष्ट घडली. मी पहांटेस उठून नित्याप्रमाणें लवकर स्नान करावें ह्मणून दिवा घेऊन चुलीजवळ जाऊन बसलों, आणि जवळ रचलेल्या लांकडांस हात घातला तों त्यांत मोठ्यानें कांहीं सरसरलें. तें ऐकल्यावरोबर मी घाबरलों आणि चट्कर उठून उभा राहिलों.

गुरु– पण इतकें तुला घाबरावयास काय झालें ?

विष्णु– काल रात्रीस मीं चुलीजवळच्या सर्पणांत बसलेल्या सापाची गोष्ट ऐकली होती तीच त्या वेळेस माझ्या मनांत मूर्तिमंत उभी राहिली, आणि एथेंही एखादा येऊन बसला असेल असें माझ्या मनांत आलें.

गुरु– मुलांना भय उत्पन्न करणाऱ्या गोष्टी कधीं सागूं नये. बरें मग तूं काय केलेंस ?

विष्णु– मी क्षणभर उगीच विचार करीत उभा राहिलों, आणि ह्या वेळेस गुरुजी अथवा वामन ह्यांपैकीं कोणी एथें असते तर असें भिऊन न जातां त्यांनीं ह्याचा नीट शोध केला असता, असें मनांत आणून मीं त्याचा पुरा शोध करण्याचा निश्चय केला.

गुरु– फार चांगला निश्चय केलास. पुढें शोध करण्याला आरंभ कसा केलास ?

विष्णु– मग मीं दिवा चांगला ढळढळीत मोठा केला, आणि लांकडांवर दृष्टि ठेवून व हातांत काठी घेऊन तोंडानें हुशहुश करींत ती तीन चार वेळां जमिनीवर आपटली असें केलें तरी कांहीं हालचाल ऐकूं येईना किंवा कांहीं दृष्टीस पडेना, त्यामुळें मला जरा धीर आला.

गुरु– मग पुढें काय केलेंस ?

विष्णु– मग मीं विचार करून मनांत आणिलें कीं, सापासारखें चपळ आणि भित्रें जनावर इतकी

आपटाआपटी ऐकल्यावर कधीं जाग्यावर बसून रहाणार नाहीं. ह्यावरून लांकडांत साप तर नसावाच.

गुरु— शाबास, तर्क फार चांगला केलास. हा विचार करण्यास शिकण्याचा परिणाम.

विष्णु— नंतर मी हातांतली काठी सरसावून लांकडांजवळ गेलों, आणि तीं थोडीशीं चाळविलीं तों पुन्हा सरसरलेलें ऐकूं आलें; तरी मागें न सरतां मी भराभर लांकडें ओढावयास लागलों. तेव्हां आतां आपणाला एथें दडून रहातां येणार नाहीं, असें पाहून उंदिरमामांनीं चट्‌दिशीं बाहेर उडी मारिली!

गुरु—हः हः हः! पण पहिल्यानें त्यानें तुला चांगलेंच भिवविलें होतें ह्मणावयाचें; पण तुझ्या विचारापुढें आणि निश्चयापुढें त्याचें चाललें नाहीं. असो, आतां ह्या विड्याच्या पानाविषयीं तुझ्या मनांत काय विचार येतात ते मला ऐकावयाचे आहेत.

विष्णु— मला पाहूं दे बरें. हो, डेख, शेंडा, शिरा, वरची बाजू आणि खालची बाजू हे त्याचे भाग झाले. आतां गुण—ह्याचा रंग हिरवागार आहे आणि हें दिसण्यांत फार सुंदर असून हलकें आणि नरम आहे. ह्याचें डेख काढून चार दिवस उबाऱ्यांत ठेविलें तर हें पिंवळ्या रंगाचें होतें, त्याला पक्कें पान ह्मणतात. विड्याचें पान जपून ठेविलें असतां जसें पुष्कळ दिवस

टिकतें तसें दुसरें कशाचेंही टिकत नाहीं. ह्याला चांगला खमंग वास येतो. हें खाल्लें तर अमळ तिखट लागतें. बहुतेक लोक ह्या पानांचा विडा करून खातात.–

गुरु– वा, फार चांगला बोलत गेलास.

विष्णु– ज्या वस्तु मंगलकारक आणि शुभ मानिल्या आहेत त्यांमध्यें विड्याची गणना केली आहे. लग्न, मुंज इत्यादि कार्यांत विडे देऊन लोकांचें आदरातिथ्य करण्याची चाल आहे. ह्यावरून मला लग्न आणि मुंज ह्यांत घडणाऱ्या पुष्कळ गोष्टींचें स्मरण होतें.

गुरु– विचारशिक्षेंत तुझी चांगली सुधारणा होत चालली आहे. तुझे विचार पहा कसे वाढत चालले आहेत ते! असो, आतां मी तुला कांहीं प्रश्न विचारितों. पट्टा कां धांवत जातो, भोंवरा कां फिरतो, चेंडू कां उशी देतो, आणि हवेंत पतंग कां उडतो हें मला सांग.

विष्णु– पट्टा धांवण्याचें आणि भोंवरा फिरण्याचें कारण एकच आहे. तें असें कीं, त्यांना गति दिल्यावर सृष्टीच्या नियमाप्रमाणें ती गति दुसऱ्या कांहीं कारणानें थांबेपर्यंत त्यांना त्या गतींतच रहावें लागतें. चेंडूच्या आंगीं स्थितिस्थापकता असल्यामुळें त्याचा जो भाग जमिनीवर आपटून चपटा होतो, तो पुन्हा पूर्वस्थितीवर येण्यास लागलाच जोर करितो, तेणेंक-

रून त्यास उशी येते. आणि पतंग ज्या कागदाचा केलेला असतो तो हलका असतो, आणि त्याची दोरी त्याला एका बाजूस ओढीत असते, व त्याचें शेंपूट किंवा गोंडा त्याला दुसरीकडे ओढीत असतो, त्यामुळें त्याचा पृष्ठभाग वाऱ्याकडे रहातो.

गुरु–बरें, एक मनुष्य तीन मैलांवरून तोफेचा आवाज ऐकतो, तर चाळीस मनुष्यें किती मैलांवरून ऐकतील ?

विष्णु–हः हः! ह्यांत काय ! चाळीस मनुष्यांना तीन मैलांपेक्षां जास्ती अंतरावरून ऐकतां येणार नाहीं हें उघड आहे, परंतु त्यांत कोणी बहिरट असला तर मात्र गोष्ट निराळी.

गुरु–आतां तुला घोंटाळ्यांत घालण्याचें पहिल्याप्रमाणें सोपें नाहीं. तुझा विचारशिक्षेंत प्रवेश झाल्यापासून तूं अधिक हुशारीनें राहूं लागला आहेस. वामनानें विचारापासून जे फायदे होतात ते बहुतेक तुला सांगितले आहेत; ते तुझ्या स्मरणांत आहेत काय ?

विष्णु–हो, ते मीं तोंडपाठ करून टाकिले आहेत. पहा, "विचारापासून आपलें ज्ञान वाढतें, बुद्धीस तीव्रता येते, समज चांगला होतो, मनाचा विस्तार होतो, आणि ज्या गोष्टी आपणांस समजत नसतात त्या समजूं लागतात. सर्व वस्तु मनोरंजक दिसूं लागतात,

आणि आपल्या ठिकाणीं विचाराची आवड उत्पन्न होते. त्यापासून अवघड गोष्टी सोप्या होतात, अविचारापासून जीं संकटें यावयाचीं तीं टळतात, सर्व प्राण्यांवर आपली सत्ता चालते, दुसऱ्यास अनेक प्रकारची मदत करितां येते, आणि तेणेंकरून आपण सुखी होतों. सारांश, आपण विचार करावयास शिकलों, आणि आपले विचार सदुपयोगाकडे लाविले, तर आपण स्वतः सुखी होऊन आपल्यापासून दुसऱ्यांनाही सुख होईल. ''

गुरु– बिनचूक ह्मणत गेलास ह्यांत संशय नाहीं, पण तूं आपला सकाळचा वेळ कसा घालवितोस ?

विष्णु–मी अलीकडे रोज सकाळीं चार वाजतां उठतों. मग तोंड धुऊन अर्धा तास देवाचें नामस्मरण करीत बसतों, आणि मग अभ्यासास लागतों. कारण नामस्मरण केल्यावांचून जर अभ्यासास लगलों, तर आईला राग येतो. ती म्हणते, "ईश्वराचें नांव घेतल्यावांचून जो दिवस गेला तो फुकट गेला.'' आठ वाजेपर्यंत अभ्यास केल्यावर माझ्याकडे एक मुलगा येत असतो, त्याला मी जें कांहीं वामनापासून शिकलों आहे तें शिकवितों, आणि मग स्नान करितों.

गुरु– तूं आपल्या वेळाचा फार चांगला उपयोग करितोस. त्यामध्यें तुझ्या हातून चारी गोष्टी चांगल्य

घडतात. पहिली, ज्या देवानें आपणांस उत्पन्न केलें आहे, आणि जो आपल्या रक्षणासाठीं निरंतर जपत असतो त्याला तूं भजतोस; दुसरी, आईची आज्ञा पाळतोस; तिसरी, दुसऱ्या मुलाला शिकवून परोपकार-सुख अनुभवितोस; आणि चवथी, जें शिकला आहेस त्याची वृद्धि करितोस. असो, आपला वेळ झाला, आतां उठूं या. उद्यां वामन आला तरी तुला हवें असल्यास वाटेल तेव्हां मजकडे येत जा, आणि मी-ही केव्हां केव्हां तुझ्या घरीं येत जाईन.

विष्णु— तुह्मीं कृपा करून मला शिकविण्याचे इतके श्रम घेतले, ह्याबदल मी तुमचा फार उपकारी झालों. तुह्मीं ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या लक्षांत धरून मी त्यांवर विचार करीत जाईन, आणि शहाणा होईन.

गुरु— ईश्वरकृपेनें तुझी इच्छा परिपूर्ण होईल. चांगले विचार हे चांगल्या कृत्यांचे आरंभ आहेत. योग्य रीतीनें विचार करणें हा अंकुर होय, आणि योग्य रीतीनें कृत्य करणें हें झाड होय. परोपकार करणें, स्वस्थ मन असणें आणि सुखप्राप्ति होणें हीं त्याचीं फळें होत. परंतु हीं फळें ईश्वरकृपेवांचून दुर्मिळ आहेत; ह्यासाठीं प्रत्येक कामांत देवाची भीति बाळगीत जा, आणि सांजसकाळ त्याला भक्तिपूर्वक भजत जा.

समाप्त.

आमच्याकडे खालीं लिहिलेले नकाशे

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २२ | २ | शक्ति | त्यांच्या शक्ति |
| २५ | १९ | पदार्थ ह्मटले | गोष्टी ह्मटल्या |
| ,, | २० | हे होत. | ह्या होत |
| २६ | १४ | हवातसा | हवा तसा |
| ३६ | १२ | वाजतांये, | वाजतां ये. |
| ४३ | १६ | ह्मणज | ह्मणजे |
| ४४ | ९ | ह्मणजे उडणारा अथवा उसळणारा. | उडणारा अथवा उसळणारा आहे. |
| ५८ | २२ | लागला स | लागलास |
| ६० | १ | जड | घन. |
| ९३ | १८ | कृपाकरून | कृपा करून |
| ९७ | १५ | बोलूंया. | बोलूं या. |
| ,, | २० | पाहूंया | पाहूं या. |
| ९८ | ५ | थोढी | थोडी |
| १३६ | १२ | तळहाता एवढें | तळ हाताएवढें |
| १५९ | १५ | लगलों, | लागलों, |
| ,, | २२ | चांगल्य | चांगल्या |

# आमच्याकडे खालीं लिहिलेले नकाशे विकरीस तयार आहेत.

## मराठी नकाशे.

| | किंमत रु० | ट० ह० |
|---|---|---|
| मुंबई इलाखा मोठा रूळपटीसहित | २। | ·।।।· |
| ” मध्यम ” | १।। | ·।।· |
| ” लहान ” | ·।।· | ϭ–।। |
| ” लहान कागद पूर्ण रंग-<br>” विलेला | ϭ= | ϭ।। |
| ” ” हद्दी रंगविलेला | ϭ–।। | ϭ।। |
| हिंदुस्थान मोठा रूळपटीसहित | ३।। | ·।।।· |
| ” लहान ” | ·।।।· | ϭ= |
| ” ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | ϭ।। |
| ” ” ” हद्दी रंगविलेला | ϭ≡ | ϭ।। |
| आशिया मोठा छापत आहे | | |
| ” लहान रूळपटीसहित | ·।।।· | ϭ= |
| ” ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | ϭ।। |
| ” ” हद्दी रंगविलेला | ϭ≡ | ϭ।। |
| यूरोप मोठा रूळपटीसहित | ३।। | ·।।।· |
| ” लहान ” | ·।।।· | ϭ= |
| ” ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | ϭ।। |
| ” ” ” हद्दी रंगविलेला | ϭ≡ | ϭ।। |
| आफ्रिका मोटा छापत आहे. | | |
| ” लहानरूळपटीसहित | ·।।।· | ϭ= |
| ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | ϭ।। |
| ” ” हद्दीरंगविलेला | ϭ≡ | ϭ।। |
| उत्तरअमेरिका रूळपटीसहित | ·।।।· | ϭ≡ |
| ” कागद पूर्णरंगविलेला | ·।· | ϭ।। |
| ” ” हद्दीरंगविलेला | ϭ≡ | ϭ।। |

| | किंमत रु० | ट० ह० |
|---|---|---|
| दक्षिणअमेरिका रूळपटीसहित | ·।।।· | σ=। |
| ” कागद पूर्णरंगविलेला | ·।· | σ।। |
| ” ” हद्दीरंगविलेला | σ= | σ।। |
| पृथ्वीचा मोठा रूळपटीसहित | ३।।।· | १ |
| ” लहान ” | ·।।।· | ·।।· |
| ” ” कागद पूर्ण रंवगिलेला | ·।· | σ।। |
| ” ” ” हद्दी रंगविलेला | σ= | σ।। |

## गुजराथी नकाशे.

| | | |
|---|---|---|
| मुंबई इलाखा रूळपटीसहित | ·।।· | σ।। |
| ” कागदपूर्णरंगविलेला | σ= | σ।। |
| ” ” हद्दीरंगविलेला | σ–।। | σ।। |
| हिंदुस्थान रूळपटीसहित | ·।।।· | ·।।· |
| ” कागद पूर्णरंगविलेला | ·।· | σ।। |
| ” ” हद्दीरंगविलेला | σ= | σ।। |
| आशिया रूळपटीसहित | ·।।।· | σ= |
| ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | σ।। |
| ” ” हद्दी रंगविलेला | σ= | σ।। |
| यूरोप रूळपटीसहित | ·।।।· | ·।।· |
| ” कागद पूर्ण रंगविलेला | ·।· | σ।। |
| ” ” हद्दी रंगविलेला | σ= | σ।। |

यांशिवाय इंग्रजी, मराठी, गुजराथी आणि संस्कृत पुस्तकें, संस्कृत प्राकृत पोथ्या, सर्व जातींच्या काप्या व एक्झरसाइज, मोडी कित्ते नंबर १ ते ७ पर्यंत व बाळबोध कित्ते, ( दीड रुपया शेंकडाप्रमाणें ) हीं सर्व आमच्याकडे माफक दरानें विकत मिळतील.

**व्यंकटेश अनंत जोशी.**

बुकसेलर आणि पब्लिशर.

दुकान–पालवरोडवर ठाकुरद्वारनजीक. मुंबई.